UNIVERSAL LIBRARY
OU_192406
UNIVERSAL LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. Accession No.

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below

कॉंटिनेंटल प्रकाशन ६७ वें

# कुरल

## -तीन पुरुषार्थ-

मूळ लेखक : तिरुवल्लुवर

अनुवादक : सानेगुरुजी




सन १९४८

किंमत तीन रुपये

प्र का श क :
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेन्टल प्रकाशन
टिळक रोड, पुणें २

मु द्र क :
विठ्ठल हरि बर्वे
आर्यभूषण छापखाना,
९१५।१ शिवाजीनगर,
पुणें ४

किंमत तीन रुपये

चित्रकार : श्री. दलाल

पहिली आवृत्ति : १९४८

## विषयानुक्रमः—

**आरंभः—** २५–२८

सर्ग १ : प्रभुस्तुति—सर्ग २ : पर्जन्य–स्तुति—सर्ग ३ : निःसंगाचा मोठेपणा—सर्ग ४ : सदाचार-माहात्म्य.

**भाग पहिला : गृहस्थजीवन** २९–४७

सर्ग ५ : कौटुंबिक जीवन—सर्ग ६ : सद्गुणी भार्येचें सुख—सर्ग ७ : संतति—सर्ग ८ : प्रेम—सर्ग ९ : अतिथि-सत्कार—सर्ग १० : न खुपणारी वाणी—सर्ग ११ : कृतज्ञता—सर्ग १२ : न्यायीपणा—सर्ग १३ : संयम—सर्ग १४ : शुद्ध वर्तन—सर्ग १५ : परस्त्रीकडे पाहूं नको—सर्ग १६ : क्षमा—सर्ग १७ : निर्मत्सरता—सर्ग १८ : निर्लोभता—सर्ग १९ : निंदा करूं नको—सर्ग २० : पोकळ बडबड नको—सर्ग २१ : असत्कर्माची भीति—सर्ग २२ : सेवा, परकार्यतत्परता—सर्ग २३ : भूतदया—सर्ग २४ : यश.

**भाग दुसरा : यति-जीवन** ४८ ते ६१

१ : साधना-विभाग : व्रतें

सर्ग २५ : दया—सर्ग २६ : मांसाशन नको—सर्ग २७ : तप—सर्ग २८ : दंभ—सर्ग २९ : कपटराहित्य—सर्ग ३० : सत्य—सर्ग ३१ : क्रोधराहित्य—सर्ग ३२ : अहिंसा ( अपाय न करणें )—सर्ग ३३ : अहिंसा ( न मारणें ).

२ : ज्ञान

सर्ग ३४ : संसाराची असारता—सर्ग ३५ : त्याग—सर्ग ३६ : सत्याचा साक्षात्कार—सर्ग ३७ : वासनाक्षय—सर्ग : ३८ नियति ( दैव ).

**भाग तिसरा : अर्थ** ६२ ते १२९

१ : राजा

सर्ग ३९ : राजाचे गुण—सर्ग ४० : विद्या—सर्ग ४१ : शिकण्याच्या बाबतींत काळजी न घेणें—सर्ग ४२ : शहाण्याची शिकवण ऐकणें—सर्ग ४३ : समजून घेणें—सर्ग ४४ : दोषांचें निर्मूलन करा—सर्ग ४५ : सज्जनांची मैत्री—सर्ग ४६ : नीच संगत नको—सर्ग ४७ : करण्यापूर्वी विचार—सर्ग ४८ : सामर्थ्याचा अंदाज—सर्ग ४९ : योग्य संधी ओळखणें—सर्ग ५० : स्थान परीक्षा—सर्ग ५१ : ज्यांच्यावर विश्वास टाकायचा त्यांची परीक्षा—सर्ग ५२ : परीक्षा घेऊन कामावर नेमणें—सर्ग ५३ : आप्तेष्टांना संतुष्ट ठेव—सर्ग ५४ : अखंड सावधानता—सर्ग ५५ : न्यायी राज्य—सर्ग ५६ : छळ—सर्ग ५७ : दुःखावह गोष्टींपासून दूर रहाणें—सर्ग ५८ : विवेक—सर्ग ५९ : हेरखातें—सर्ग ६० : उत्साह—

सर्ग ६१ : आलस्य—सर्ग ६२ : पुरुषार्थशाली उद्योग—सर्ग ६३ : दुर्दैव आलें तरी धीर न सोडणें.

## २ : राज्यसंस्थेंतील घटक

सर्ग ६४ : मंत्री—सर्ग ६५ : वक्तृत्व—सर्ग ६६ : कर्माचें पावित्र्य—सर्ग ६७ : निश्चयी संकल्पशक्ति—सर्ग ६८ : कामें नीट करणें—सर्ग ६९ : दूत ( वकील )—सर्ग ७० : राजासमोर कसें वागावें—सर्ग ७१ : तोंडावरून परीक्षा—सर्ग ७२ : श्रोत्यांची वृत्ति ओळखणें—सर्ग ७३ : सभेंतील आत्मविश्वास—सर्ग ७४ : देश—सर्ग ७५ : दुर्ग, किल्लेकोट—सर्ग ७६ : द्रव्य मिळविणें—सर्ग ७७ : सैन्य—सर्ग ७८ : आत्मनिरपेक्ष योद्धा—सर्ग ७९ : मैत्री—सर्ग ८० : मैत्रीसाठीं योग्यायोग्य परीक्षा—सर्ग ८१ : जीवश्च कंठश्च—सर्ग ८२ : अपायकारक मैत्री—सर्ग ८३ : खोटी मैत्री—सर्ग ८४ : मूर्खपणा—सर्ग ८५ : अहंकारी मूर्खपणा—सर्ग ८६ : विरोधी वृत्ति—सर्ग ८७ : शत्रूचीं लक्षणें—सर्ग ८८ : उगीच शत्रू निर्माण करणें—सर्ग ८९ : घरभेदे—सर्ग ९० : बलवंतांचा राग—सर्ग ९१ : बाईलवेडे—सर्ग ९२ : वारांगना—सर्ग ९३ : सुरापान—सर्ग ९४ : द्यूत—सर्ग ९५ : औषधें.

## ३ : संकीर्ण प्रकरण

सर्ग ९६ : सत्कुल—सर्ग ९७ : स्व-मान—सर्ग ९८ : मोठेपणा—सर्ग ९९ : पात्रता—सर्ग १०० : सभ्यता—सर्ग १०१ : संपत्तीचा उपयोग न करणें—सर्ग १०२ : लज्जेची जाणीव—सर्ग १०३ : कुटुंबाला कळा चढवा—सर्ग १०४ : कृषि; शेती—सर्ग १०५ : दारिद्र्य—सर्ग १०६ : भिक्षा मागणें—सर्ग १०७ : भीक मागणें नको—सर्ग १०८ : अधःपतित जीवन.

## भाग चौथा : तो नि ती १३० ते १५९

### विभाग पहिला

सर्ग १०९ : सुंदरीनें हृदयास केलेली जखम—सर्ग ११० : बाह्य लक्षणांनीं हृदय ओळखणें—सर्ग १११ : एकता—सर्ग ११२ : तिच्या सौंदर्याची स्तुति—सर्ग ११३ : प्रेमाची महति—सर्ग ११४ : विनयातिक्रमण—सर्ग ११५ : किंवदन्ती.

### विभाग दुसरा

सर्ग ११६ : प्रेमपावित्र्य—सर्ग ११७ : विरहशोक; झुरून जाणें—सर्ग ११८ : उत्कंठेनें वाट पाहून डोळे निस्तेज होणें—सर्ग ११९ : विरही प्रेमामुळें आलेली पांडुरता—सर्ग १२० : पतीला एकरूपता वाटत नाहीं म्हणून हृदयवेदना—सर्ग १२१ : दूर असलेल्या प्रियेसाठीं सुस्कारे—सर्ग १२२ : स्वप्नस्थितीची स्तुति—सर्ग १२३ : तिन्हीसांजा झाल्यावर सुस्कारे—सर्ग १२४ : सुंदर शरीराची कृशता—सर्ग १२५ : हृदयाला उद्देशून—सर्ग १२६ : मनाचा तोल नि संयम ढांसळण्याची भीति—सर्ग १२७ : प्रेमी जीवांची भेटण्यासाठीं ओढ—सर्ग १२८ : अप्रकट विचार समजणें—सर्ग १२९ : मीलनोत्कंठा—सर्ग १३० : हृदयाची कान-उघाडणी—सर्ग १३१ : प्रेमकलह—सर्ग १३२ : प्रेमकलहांतील सूक्ष्मता—सर्ग १३३ : प्रेमकलहांतील गोडी.

## पुस्तकाचा नि ग्रंथकर्त्यांचा परिचय

ज्याला आपण तामीळनाड प्रांत म्हणून संबोधितों त्यांत तुंगभद्रेच्या दक्षिणेकडचा पुष्कळसा प्रदेश येतो. विशेषतः कावेरी नदीच्या आसमंतात्चा सर्व भाग त्यांत येतो. एकीकडे आंध्रदेश, एकीकडे कर्नाटक, एकीकडे मलबार याला जोडून आहेत. या तामीळनाड प्रदेशांत मूळ द्राविडी संस्कृति होती. द्राविड संस्कृति फार प्राचीन आहे. किती प्राचीन तें नीट सांगतां येणार नाहीं. द्राविड लोक लष्करी पेशाचे होते. लढाई करणें म्हणजे त्यांना आनंद वाटे. कर्तृत्वहीन जीवनाचा त्यांना तिटकारा वाटे. तामीळ भाषेंत जे अति प्राचीन गीतसंग्रह आहेत, ज्या गाथा आहेत, त्यांतून ही शूर नि साहसी वृत्ति दिसून येते. एका गाण्यांत एक द्राविड स्त्री म्हणते, "माझा मुलगा कोठें आहे म्हणून तुम्ही विचारतां ? तो कोठें आहे तें मला माहित नाहीं. परंतु रणांगणावर तो अकस्मात् दिसेल. कारण माझ्या उदर दरींतून बाहेर पडलेला तो वाघ आहे." अशा शूर वीरांना जन्म देण्यांत द्राविड मातांना धन्यता वाटे. दुसऱ्यांच्या स्त्रिया पळविणें, शत्रूच्या प्रदेशाची राखरांगोळी करणें, घरेंदारें उध्वस्त करणें, शेजारच्या जमातींचीं गुरेंढोरें लांबविणें, इत्यादि गोष्टींचा द्राविड लोकांना अभिमान वाटे. ज्याप्रमाणें भीष्मानें अंबा, अंबिका, अंबालिका यांना युद्ध करून जिंकून नेलें किंवा द्रौपदी वनांत जयद्रथाला म्हणते "माझ्या पांची पतींना जिंकून मग मला घेऊन

जा "; त्याप्रमाणेंच या द्राविड लोकांचीहि नीति होती. राक्षस-विवाहाचा हा प्रकार आर्यांतल्याप्रमाणें त्यांच्यांतहि असावा असें वाटतें. द्राविड लोक मांसाहारी होते. मांसाशनानें त्यांचे दांत किटलेले असत. द्राविड लोकांत शौर्य होतें, साहस होतें; परंतु उदात्तता, थोर नीतिमत्ता नव्हती. त्यांच्या प्राचीन गीतांतून साहसी गोष्टी आहेत; परंतु थोर ध्येयवादित्व नितकें दिसून येत नाहीं.

पुढें आर्य लोक दक्षिणेकडे आले. त्यांनी आपल्याबरोबर स्वतःची संस्कृतीहि आणिली. आर्य लोक जेते म्हणून आले नाहीत, तर शिक्षक व आचार्य म्हणून आले. आलेल्या आर्यांना "कोमल स्वभावाचे व वेद-द्रष्टे असें संबोधण्यांत येई. ब्राह्मण, जैन व बुद्ध तिन्ही धर्मांचे लोक आपापलीं नीतितत्त्वें नि संस्कृति घेऊन खालीं दक्षिणेकडे येऊं लागले. तामीळ संस्कृतीचा मूळचा पाया द्राविडी आहे. परंतु वरची भव्य इमारत आर्य संस्कृतीची आहे. या तिन्ही धर्मांच्या पंडितांनीं तामीळ वाङ्मयांत उदार विचार ओतले, नवीन संस्कृति फुलविली. ब्राह्मण, जैन आणि बुद्ध पंडितांनीं या प्रदेशांत विद्यापीठें स्थापिलीं; साहित्यसंघ निर्माण केले; ग्रंथालयें सजविलीं; आणि तामीळ भाषेला भव्यता, श्रेष्ठता नि स्थिरता दिली.

विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडे प्रथम आलेला थोर ऋषि म्हणजे अगस्ति हा होय. त्यानें तामीळ भाषेचें पहिलें व्याकरण रचिलें अशी दंतकथा आहे; परंतु तें व्याकरण लुप्त झालें. अगस्तीच्या शिष्यानें लिहिलेलें व्याकरण मात्र उपलब्ध आहे. शंकरानें डमरु वाजवून पाणिनीस ज्याप्रमाणें सूत्रें ऐकविलीं, त्याचप्रमाणें अगस्तीसहि ऐकविलीं अशी दंतकथा आहे. पाणिनीचें व्याकरण ज्याप्रमाणें अत्यन्त शास्त्रीय आणि अतुलनीय ठरलें, त्याप्रमाणें अगस्तीनें रचिलेलें तामीळ भाषेचेंहि होतें, असें म्हणतात.

तामीळ भाषा संस्कृताइतकी प्राचीन आहे. ख्रिस्तशकापूर्वींच तामीळ भाषेंत अनेक ग्रंथ रचिले गेले होते. तामीळ भाषेचा संस्कृतशीं मुळीं संबंध नाहीं. संस्कृताचा गंधहि नसलेली अशी हिंदुस्थानांत जर कोणती प्रमुख

भाषा असेल तर ती तामीळ होय. हिंदुस्थानांतील बहुतेक अर्वाचीन भाषा संस्कृतोद्भव आहेत व त्यांतील वाङ्मय इ. सनाच्या एक हजार वर्षांपासून साधारणपणें मिळूं लागतें. तसें तामीळ भाषेचें नाहीं. आजहि तुम्हीं तामीळ भाषा पाहिलीत तर तिच्यांत शेंकडा पांचहि संस्कृत शब्द सांपडणार नाहींत. तेलगु भाषेंत हल्लीं शेंकडा तीसचाळीस शब्द संस्कृत दिसतील. कानडी, मल्याळं भाषांतहि तोच प्रकार. परंतु तामीळचें तसें नाहीं. आंध्र लोक आपल्या देशाला आंध्र-देश किंवा आंध्रसीमा म्हणतात. "सीमा" "देश" हे संस्कृत शब्द आहेत. परंतु तामीळनाड यांतील "नाड" शब्द देश या अर्थीं आहे. तामीळ भाषेंत कोणताहि संस्कृत शब्द नाहीं. धर्म, तत्त्वज्ञान, राजकारण, कृषि, व्यापार; सर्व क्षेत्रांतील त्या त्या गोष्टी, ते ते विचार प्रकट करायला स्वतंत्र शब्द आहेत. मराठीमध्यें "धर्म, अर्थ, काम, मोक्ष" इत्यादि शब्द केवळ संस्कृत आहेत. किंवा राजा, दंड, दुष्ट, खल, असे शेंकडों संस्कृत शब्द आहेत. परंतु तामीळ भाषेंत नाना छटा दाखवणारे शेंकडों मूळचे शब्द आहेत. दुष्ट राजा, चांगला राजा, इत्यादींना एकेक स्वतंत्र शब्द आहे. तामीळ भाषेचा शब्द-संग्रह अशा रीतीनें स्वतंत्र व विपुल आहे. तामीळ भाषा ही स्वतंत्र भाषा आहे. स्वतंत्र शब्दकोश, स्वतंत्र वाक्यरचना. तिचा सारा संसार, सारा थाट स्वावलंबी, स्वयंपूर्ण असा आहे. आणि संस्कृताइतकाच प्राचीन आहे.

प्राचीन तामीळ वाङ्मयाचे तीन प्रकार पडतात. संगीत, नाटय व साहित्य हे ते तीन प्रकार. संगीत व नृत्य यांवर ग्रंथ आहेत. नटराजाच्या भव्य मंदिराच्या प्रदेशांतील भाषेंत नाटय नि नृत्य यांवर ग्रंथ असायचेच. नृत्यकला पूर्णावस्थेस पोंचली होती. हजार हजार तारांचीं तंतुवाद्यें होतीं आणि तीं निरुपम संगीत स्रवत. या त्रिविध विभागणीशिवाय अन्य प्रकारेंहि विभागणी करीत. प्रेम-वाङ्मय नि प्रेमेतर वाङ्मय असेहि भेद पाडीत. या निरनिराळ्या वाङ्मयप्रकारांची व्याकरणेंहि निरनिराळीं असत. प्रेमविषयावरील काव्यांतील भाषेचें निराळें व्याकरण ! हें जें प्राचीन तामीळ

वाङ्मय आहे, तें टीकांच्या साहाय्याखेरीज नीटसें समजत नाही. ज्याप्रमाणें संस्कृत ग्रंथांवर भाष्यें, टीका, टिप्पणी आहेत, त्याप्रमाणें बहुतेक प्राचीन तामीळ ग्रंथांवरहि आहेत.

इ. सनाच्या सातव्या आठव्या शतकांत तामीळनाडमध्यें सारखी रणधुमाळी होती. सदैव युद्धें. त्या धुमश्चक्रीत पुष्कळसें तामीळ वाङ्मय नष्ट झालें. तामीळ भाषेंतील बरेंचसें बुद्ध आणि जैन वाङ्मयहि याच सुमारास नष्ट झालें. पुढें मुसलमान आले. त्यांनी हजारों ग्रंथ जाळले, ग्रंथालयें भस्मसात् केली. यानंतर अठराव्या शतकांत वाङ्मयाला पुन्हां उत्तेजन मिळूं लागलें. इ. सन १७१२ मध्यें अरुणाचलम् हा नाटककार झाला. तो इ. सन १७७९ मध्यें मरण पावला. “रामनाटकम्” हें त्याचे सुप्रसिद्ध नाटक. ललित कलांना पूर्वीं सामाजिक जीवनांत जें स्थान असें, तें मध्यंतरींच्या या काळांत नाहींसें झालें. या कला धर्मांत म्हणजे मंदिरांत जाऊन बसल्या. हिंदु मंदिरांतून शैव नि वैष्णव गीतें जुन्या नृत्याच्या चालीवर म्हणण्यांत येऊं लागलीं. मोठमोठ्या मंदिरांतून नृत्यांगना ठेवण्यांत येऊं लागल्या (त्यांना “गंधर्वी” असें म्हणत). तंजावरचे मराठी राजे सरफोजी भोंसले यांनीं १७८० ते १८३० या आपल्या दीर्घ कारकीर्दींत संगीतास उत्तेजन दिलें. तामीळ भाषेंतील कांहीं वाङ्मय ताडपत्रावर लिहिलेलें उपलब्ध झालें; कांही वाङ्मय मठाधिपतीजवळ आणि दरिद्री पंडितांजवळ पडून होतें. आतां त्यांतील बरेंचसें प्रसिद्ध झालें आहे, प्रसिद्ध होत आहे.

तामीळ वाङ्मय संस्कृतइतकें प्राचीन असलें तरी उभयतांची तुलना मुळीच करतां येणार नाही. कारण वाङ्मयांत संस्कृतीचें प्रतिबिंब पडत असतें. आणि आर्य येण्यापूर्वीं द्राविडी लोकांजवळ श्रेष्ठ अशी संस्कृति नव्हती. म्हणून श्रेष्ठ वाङ्मयहि नव्हतें. स्वर्ग, नरक; पाप, पुण्य; जीव, शिव; आत्मा, परमात्मा; — इत्यादि गहन प्रश्नांची त्यांना वार्ताहि नव्हती. परंतु संस्कृतापेक्षां एका बाबतींत तामीळ वाङ्मय श्रेष्ठ आहे. नीतिवाङ्मय—

रोजच्या व्यावहारिक जीवनांतील नीतीसंबंधीं वाङ्मय–भरपूर आहे. कांहीं टीकाकार याचा असा अर्थ करतात कीं या लोकांची नीतिमत्ताच कमी दर्जाची होती; म्हणून पुन: पुन्हां त्याच त्याच गोष्टी सांगणारीं पुस्तकें त्यांना लिहावीं लागली. जीवनाची थोर नीति नसल्यामुळें व्यावहारिक नीतीवरच सारखा भर द्यावा लागला. उत्तरेकडून जे आर्य आले, त्यांना "सत्यवादिन्" वगैरे विशेषणें तामीळ भाषेंत लावलेलीं आढळतात. परंतु यावरून द्राविड लोक सारे असत्यवादिन् होते, असें कसें म्हणतां येईल ?

तामीळ भाषेंत फार मोठीं अशीं पांच महाकाव्यें आहेत, पांच लहान महाकाव्ये आहेत, आठ गाथा किंवा गीतसंहिता आहेत. १० इतर मोठीं काव्यें आहेत. १८ लहान लहान काव्यें आहेत. या अठरा लहान लहान काव्यांतून महाभारत व स्मृतिग्रंथ यांतील शिकवण सांठवलेली आहे. तामीळ भाषेंतील वाङ्मय आर्य विचारांनी भरलेलें आहे. आर्य येण्यापूर्वी भाषा असली तरी नांव घेण्यासारखें वाङ्मय नव्हतें. महाकाव्यांत कंभन्चें 'रामायण' आणि अतिविरराम पांड्य याचें 'नैषध-काव्य' हीं प्रसिद्ध आहेत. मध्यंतरीच्या काळांत अलंकारशास्त्रावरील कांहीं ग्रंथांचें व कांहीं काव्य-ग्रंथांचें अध्ययन झालें म्हणजे पुष्कळ मिळविलें, असें पंडितांना वाटे. जैन व बुद्ध यांनीं लिहिलेले कांहीं गंभीर ग्रंथ आहेत; परंतु त्यांच्याकडे फारसें लक्ष दिलें जात नसे. इंग्रजांच्या आगमनानंतर इतर हिंदी भाषांवर झाला त्याप्रमाणें तामीळ भाषेवरहि परिणाम झाला. राष्ट्रीय कवि, नाटककार, कादंबरीकार, चरित्रकार, शास्त्रज्ञ, निर्माण होऊं लागले. सुब्रह्मण्यं भारती हा थोर अर्वाचीन राष्ट्रीय कवि होय. इ. सन १९२२ मध्यें तो मरण पावला.

तामीळ भाषेंत नीतिशास्त्रावर पुष्कळ ग्रंथ आहेत म्हणून वर सांगितलें. त्यांतील पुष्कळसे प्राचीन आहेत. अशा ग्रंथांपैकीच प्रस्तुतचा "कुरल" हा ग्रंथ आहे. या ग्रंथाची रचना काव्यांत आहे. कुरल हें एक उत्कृष्ट काव्य आहे. परंतु काव्यापेक्षांहि त्यांतील विचार उदात्त नि गंभीर आहेत.

वाणीची श्रीमंती नि अर्थाची श्रीमंती–दोन्ही येथें अनुभवायला मिळतात. "कुरल" ग्रंथासंबंधीं पुढें सांगेन. प्रथम त्याच्या कर्त्याची थोडी माहिती करून घेऊं या.

"कुरल" या अलौकिक ग्रंथाचा तिरुवल्लुवर हा कर्ता. मद्रासजवळच्या मैलापूरचा तो राहणारा. त्याचा काळ निश्चित नसला तरी इसवी सनाच्या पहिल्या शतकांतला तो आहे, याविषयीं शंका नाहीं. शिलाप्पाधिकारम् आणि मणिमेखलाइ ह्या दुसऱ्या शतकांत झालेल्या ग्रंथांमध्यें कुरलचा उल्लेख आहे. पांड्य राजा उग्रेपेरुवलुडी हा राज्य करीत असतां मदुरेच्या कविमंडळानें कुरल ग्रंथ प्रसिद्ध केला असें मानतात. हा राजा इ. सन १२५ च्या सुमारास झाला हें नक्की माहीत आहे. एका कवीनें कुरल ग्रंथाची स्तुति करतांना म्हटलें आहे: "पांड्य राजाला उद्देशून देवी सरस्वती म्हणाली, 'मी कुरलमध्यें प्रकट झालें आहें.'" हा पांड्य राजा वर उल्लेखिलेलाच असावा. शिवाय तिरुवल्लुवराचा एलेक्का म्हणून जो श्रीमंत मित्र होता तो चोल घराण्यांतील सहावा पुरुष होता; आणि त्याचा काळ पहिलें शतकच आहे. सारांश, तिरुवल्लुवर हा ग्रंथकार अठराशें वर्षांपूर्वींचा आहे, हें निर्विवाद.

या ग्रंथकाराच्या जीवनाची फारशी माहिती मिळत नाहीं. तो वल्लुव जातीचा होता असें नांवावरून दिसतें. "तिरु" म्हणजे पूज्य किंवा भक्त. तिरुवल्लुवर म्हणजे वल्लुव जातींतील महापुरुष किंवा थोर भक्त, असा अर्थ आहे. वल्लुव जात म्हणजे अस्पृश्य जात. तिरुवल्लुवर महारजातीचा होता. या वल्लुव जातीचा धंदा म्हणजे दवंडी पिटणें, निरोप पोंचविणें असा म्हणजेच आपल्याकडे महारबंधूंचा असतो तशाच प्रकारचा असे.

पांड्य राजांची मदुरा ही राजधानी होती. या राजधानींत हा संतकवि जन्मला. याच्या जन्मासंबंधीं पुढील दंतकथा आहे. तिरुवल्लुवराचा पिता ब्राह्मण होता; परंतु आई महारकन्या होती. आईचें नांव "आदि". तो महाराचा होती; परंतु तिचें संगोपन एका ब्राह्मणानेंच केलें होतें. यामुळें

आदीच्या मनावर ब्राह्मण व वैदिक संस्कृतीचे संस्कार झाले होते. तिरुवल्लुवराच्या पित्याचें नांव भगवान् असें होतें. भगवान् नि आदि या जोडप्याच्या पोटीं एकंदर सहा अपत्यें झालीं. या सर्व बहीणभावंडांनीं थोडेंबहुत काव्य केलें आहे. आपल्याकडे निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई —सर्वांनी ज्याप्रमाणें काव्यरचना केली, त्याप्रमाणेंच याहि भावंडांनीं.

तिरुवल्लुवराच्या लहानपणची माहिती नाही. त्यानें पुढें लग्न केलें. त्याची पत्नी थोर पतिव्रता होती. बुद्धधर्माच्या ग्रंथांतून तिरुवल्लुवर बुद्धधर्मी होता; त्याची पत्नी सिंगापूरची; तिला बुद्ध भिक्षूनीं ज्ञान दिलें होतें; इत्यादि हकीगती आहेत. तिरुवल्लुवराची संसारयात्रा सुखाची असे यांत शंका नाहीं. पतिपत्नींचें जेथें प्रेम आहे, ऐक्य आहे, तेथें आनंदास काय तोटा? पत्नी पतीचा शब्द जणुं वेदवाक्य मानी. पत्नीचें नांव वासुकी. तिरुवल्लुवर अत्यन्त सुखी नि समाधानी असा संसारी गृहस्थ आहे अशी वार्ता एका विरक्त साधूच्या कानांवर गेली. तो तिरुवल्लुवराकडे आला नि म्हणाला, "गृहस्थाश्रम चांगला असें जर तुम्ही मला सांगितलेंत तर मी लग्न करीन." तिरुवल्लुवराला तसें कसें सांगतां येईल? फार तर स्वतःचा अनुभव सांगणें एवढेंच त्याला शक्य होतें. विवाह म्हणजे गूढ आहे. उद्यां काय होईल हें कोण सांगणार? तिरुवल्लुवरानें त्या साधूला कांही दिवस येथें रहा असें सांगितलें. तो साधु त्याच्याकडे राहिला. एके दिवशी तिरुवल्लुवरानें मूठभर नखें नि लोखंडाचे तुकडे यांचा भात शिजवण्यास पत्नीला सांगितलें. कांहीं एक शंका न घेतां तिनें त्या वस्तु चुलीवर चढविल्या. तिनें शिजविण्याचा प्रयत्न केला! एके दिवशीं तो साधु नि तिरुवल्लुवर जेवायला बसले होते. पत्नी वासुकी आडावर पाणी काढीत होती. भात निवालेला होता. तरी "अग ए, किती कढत हा भात! हात पोळला कीं माझा." असें तिरुवल्लुवर ओरडला. ती साध्वी निम्मे वर आलेली घागर तशीच एकदम सोडून धांवत आली नि भातावर पंख्यानें वारा घालूं लागली. आणि आश्चर्य हें कीं ती घागर तिकडे अधांतरीं तशीच लोंबकळत राहिली! एके दिवशीं तिरुवल्लुवर

भर दुपारी हातमागावर काम करीत होता. तो पत्नीला एकाएकी म्हणाला, " अग, दिवा लावून आण; हे धागे मला सांधावयाचे आहेत. " दिवसाढवळ्या पति दिवा लावून आणायला सांगतो, त्याला वेड तर नाहीं लागलें ? अशी शंकाहि त्या साध्वीच्या मनांत येत नाहीं. ती लगबगीनें दिवा लावून आणते. असा तिचा पतीवर विश्वास. अशा या सर्व गोष्टींवरून त्या साधूच्या लक्षांत आलें की पतिपत्नींमध्यें जर परम ऐक्य असेल, तिळभरहि अविश्वासाला मनांत जागा नसेल तर गृहस्थाश्रम म्हणजे सुखाचा सागर आहे. तो साधु म्हणाला, " मी सारें समजलों. " तो निघून गेला.

तिरुवल्लुवर कोष्ट्याचाहि धंदा करी. अनेक प्रांतांतून महारांचा विणण्याचा धंदा असे. पासोड्या वगैरे ते विणायचे. अजूनहि कांहीं ठिकाणीं हा धंदा आहे. विणकामाच्या धंद्यांत कपट नाहीं. अति स्वच्छ असा, पवित्र नि साधा धंदा. तामीळ आणि आंध्र प्रान्त प्राचीन काळापासून विणकामासाठी प्रसिद्ध आहेत. आजहि ती कला तेथें दिसून येते.

तिरुवल्लुवराची पत्नी मरण पावली. त्याला अति दुःख झालें. तो तिला उद्देशून म्हणतो, " हे प्रेममयि, तूं माझ्यासाठीं रुचकर जेवण तयार करीत असस; माझी आज्ञा तूं नेहमीं पाळलीस; तूं माझे पाय चुरीत असस व मला झोंप लागल्यावर तूं निजत असस; मी उठण्यापूर्वी तूं उठत असस; तुझ्याजवळ कपट नव्हतें; तुझा स्वभाव सरळ, सुंदर होता. परंतु आज मला सोडून तूं चाललीस. आता माझ्या या डोळ्यांना शांत झोंप कधीं तरी येईल का ? " पत्नीच्या निधनानंतर तिरुवल्लुवरानें संसारत्याग करून यतिधर्माची दीक्षा घेतली. जगाला उपदेश करीत तो पुढें निजधामास गेला.

" कुरल " या ग्रंथामुळें तिरुवल्लुवराचें नांव अमर झालें आहे. "ज्ञानवेट्टी" नांवाचा दुसराहि एक लहानसा ग्रंथ त्याच्या नांवावर आहे. परंतु तो ग्रंथ तितकासा महत्त्वाचा नाही. कुरलविषयीं दोन शब्द लिहिण्यापूर्वी

तिरुवल्लुवराच्या बहिणीसंबंधीं दोन शब्द सांगतों. त्याच्या या बहिणीचें नांव अवय्यार. आपल्याकडे मुक्ताबाईचे "ताटीवरील अभंग" किंवा जनाबाईचे अभंग प्रसिद्ध आहेत. त्याप्रमाणेंच अवय्यारच्या कविताहि प्रसिद्ध आहेत. तिची काव्यरचना गोड आहे. काव्यांत नीतितत्त्वें गुंफिलेलीं आहेत. लहान मुलांना 'अ', 'आ', 'इ' इत्यादि स्वर व त्याप्रमाणेंच व्यंजनें शिकवतांना उपयोग व्हावा म्हणून ते ते स्वर, तीं तीं व्यंजनें आरंभी घालून तिनें काव्यरचना केली आहे. छोटे छोटे चरण तिनें रचिले आहेत. आपण म्हणतों, "अस्वलाचा अ"; तामीळ मुलगा म्हणे, "अ, अरं सेइ." अरं म्हणजे धर्म. अरं शब्दाचा आरंभ 'अ'नें झाला आहे. "अरं सेइ" चरणाचा अर्थ धर्म करण्याची इच्छा धर. 'आ' स्वर शिकवितांना "आरु वरु सिनम्" म्हणजे "क्रोध शांत कर." हा चरण शिकवतात. 'इ' शिकवतांना "इकल वदु कलवेर" म्हणजे "दुसऱ्याचा तिरस्कार करूं नकोस." 'ई' शिकवितांना "ईवदु विलक्के" म्हणजे "भूतदया दाखवण्यास अडथळा आणूं नको" — अशी अवय्यारची हीं बालबोध नीतिसूत्रें आहेत. पूर्वीं लहान मुलांच्या बालपुस्तकांतून ही देण्यांत येत असत. अवय्यारच्या इतरहि कविता चांगल्या आहेत. एका कवितेंत ती म्हणते, "ताडाच्या झाडाचें बीं किती मोठें; झाडहि किती उंच वाढतें; परंतु छाया एका माणसासहि पुरत नाही. तेंच वडाचें झाड पहा; त्याचें बीज किती बारीक; ताडाच्या झाडाइतकें तें उंचहि नसेल; परंतु राजा व व त्याचें चतुरंग दल सर्वांना तें भरपूर छाया देईल."

अशा अवय्यारचा तिरुवल्लुवर हा भाऊ. "कुरल" ग्रंथाच्या रूपानें त्यानें जगाला बहुमोल देणगी दिली आहे. तामीळ भाषेंत या ग्रंथाला फार मान आहे. याला तामीळ वेद म्हणतात तें यथार्थ आहे. कुरल ग्रंथाचे तीन भाग आहेत. प्रथम भागांत धर्म; द्वितीय भागांत अर्थ; तृतीय भागांत काम – अशा प्रकारें वर्ण्य विषय आहेत. तिरुवल्लुवरानें चार पुरुषार्थांतील तीन पुरुषार्थांचेंच वर्णन केलें. चौथा जो मोक्ष, त्यासंबंधीं त्यानें कांही एक सांगितलें नाहीं. तो अस्पृश्य होता म्हणून

का त्याने मोक्षावर कांहीं लिहिलें नाहीं ? किंवा मोक्ष म्हणजे परमस्वरूपप्राप्ती; अवाङ्मानसगोचर अशी ती स्थिति; त्या स्थितीचें वर्णन तरी कसें करायचें — म्हणून यासंबंधी त्यानें कांहीं लिहिलें नसेल. कांही असो. चतुर्विध पुरुषार्थांपैकीं पहिल्या तिहींवरच कुरल ग्रंथांत काव्यमय वर्णन आहे. किंवा प्रथम धर्मभाग म्हणून जो आहे, त्यांत यति-जीवनावर जीं प्रकरणें आहेत, तीच मोक्षासंबंधीं, असेंहि कोणी मानतात.

या तिन्ही भागांमिळून १३३ अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायांत दहा कविता आहेत. एकूण १३३० कविता आहेत. प्रत्येक कविता दोन चरणांची आहे. ‘ कुरल ’ या शब्दाचा अर्थच मुळीं “ दोन चरणी ” असा आहे. तुळसीदासाच्या “ चौपाया ”, तशा तिरुवल्लुवराच्या या “ दुपाया ” आहेत. पहिला चरण मोठा आहे; दुसरा लहान आहे. पहिल्या चरणांत चार गण तर दुसऱ्यांत तीन. हें वृत्त अगदीं लहान आहे. तामीळ भाषेंत चरणांच्या शेवटीं यमक नसतें. चरणांच्या आरंभीं यमक असतें. पहिल्या चरणाचा आरंभ व दुसऱ्या चरणाचा आरंभ यांत यमक असतें. उदाहरणार्थ पहिल्या चरणाचा आरंभ जर “ नामम् ” असा असेल तर दुसऱ्या चरणाचा आरंभ “ कामम् ” असा असेल व यमक दिसून येईल. कधीं कधी दाम यमकहि असतें. पहिल्या चरणाचा शेवट व दुसऱ्या चरणाचा आरंभ यांत अशा वेळेस यमक असतें.

कुरलमधील हे १३३० श्लोक या दुपायी वृत्तांत आहेत. अति लहान वृत्त व त्यांत गंभीर व विशाल अर्थ खचून भरलेला असें हें काव्य आहे. कुरलमध्यें सर्वत्र एक प्रकारची भव्यता आहे. उदात्तता नि सहृदयता आहे. शेवटच्या प्रेमासंबंधींच्या भागांतहि सदभिरुचीस दुखवील असा एकहि विचार नाहीं, एकहि अश्लील ओळ नाही.

पहिल्या भागाला आरंभ करण्यापूर्वीं चार प्रकरणें आहेत. पहिल्या प्रकरणांत परमेश्वराची स्तुति आहे. हें वर्णन कांही ठिकाणीं परमेश्वरास लागू

पडतें, तर कांहीं ठिकाणी परमेश्वरास लागू न पडतां बुद्ध, महावीर यांच्या-सारख्या थोर जगद्गुरूंस लागू पडतें. बुद्ध व जैन; त्याचप्रमाणें शैव नि वैष्णव; सारेच तिरुवल्लुवरास स्वतःच्या पंथाचा असें मानतात. ख्रिस्ती धर्मीहि म्हणतात की कुरलमध्यें बायबलांतील विचारांची छायाहि दिसते. इ. सनाच्या पहिल्या शतकांत कांहीं ख्रिस्ती मिशनरी या भागांत आले होते, असें सांगण्यांत येतें. परंतु तिरुवल्लुवर हा कोणत्याहि एका धर्मपंथाचा दिसत नाहीं. सर्व धर्मांतील नीतितत्त्वांचा तो संग्राहक आहे. त्याचा धर्म हा नीति-प्रधान धर्म आहे. हा बुद्धधर्मी असावा असें कधीं कधीं वाटतें. परंतु कोणत्याच धर्माचा स्पष्ट उल्लेख या ग्रंथांत नाहीं. या पहिल्या प्रकरणानंतर दुसऱ्या प्रकरणांत पर्जन्यस्तुति आहे. कारण पर्जन्याशिवाय जगांत जीवनच उरूं शकणार नाहीं; मग धर्म तरी कोण आचरणार? पर्जन्यस्तुतीनंतर निस्संगाची थोरवी आहे. आणि चौथ्या प्रकरणांत सदाचारमाहात्म्य आहे. अशा या प्रास्ताविक चार प्रकरणांनंतर चार पुरुषार्थांतील पहिला पुरुषार्थ जो धर्म तत्संबंधीं वर्णन सुरू होतें.

या "धर्म" भागांत गृहस्थधर्म नि यतिधर्म दोहोंचें वर्णन आहे. चार आश्रमांपैकी या दोहोंचेंच वर्णन येथें आहे. तिरुवल्लुवरानें स्वतः "धन्यो गृहस्थाश्रमः" या उक्तीचा अनुभव घेतला होता. जीवनाकडे तो निराशेनें बघणारा नाहीं. त्याची दृष्टि प्रेमळ आहे, गंभीर आहे. गृहस्थधर्म, पतिपत्नी, मुलेंबाळें यांचें किती सहृदय, सुंदर वर्णन तो करतो! पोराबाळांचें लेंढार पाहून तो कंटाळत नाही. कपाळाला आठ्या घालित नाहीं. तो म्हणतो, "सर्वोत्तम आनंद म्हणजे सच्छील कान्ता आणि आनंदाची परमसीमा म्हणजे सुंदर संतति." मुलांचें फारच बहारीचें तो वर्णन करतो. "मुलाचा स्पर्श म्हणजे मोक्ष—म्हणजे परमानंद." असें तो म्हणतो. तो म्हणतो, "ज्यानें मुलाचे बोबडे बोल ऐकले नाहींत, तोच मुरली मधुर आहे, वीणा सुरेल आहे, असें म्हणेल." मुलांसंबंधीची कृतार्थता, धन्यता, इतक्या थोडक्या शब्दांत आणि अशा उत्कट यथार्थतेनें क्वचितच कोठें वर्णिलेली असेल.

गृहस्थधर्मावर 'गोड बोलणें,' 'प्रेम,' 'कृतज्ञता', 'क्षमा,' 'संयम,' 'यश,' इत्यादि चौविस प्रकरणें आहेत. त्यांतील नमुने पुढें देईन. गृहस्थधर्मानंतर यतिधर्मावरील नऊ प्रकरणें आहेत. आणि त्यानंतर पांच सर्वसामान्य अशीं प्रकरणें आहेत. यानंतर मग दुसरा पुरुषार्थ जो "अर्थ" त्याचें वर्णन सुरू होतें. "अर्थ" विभागांत राजा, त्याला लागणारे गुण, प्रधान कसे असावेत, सैन्य व शूर लोक, हेर, मित्र कसे ओळखावे, मैत्रीचें महत्त्व, जुलमाचे परिणाम, शत्रूविषयी दक्षता, अशीं प्रकरणें असून पुढें कृषि, भिकारी, दान, यश, कुटुंबाला मोठेपणा मिळवून देणें, इत्यादि सुंदर प्रकरणें आहेत. ही प्रकरणें केवळ राजाला उद्देशून नाहीत. सर्वसामान्य जनतेसाठीहि ती आहेत. आपल्याकडे "अर्थ" या शब्दांत समाजाची भरभराट, समाजाचा सर्वांगीण विकास, असा व्यापक अर्थ असे. राजकीय अर्थापेक्षां आर्थिक अर्थ त्यांत अधिक असे. आजकाल रशियासारख्या देशांत सरकार म्हणजे अर्थशास्त्राची व्यवस्था लावणारं, हाच अर्थ रूढ होत आहे. हिंदुस्थानचें ब्रि. सरकार म्हणजे सुसंघटित भांडवलशाही, असें आपण म्हणतों. असो. समाजाची भरभराट नि सुस्थिति असायला जे जें आवश्यक, तें तें सारें "अर्थ" संबंधींच्या प्रकरणांतून आहे. प्रजानुरंजक, दक्ष नि प्रेमळ असा राजा; उद्योगी, कृषिकुशल लोक; भिकाऱ्यांचा सुळसुळाट नसणें; शौर्य, धैर्य, त्याग, इत्यादि गुण; या सर्वांचें वर्णन या विभागांत आहे. अर्थानंतर काम-विभाग येतो. यांत प्रिया नि प्रियकर यांचें वर्णन आहे. एक मनुष्य एका तरुणीला पाहतो. दोघांची दृष्टिभेट होते नि प्रेम जडतें. प्रेमविव्हळ होतात. ताडाच्या अणकुचीदार पानांच्या फांद्यांवरून ती दोघं स्वतःची मिरवणूक काढतात. कदाचित् तिकडे त्या वेळेस अशी पद्धत असेल. "आम्ही कांट्यावरसुद्धां निजूं. परतु एकमेकांचा वियोग सहन करणार नाही." असाहि ह्यांत हेतु असेल. त्या दोघांची ही निष्ठा पाहून लोक म्हणतात, "यांचें परस्परांवर इतकें प्रेम आहे तर यांचे आईबाप यांचें लग्न कां लावित नाहींत ?" पुढें विवाह होतो. परंतु प्रियकराला लढाईला जावें लागतें. वियोग होतो. या विरहावस्थेंतील कोमल भावना, हृद्य विचार, येथें

अति हळुवारपणानें रंगवलेले आढळतील. पुढें प्रेमकलहाचें वर्णन आहे आणि काम-भाग संपतो. या भागांत कोठेंहि अश्लीलता नाही. मर्यादेचें अतिक्रमण नाहीं. हृदयंतील भाव अति गोड रीतीनें वर्णिलेले आहेत.

कुरलमधील सुंदर कल्पना, सुंदर उपमा, अभिनव विचार, यांचीं उदाहरणें किती द्यावी ? १३३० कविता म्हणजे सारे अष्टपैलू हिरे आहेत. प्रत्येक कविता म्हणजे घांसूनपुसून ठेवलेला हिरा आहे. एक शब्द कमीअधिक करतां येणार नाही, इकडचा तिकडे करतां येणार नाही. आपण थोडी गोडी चाखूं या.

पहिल्या धर्मविभागांत आणि अन्यत्रहि प्रेम करणें, भूतदया, परोपकार, इत्यादींवर सुरेख विचार आहेत. कवि म्हणतो : “प्रेमाचे दरवाजे बंद करणारा अडसर कोठें आहे ? परस्परांवर प्रेम करणाऱ्यांच्या डोळ्यांत गोळा होणारे ते अश्रुबिंदु परस्परांच्या हृदयांतील प्रेमसिंधूचें अस्तित्व उद्घोषवित असतात.” “प्रेमाची माधुरी चाखतां यावी म्हणून हा जीवात्मा पुनःपुन्हां अस्थिचर्ममय पिंजऱ्यांत सुखानें बद्ध होतो.” अन्यत्र तिरुवल्लुवर म्हणतो: “ज्याच्या हृदयाला प्रेम माहीत नाहीं, तो वठून गेलेल्या झाडाप्रमाणें आहे.” दुसऱ्याचें मन दुखवूं नये असें सांगतांना हा कवि म्हणतो: “तुझ्या एका शब्दानेंहि जर दुसऱ्यास दुःख झालें, तर तुझ्या सगळ्या सद्गुणांची माती झाली समज.” “भाजलेली जागा बरी होते; परंतु जिभेनें भाजलेली जागा कधी वाळत नाहीं.” “गोड वाणीनें कार्य होईल हें दिसत असतांहि मनुष्य कठोर वाणीनें कां बरें बोलतो ?” तो अन्यत्र म्हणतो : “जगाचे उपकार नसतां जगावर आपण उपकार केले तर त्याची फेड कशानेंहि होणार नाही.” मैत्रीचें वर्णन करतांना हा महाकवि म्हणतो : “कमरेचें वस्त्र वाऱ्यानें उडूं लागतांच आपला हात लगेच तें सांवरण्यासाठी तयार असतो; त्याप्रमाणें मित्राची बाजू उघडी पडतांच खरा मित्र पांघरुण घालतो.” किती समर्पक नि बरोब्याचा दृष्टान्त ! शत्रु वरून कसाहि दिसला तरी आपण फसूं नये हें सांगतांना किती सुंदर वर्णन आहे : “बाण सरळ

दिसतो; परंतु प्राण घेतो. वीणा वांकडी असते; परंतु मधुर बोलते. " किती छान दृष्टान्त! तसेंच हें एक वर्णन पहा: " फुलाच्या टवटवीतपणावरून त्याला किती पाणी घातलें असेल याची कल्पना येते; त्याप्रमाणें माणसाच्या वैभवावरून त्यानें किती श्रम केले असतील हें समजून येतें. " प्रियेचें वर्णन या थोर कवीनें थोडक्यांत किती बहारीनें केलें आहे तें पहा : " तिचे बाहु कळकीप्रमाणें आहेत; हास्य मोत्याप्रमाणें आहे; अंग पानाप्रमाणें नितळ आहे; श्वास सुगंधी नि मधुर आहे; आणि डोळे निळ्या नभाप्रमाणें असणारे; नील कमलहि त्यांच्यापुढें फिकें आहे; हंसाचीं पिसें आणि जाई-जुईचीं फुलेंहि तिच्या पायांना बोचतील. " किती साधें वर्णन—परंतु किती गोड व मोहक!

उदात्त विचार, समर्पक दृष्टान्त, मनोहर वर्णनें, याविषयी तिरुवल्लुवराची ख्याति आहेच. परंतु थोडक्यांत पुष्कळ अर्थ आणण्यासाठी त्याची विशेषच प्रसिद्धि आहे. प्राचीन तामीळ कवींनी कुरल ग्रंथाची स्तुति करतांना हा गुण प्रामुख्यानें सांगितला आहे. एका समकालीन कवीनें कुरलविषयीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे : " मोहरी पोखरून तिच्यांत सप्त समुद्र भरावे त्याप्रमाणें कुरल ग्रंथांतील दुपायी श्लोकांत अनंत अर्थ भरलेला असतो. " परंतु तिरुवल्लुवराची बहीण याच्याहि पुढें जाऊन म्हणते, " मोहरीचा दाणाहि मोठा असतो. परमाणु पोखरून त्यांत सात समुद्र भरावे तसें माझ्या भावाचें काव्य आहे. " दुसरा एक कवि म्हणतो, " तृणपर्णावरील चिमण्या दंवबिंदूत गगनचुंबी ताडाच्या झाडाचें प्रतिबिंब असते, त्याप्रमाणें कुरलमधील या लहान लहान श्लोकांत महान् अर्थ सांठवलेला असतो. " थोडक्यांत अपार अर्थ सांगण्याचीं आपण कांहीं उदाहरणें पाहूं या. एके ठिकाणी हा कवि म्हणतो : "मनुष्याची खरी संपत्ति म्हणजे त्याचीं मुलेंबाळें ". "पित्याचें पुत्रासंबंधींचें कर्तव्य म्हणजे पुत्राला विद्वत्परिषदेंत पहिला मान मिळण्यास लायक करणें. " पुत्राचें वागणें कसें असावें तर त्याच्या पित्याला सर्वांनीं विचारावें, " कोणत्या

पुण्याईमुळें तुम्हांला असा पुत्र लाभला ?” “मी माझ्या कुटुंबाला कळा चढवीन अशी प्रतिज्ञा करून जो बाहेर पडतो त्याच्यासाठीं देव-सुद्धां कमर कसून रक्षणार्थ सज्ज असतात.” “ज्या डोळ्यांत माधुर्य नाहीं तो खांच होय.” “जुलमाखाली विव्हळणाऱ्यांचे अश्रू राजाचें राज्य बुडवतात.” “तो काळ मध्यरात्रीं होता, परंतु आज नाहीं; असें हें जग आहे.” “थोरांची संपत्ति गांवाच्या मध्यभागी चव्हाटयावर फळभारानें वांकलेल्या वृक्षासारखी असते.” “स्मित म्हणजे मैत्री नव्हे; हृदयाला हंसवणारी प्रीति म्हणजे मैत्री.” “वियोग व्हावा याबद्दल बोला; परंतु लौकरच परत येण्याविषयी बोलणार असाल तर तोंपर्यंत जिवंत राहाणाऱ्याजवळ बोला.” “माझ्या जीवनाच्या एका बाजूला प्रेम आहे तर दुसऱ्या बाजूला विनय आहे: दोहोंमुळें मी चिरडून जात आहें.” “अरे लबाडा ! साऱ्या स्त्रिया तुला डोळ्यांनीं खाऊनपिऊन टाकतात. मला नको जा तुझें भेटणें.” अशा प्रकारचीं बव्हर्थगंभीर सुंदर वाक्यें या कुरल काव्यांत सर्वत्र माणिकमोत्यांप्रमाणें विखुरलेलीं आहेत. देश, मैत्री, शेतीचें महत्त्व, कुटुंबाला तेजकळा चढविणें, भिक्षा, इत्यादि विषयांवरचीं प्रकरणें स्वतःच वाचावीं व त्यांतील अवीट गोडी चाखावी. अहिंसा, मांसाशनत्याग, सभ्यता, इत्यादींचेंहि अतिसुंदर वर्णन आहे. धैर्य, त्याग, यांचें हें वर्णन पहा: “जो दुःखांनी दुःखी होत नाहीं, तो दुःखाला दुःखी करतो.” या वाक्यानें मी तर केवळ मुग्ध होऊन गेलों होतों. “जो शेतकरी वरचेवर आपल्या शेतांकडे जात नाहीं, त्याचीं शेतें पत्नीप्रमाणें त्याच्यावर रुसतील.” “शेतकरीच स्वतःच्या श्रमाची भाकर खातो; बाकीचें सारें जग मिंधें आहे.” “भरघोस कणसांच्या छायेंत विश्रांति घेणारीं सस्यशामल शेतें ज्या राज्यांत आहेत, त्या राजाच्या छत्रा-समोर इतर सर्व राजांचीं छत्रें नमतील.” “मला पोटाला मिळत नाहीं हे शब्द ऐकून धरणीमाता हंसते.” अशीं रसमय, समर्पक वर्णनें कोठवर देऊं ? खरोखर कुरल ग्रंथ म्हणजे रत्नांची खाण आहे.

तिरुवल्लुवर स्वावलंबनाची महति गाणारा आहे. "कष्ट करून कुटुंबाची भरभराट करणारा, तो खरा मुमुक्षु" असें तो म्हणतो. कपट, असूया, इत्यादींची त्याला चीड आहे. गांधीजीच्या तत्त्वज्ञानाचीं सारीं सूत्रें येथें सांपडतील. शेतीसारखा साधा सुंदर धंदा, प्रेम, परोपकार, भूतदया, सत्य, शत्रूवर प्रेम करणें, जीवनाचा असा थोर आदर्श येथें मांडलेला आहे. साधी राहणी नि उच्च विचारसरणी, हेंच तिरुवल्लुवराचें ध्येय आहे. त्याच्या काव्यांतील शब्दरत्नें तामीळ प्रांतांत आबालवृद्धांच्या तोंडीं असतात. कुरल ग्रंथांत बुद्ध, ख्रिस्त, यांच्या उपदेशासारखा सुंदर उपदेश आहे; चाणक्य, महाभारत, यांच्या शिकवणीसारखें थोर अर्थशास्त्र येथें आहे; तर कालिदासा-सारख्या वागीश्वरांच्या तोलाचें प्रेमभाव व्यक्त करण्याचें येथें सामर्थ्य आहे. थोडक्यांत भरपूर अर्थ प्रकट करण्यांत हा कवि केवळ अद्वितीय आहे. कृष्णाच्या चिमुकल्या तोंडांत विश्व दिसे, तसें या काव्यांतील छोट्या छोट्या श्लोकांत आहे. १७५ वर्षांपूर्वीं कॉन्स्टंटिअस नांवाच्या एका जेसुईट मिशनऱ्यानें या ग्रंथाचें लॅटिनमध्यें भाषान्तर केलें. पुढें एरियल व ड्यूमांट यांनीं फ्रेंच भाषेंत भाषान्तरें केलीं. एरियलनें या ग्रंथाची खूप स्तुति केली आहे. तो म्हणतो, "मानवी विचाराचें परमोच्च आणि अति विशुद्ध असें येथें दर्शन आहे." तो पुन्हां म्हणतो, "ग्रीक लोकांत होमरचें काव्य ज्याप्रमाणें परमोच्च आणि थोर आदर्श, त्याप्रमाणें तामीळ भाषेंत या ग्रंथाचें महत्त्व आहे." पुढें जर्मन व इंग्रजी भाषांतूनहि या ग्रंथाची भाषान्तरें झालीं.

मी ज्या पुस्तकावरून त्रिचनापल्लीच्या तुरुंगांत हें भाषान्तर केलें तें पुस्तक म्हणजे श्री. एस्. एस्. अय्यर यांनी केलेलें इंग्रजी भाषान्तर होय. अय्यर हे महान् देशभक्त होते; क्रान्तिकारक मताचे होते. विनायकराव सावरकरांचे ते मित्र होते. १९१५ मध्यें एमडेन हें जर्मन लढाऊ क्रूझर मद्रास किनाऱ्यावर गोळे फेंकित असतां जर्मनांशीं अय्यरांचा संबंध असावा असा सरकारला संशय आला. अय्यर पॉंदिचरीला जाऊन राहिले. तेथें फ्रेंच सरकारनेंहि त्यांना सतावलें. पॉंदिचरीस असतांना कुरलचें हें उत्कृष्ट इंग्रजी

भाषान्तर त्यांनी केलें. ते तामीळ भाषेचे पंडित होते. कंभन्‌च्या रामायणा-वरहि त्यांनी विद्वत्ताप्रचुर निबंध लिहिलेले आहेत. देशभक्त अय्यर यांनी आपल्या पुस्तकाच्या शेवटी "माझ्या ह्या भाषान्तरावरून सर्व हिंदी भाषामध्यें या थोर ग्रंथाची भाषान्तरें व्हावी" अशी इच्छा प्रदर्शिली आहे.

कुरल वाचून आपल्या लक्षांत येईल कीं भारतीय संस्कृति सर्वत्र एकच आहे. या विशाल देशाचें हृदय एकाच रक्तानें भरलेलें आहे. एकाच नाडीचे ठोके सर्वत्र आहेत. आपण इतर प्रांतीय भाषांतील वाङ्मय वाचलें म्हणजे आपणांस कळून येईल की, प्रादेशिक अंतर असले तरी मनानें आपण सारे जवळच आहोंत, एक आहोंत. थोर विचार-स्रष्टे जगाचे असतात. तिरुवल्लुवर हा केवळ तामीलनाडचा नाही, तर तो भारताचा आहे; एवढेंच नव्हे तर सर्व जगाचा आहे. साऱ्या मानवजातीला उन्नत करण्यासाठी त्यानें लिहिलें. जातीनें अस्पृश्य, धंद्यानें कोष्टी; परंतु विचारांची सोज्वल माणिक-मोतीं देणारा हा तिरुवल्लुवर मन मोहून घेतो. "याच्या तोंडानें वेद बोलले, देवी सरस्वती बोलली" असे अनेक कवींनी म्हटलें आहे. या ग्रंथावर अनेक टीका आहेत. त्या सर्वांत परिमेलारहर याची टीका सुप्रसिद्ध आहे. हा टीकाकार तेराव्या शतकांत झाला. या टीकेसह कुरलची आवृत्ति मिळते. असो.

मी ज्यांच्या इंग्रजी भाषान्तरावरून हें मराठी भाषान्तर केलें, त्या देशभक्त अय्यरांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. येथें तुरुंगांतील कांही तामीळ मित्रांनी मूळ कुरलमधून कांहीं कांही ठिकाणी मला नीट अर्थ समजवून दिला. त्यांचाहि मी ऋणी आहें.

त्रिचनापल्ली तुरुंग
१७।१२।१९३०

**पां. स. साने**

या भाषान्तरास सतरा वर्षें होऊन गेलीं. हिंदीमध्यें "तामीळ वेद" या नांवानें या ग्रंथाचें भाषान्तर आहे. परंतु "धर्म व अर्थ" या दोनच भागांचें त्यांत भाषान्तर आहे. प्रेमविषयक भाग सारा गाळलेला आहे. परंतु प्रेमविषयक भागांत अश्लीलता नाही. तो भागहि मनोहर आहे. मीं सर्वच भागांचें भाषान्तर केलें होतें. इतक्या वर्षांनीं का होईना हें माझें भाषान्तर प्रसिद्ध होत आहे. प्रकाशकांना धन्यवाद.

शारदाश्रम, बोर्डी.
२८।९।४८

—**सानेगुरुजी**

# आ रं भ

## सर्ग १ : प्रभुस्तुति

१ अकार ज्याप्रमाणे शब्दसृष्टीचा आरभ, त्याप्रमाणें तो पुराणपुरुष चराचराचा आरंभ आहे.

२ त्या ज्ञानस्वरूप परमात्म्याची तूं पूजा करणार नसशील, तर तुझ्या या ज्ञानाचा उपयोग काय ?

३ भक्तांच्या हृदयपुष्पांवरून चालणाऱ्या त्या प्रभूच्या चरणांचा जो आश्रय करतो, तो चिरंजीव होतो.

४ तिरस्कार वा स्वीकार यांच्या अतीत असणाऱ्या त्या प्रभूच्या चरणांशीं चिकटून बसलेले ते भक्त बघ; जीवनांतलि आधिव्याधि त्यांना कधीं स्पर्शूं शकणार नाहीत.

५ प्रभूचें स्तवन मनापासून करणारे ते भक्त बघ; भल्याबुऱ्या कर्मांचीं फळें अतःपर त्यांना भोगावीं लागणार नाहींत. ते मुक्त होतील.

६ ईश्वरानें घालून दिलेल्या सन्मार्गानें जे जातात, इंद्रियांच्या इच्छा ज्यांनीं जाळून टाकल्या आहेत, त्यांना पुनर्जन्म नाही.

७ अद्वितीय असा जो तो प्रभु, त्याच्या पद्कमलाचा आश्रय करणारेच दुःखमुक्त होतात.

८ सत्यज्ञानाचा सिंधु असा जो योगीन्द्र, त्याच्या चरणाशीं जे जडले ते या प्रक्षुब्ध भवसागरांतून तरून जातात.

९ अष्टगुणसंपन्न अशा त्या प्रभूच्या चरणांना जो वंदन करीत नाही, त्या चरणांपुढें ज्याचें डोकें लवत नाही, तें डोकें नसून खोकें आहे.

१० प्रभुचरणाचा आश्रय करणारेच जन्ममरणाचा फेरा चुकवूं शकतात. इतरांना तें शक्य नाहीं.

## सर्ग २ : पर्जन्यस्तुति

११ न चुकतां येणारी ही पर्जन्यवृष्टि पृथ्वीचें धारण करते. ही पर्जन्यवृष्टि म्हणजेच अमृत असें समज.

१२ चवीला गोड वाटणारें हें नानाप्रकारचें अन्न म्हणजे पर्जन्याची मानवाला मिळालेली देणगी आहे; आणि तें पाणीहि मानवाच्या अन्नांतलि, आहारांतील भाग बनतें.

१३ पाऊस न पडेल तर ही समुद्रवलयांकित पृथ्वी उग्र दुष्काळानें उध्वस्त होईल.

१४ आकाशांतील हे झरे जर आटले तर शेतकरी हातांत नांगर धरणार नाहीं.

१५ पाऊसच नाशहि करतो; पाऊसच जगवतो, तगवतो.

१६ आकाशांतून सरी न येतील तर हें चिमणें गवतहि वाढणार नाही.

१७ समुद्राचें पाणी वर घेऊन तें पुन्हां खाली सोडण्याचें आकाशानें नाकारलें, तर हे प्रचंड सागरहि नासून जातील.

१८ जर आकाश कोरडें राहिलें, तर देवांना हविर्भाग मिळणार नाहीं, पृथ्वीवर उत्सवसमारंभ होणार नाहीत.

१९ आकाशानें पाणी पाठविलें नाही, तर या विशाल पृथ्वीवर दया, तपस्या, हीं दिसणार नाहीत.

२० पाणी नसेल तर जीवनच नाही. म्हणून संतांचें थोर वर्तनहि अंतीं पावसावरच अवलंबून आहे.

## सर्ग ३ : निःसंगाचा मोठेपणा

२१ भोगविलास सोडणारे आणि प्रखर वैराग्यानें राहणारे ते लोक बघ; इतर सर्व चांगल्या गोष्टींपेक्षां शास्त्रांपुराणांना अशांचीच कीर्ति गायला आवडते.

२२ विरक्त व निःसंग पुरुषाच्या मोठेपणाचा पार तुला लागणार नाही. तसें तुला करतां आलें, तर आजपर्यंतच्या सर्व मृतांचीहि मोजदाद तुला करतां येईल.

२३ इहपराची तुलना करून ज्यांनीं ऐहिकाचा त्याग केला असे ते लोक बघ; त्यांच्या तेजानें ही पृथ्वी धवळली आहे.

२४ अंकुशानें हत्तीला ताब्यांत ठेवावें, त्याप्रमाणें आपल्या इंद्रियांना ताब्यांत ठेवणारा तो नरपुंगव पहा. स्वर्गीय शेतांत पेरणी करण्यासारखा तो दाणा आहे.

२५ ज्यानें वासनांवर जय मिळविला, त्याची शक्ति जाणण्याची तुला इच्छा आहे ? तर मग देवेन्द्राकडे पहा. हें एक उदाहरण बस्स आहे.

२६ असाध्याला साध्य करून घेणारे धन्य होत. तेच खरे महात्मे. ज्यांना हें साधत नाहीं, ते खरे दुबळे.

२७ शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध, या पंचेंद्रियांच्या विषयांची खरी किंमत ज्यानें ओळखली आहे असा तो पुरुष पहा. साऱ्या जगावर तो सत्ता गाजवील.

२८ ज्याच्या वाणीत अपार सामर्थ्य आहे, अशा या पुरुषाच्या मोठेपणाचीं स्तोत्रें वेदपुराणें गात असतात.

२९ वैराग्याच्या दृढ आधारावर जे उभे आहेत, त्यांची वक्रदृष्टि कोण सहन करील ?

३० ब्राह्मण तो, जो त्यागी व निःसंग आहे. याच दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें पाहिजे. कारण प्राणिमात्राविषयीं त्याला दया असते.

## सर्ग ४ : सदाचार-माहात्म्य

३१ सदाचारानें मोक्षहि मिळतो व अर्थप्राप्तिहि होते. असें जर आहे, तर सदाचाराहून अधिक हितकर असें दुसरें काय बरें आहे ?

३२ सदाचाराहून अधिक चांगलें दुसरें कांही नाही; सदाचार-त्यागासारखें हानिकारक दुसरें कांही नाहीं.

३३ सत्कर्मे करण्यांत कधी खंड पाडूं नकोस; सारी शक्ति वेंचून सत्कर्मे करीत रहा.

३४ मनानें शुद्ध रहा. हृदयशुद्धीत सारा सदाचार सामावलेला असतो; बाकी गोष्टी म्हणजे दंभ होय.

३५ मत्सर, क्रोध, लोभ आणि कठोर वाणी, यांचा त्याग कर. सदाचार-संपादनाचा हा राजमार्ग आहे.

३६ हळूहळू मी सदाचारी होईन असें नको मनांत म्हणूं. विलंब न लावतां एकदम सदाचारास आरंभ कर. मरणाच्या दिवशी सदाचार हाच तुझा चिरमित्र असेल.

३७ मनुष्य सदाचारी असल्यावर त्याचें कोणतें कल्याण होईल, तें नको मला विचारूं. पालखीत बसणारा नि पालखी खांद्यावरून वाहणारा पहा म्हणजे झालें. ( पूर्व-सुकृताचा परिणाम )

३८ एक क्षणहि फुकट न दवडतां जर तूं जन्मभर सत्कृत्यें करीत राहशील, तर जन्ममरणाचा सारा रस्ता चालून गेल्याप्रमाणें होईल.

३९ सदाचारानें जो आनंद मिळतो, तोच आनंद खरा; बाकीचे आनंद आणि बाकीचीं सुखें हीं शेवटीं रडवतात, फजीत करतात.

४० तेंच कृत्य करावें, जें सदाचारमूलक आहे. शहाणे लोक ज्यामुळें तुझी निंदा करतील, असें कांहीहि करूं नकोस.

# भाग १ ला : गृहस्थजीवन

## सर्ग ५ : कौटुंबिक जीवन

४१ इतर तीन आश्रमांचा मुख्य आधार गृहस्थाश्रम हा आहे.

४२ पितरांचा नि अनाथांचा गृहस्थाश्रमी मनुष्य मित्र आहे. संन्याश्यांचा तो सखा आहे.

४३ गृहस्थाची पांच कर्तव्ये आहेत : १ पितृ-तर्पण २ देवतर्पण ३ अतिथि सत्कार ४ आप्तेष्टमित्रांस साहाय्य आणि स्वतःचीहि काळजी घेणें.

४४ शहाण्या लोकांनीं नांवें ठेवूं नये म्हणून जो जपून वागतो, स्वतः जेवण्यापूर्वी जो दान करतो, अशाचा वंशतंतु कधीं तुटत नसतो.

४५ ज्या घरांत सदाचार आहे आणि भरपूर प्रेम आहे, तें घर कृतार्थ झालें.

४६ गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें नीट पार पाडाल, तर दुसऱ्या आश्रमांची काय गरज ?

४७ गृहस्थाश्रमांतील सारी कर्तव्यें पार पाडणारा, सदाचारानें कुटुंब चालवणारा, तो खरा साधक होय. मुमुक्षूंत त्याचें स्थान पहिलें आहे.

४८ दुसऱ्यांना त्यांच्या व्रतपालनांत जो साहाय्य देतो व स्वतः सदाचारानें वागतो, असा गृहस्थाश्रमी मनुष्य उपासतापास करून ईश्वराची प्रार्थना करित बसणाऱ्याहून अधिक थोर संत होय.

४९ सदाचार हा विशेषेंकरून गृहस्थाश्रमांतच असतो; सच्छील हें वैवाहिक जीवनाचें भूषण आहे.

५० यथायोग्य वागणारा गृहस्थधर्मी मनुष्य मनुष्यांतील देवच होय.

## सर्ग ६ : सद्गुणी भार्येचं सुख

५१ पतीच्या शक्तीबाहेर जी खर्च करित नाही, पत्नीला आवश्यक असे सारे सद्गुण जिच्याजवळ आहेत, तीच संसारांत खरीखुरी मदत करूं शकेल.

५२ पत्नीधर्मापासून पत्नी च्युत झाली, तर बाकीचीं सुखें असून नसल्यासारखीच होतात.

५३ अनुरूप नि योग्य पत्नी असल्यावर कसली आहे वाण ? परंतु पत्नीमध्यें योग्यता नि पात्रता नसेल, तर इतर धनसंपदाहि असून तरी काय उपयोग ?

५४ जर पत्नी पातिव्रत्याच्या सामर्थ्यानें संपन्न असेल तर तिच्याहून अधिक धीरोदात्त असें जगांत दुसरें काय आहे ?

५५ सकाळी उठल्यापासून देवांचीहि पूजा न करतां जी पतिदेवाची पूजा करूं लागते, अशा सतीचें सामर्थ्य पहा. आकाशांतील मेघसुद्धां तिची आज्ञा पाळतात.

५६ सद्गुण नि सत्कीर्ति यांना जपणारी, प्रेमळपणानें पतीची काळजी वाहणारी ती खरी गृहिणी होय.

५७ घरांत कोंडल्यानें काय होणार आहे ? स्त्रीचे सद्गुण तिच्या सतीत्वाचें उत्कृष्ट रक्षण करतात.

५८ अनुरूप पुत्राला जन्म देणारी ती माता पहा. अहाहा ! देवलोकीं तिला परमोच्च पद मिळत असतें.

५९ ज्याच्या घराची अब्रू गेली, त्याची दशा काय सांगावी ? उपहास करणाऱ्यांसमोर सिंहाप्रमाणें छाती वर करून, मान वर करून त्याला कधीहि चालतां येणार नाहीं.

६० घरांतील परमानंद म्हणजे गृहिणीचें सच्छील आणि घराचें परम भाग्य म्हणजे सत्संतति.

## सर्ग ७ : संतति

६१ शहाणीं व हुशार मुलें याच्यासारखें सुख नाहीं.

६२ ज्याची मुलेंबाळें धुतल्या तांदुळाप्रमाणें निर्दोष आहेत, त्याला सात जन्मांत दुःख नाहीं, त्याला सात जन्मांत अशुभ शिवणार नाही.

६३ मुलेंबाळें हीच माणसाची खरी संपत्ति. मुलेंबाळें स्वतःच्या कृत्यांनी जें पुण्य मिळवतील, तें आईबापांना लाभत असतें.

६४ मुलाच्या कोंवळ्या हातांनी इकडे तिकडे विखुरलेलें अन्न अमृताहूनहि गोड असतें.

६५ मुलाचा स्पर्श हें शरीराचें सुख आहे, त्याचे बोबडे बोल हें कानांचें सुख आहे.

६६ ज्यांनी आपल्या लहानग्यांचे बोबडे बोल ऐकले नाहीत, तेच बांसरी मधुर असते, वाणी गोड असते, असें म्हणतात.

६७ पित्याचें पुत्रासंबंधीं कर्तव्य कोणतें ? सभेंत पहिल्या रांगेंत बसण्याइतपत त्याला लायक करणें.

६८ आपल्या मुलांनीं आपल्याहून मोठें व्हावें असें पित्याला वाटत असतें.

६९ पुत्र जन्माला आला एवढ्यानेंहि मातेला आनंद होतो. परंतु मुलाची कीर्ति ऐकून तिला जो आनंद होतो, त्याला सीमा नाही.

७० पुत्राचें पित्यासंबंधीं कर्तव्य कोणतें ? कोणत्या पूर्वपुण्यानें असा पुत्र तुम्हांला मिळाला, असें सारें जग आपल्या पित्याला विचारील अशा रीतीनें वागणें.

## सर्ग ८ : प्रेम

७१ प्रेमाचे दरवाजे बंद करणारा अडसर कोठें आहे ? परस्परांवर प्रेम करणाऱ्यांच्या डोळ्यांत जमणारे अश्रु साऱ्या जगाला प्रेमाचें अस्तित्व जाहीर करित असतात.

७२ प्रेम न करणारे केवळ स्वतःपुरते जगतात; परंतु प्रेम करणारे स्वतःचीं हाडेंहि दुसऱ्यांच्या साहाय्यासाठी देऊन टाकतील.

७३ प्रेमाची माधुरी पुन्हां चाखायला मिळावी म्हणून या अस्थिचर्ममय पिंजऱ्यांत बद्ध व्हायला आत्मा पुन्हां तयार झाला, असें ते म्हणतात.

७४ प्रेमामुळें साऱ्या मानवजातीबद्दल आपल्याला ममता वाटते, प्रेमामुळें आपण कोमल बनतों आणि हृदयाच्या कोमलतेंतूनच मैत्रीचा अमोल ठेवा जन्माला येतो.

७५ गतकाळांतील प्रेमळ कोमळपणाचें देवानें दिलेलें बाक्षिस म्हणजेच थोरां-मोठ्यांचे मिळणारे मंगल आशीर्वाद होत.

७६ सद्गुणी लोकांविषयींच फक्त प्रेम दाखवावें, असें म्हणणारे मूर्ख आहेत. कारण दुष्टांपासूनहि बचाव करणारा प्रेम हाच एक खरा मित्र आहे.

७७ केवळ मांसमय प्राण्यास ( चरबीयुक्त प्राण्यास ) सूर्य कसा जाळतो तें पहा. त्याप्रमाणें जो प्रेम करणार नाही, त्याला सदाचार जाळील.

७८ प्रेम माहीत नसणाऱ्याचें हृदय पहा. वाळवंटांतील सुकलेल्या खोडास जेव्हां अंकुर फुटतील, तेव्हांच अशा माणसास भाग्य म्हणजे काय ते कळेल.

७९ प्रेम हें हृदयाचें नि जीवनाचें भूषण आहे. प्रेम नसेल तर बाहेरचें सौन्दर्य काय कामाचें ?

८० प्रेम म्हणजे जीवनाचें जीवन. ज्याच्याजवळ प्रेम नाही तो केवळ अस्थि-चर्ममय सांगाडा होय.

## सर्ग ९ : अतिथि-सत्कार

८१ धडपड करून शहाणे लोक घरें कां बांधतात ? पाहुण्याला जेवण देतां यावे व वाटसरूला आधार देतां यावा म्हणून.

८२ ओटीवर अतिथि आलेला असतां, अमृताचा घोट असला तरीहि गृहस्थ एकट्याने पिणार नाही.

८३ आलेल्या अतिथीचा सत्कार करायला जो चुकत नाही, त्याला अशुभ शिवत नाहीं.

८४ आलेल्या अतिथीचा जो हंसतमुखानें सत्कार करतो, त्याच्या घरी राहण्यांत लक्ष्मीला कृतार्थता वाटते.

८५ जो आधी अतिथीला जेवूं घालतो आणि अवशिष्ट स्वतः खातो, त्याला कधी तरी पेरण्याची जरूरी भासेल का ? ( सारें भाग्य त्याच्याकडे आपो-आप येईल. )

८६ जाणाऱ्या अतिथीची नीट काळजी जो घेतो आणि आलेल्या अतिथीची सेवा करतो, त्याचा देवहि सत्कार करितात.

८७ अतिथि सत्काराविषयी नाना गोष्टी आम्ही सांगत नाहीं; तसें सांगणें कमी पणाचे आहे. आतिथि-सत्कार म्हणजे महापुण्य एवढें खरें. आणि आतिथि ज्या मानानें थोर, त्या मानाने होणारा यज्ञहि मोठा.

८८ जो अतिथि-सत्कार-रूप यज्ञ करित नाहीं, त्याला एके दिवशी दुःख करित बसण्याची पाळी येईल. तो म्हणेल, मी मरेमरेतों काम केलें, धनदौलत सांठ-विली, परंतु उपयोग काय ? मला सुखसमाधान द्यायला कोणी नाही.

८९ अतिथि-सत्कार करणार नसाल, तर गजान्तलक्ष्मी दारी असूनहि खरोखर तुम्ही दरिद्रीच आहांत. मूर्ख लोकांचीच फक्त अशी स्थिति आढळते.

९० सोनटक्याचें फूल वास घेण्यानें, नाकाजवळ नेण्यानेंच कोमेजून जातें; परतु अतिथीकडे नुसतें पहाण्यानेंहि त्याचें हृदय फुटून जाण्याचा संभव असतो.

## सर्ग १० : न खुपणारी वाणी

९१ सुस्वभावी, सदाचारी मनुष्याची वाणी कोमल व प्रेमळ असते. तिच्यांत दंभ नसतो, वंचना नसते.

९२ उदाराच्या मोठ्या देणगीपेक्षांहि गोड वाणी नि प्रसन्न व प्रेमळ दृष्टि अधिक श्रेष्ठ आहेत.

९३ हृद्यापासून येणाऱ्या कोमल नि प्रेमळ शब्दांत, त्याचप्रमाणें प्रसन्न दृष्टीत सदाचाराचें माहेर असतें.

९४ सर्वांजवळ जो गोड बोलेल, त्याला दुःखवर्धक दारिद्र्य कधी शिवणार नाही.

९५ विनय आणि गोड वाणी हींच माणसाची खरी भूषणें; दुसरीं नाहीत.

९६ जर तुझे विचार पवित्र असतील, तुझी वाणी मृदु व दयामय असेल, तर तुझ्या मधील असत् भाग कमी होतं आहे आणि सत्प्रवृत्ति वाढत आहेत असें समज.

९७ प्रेमळ व हितकर बोलण्यानें मित्र जोडले जातात आणि भाग्य घरी येतें.

९८ ज्या वाणीमध्ये प्रेम आहे, दया आहे; ज्या वाणीत क्षुद्रता नाही; त्या वाणीनें इहपरलोकी कल्याण होतें.

९९ मधुर व प्रेमळ वाणीनें मिळणारें सुख चाखल्यावरहि मनुष्य कठोर बोलायला कसा धजतो ?

१०० गोड बोलण्यानें काम होत असतांहि जो कठोर बोलतो, तो पिकलेलें फळ टाकून कच्चें पसंत करतो, असें नाही का ?

## सर्ग ११ : कृतज्ञता

१०१ जगाचे उपकार नसतांहि जगावर उपकार करणें, त्याची फेड स्वर्गपृथ्वी दिल्यानेंहि होणार नाही.

१०२ वेळेवर केलेला उपकार नि दाखविलेली दया, हीं लहान असलीं तरीहि त्यांचें वजन या साऱ्या पृथ्वीच्याहूनहि जास्त आहे.

१०३ प्रत्युपकाराची अपेक्षा न ठेवतां केलेल्या उपकारासमोर हा महान् समुद्रहि क्षुद्र आहे, तुच्छ आहे.

१०४ तुम्हांला मिळालेली मदत मोहरीच्या दाण्याएवढी जसली, तरी श्रेष्ठांच्या मतें ती वटवृक्षाहूनहि थोर आहे.

१०५ दिलेल्या साहाय्याच्या मापानें कृतज्ञतेचें मोजमाप करावयाचें नसतें. ज्यानें साहाय्याच्या स्वीकार केला, त्याच्या मनाचा मोठेपणा हें कृतज्ञतेचें माप असतें.

१०६ विशुद्धांची मैत्री कधी विसरूं नको. आपत्तींत ज्यांनी तुला आधार दिला, त्यांना सोडूं नको.

१०७ जे खरे थोर आहेत, ते वेळेवर मदत करणाऱ्यांची सात जन्महि कृतज्ञतेनें आठवण करितील.

१०८ दाखविलेली दया विसरणें हा अनुदारपणा आहे, परंतु केलेला अपमान तत्काळ विसरणें हें मनाच्या मोठेपणाचें लक्षण आहे.

१०९ शत्रूनें केलेला एकादा उपकार जर आठवला, तर त्यानें केलेली असह्य जखमहि आपण विसरून जाऊं.

११० सर्व प्रकारचे अपराध करणाऱ्या पाप्यालाहि उद्धाराची आशा आहे; परंतु कृतघ्न माणसास मात्र ती नाही.

## सर्ग १२ : न्यायीपणा

१११ न्यायीपणा म्हणजे सदाचाराचा आद्यन्त आहे. शत्रु असो, मित्र असो; त्याला त्याच्या योग्यतेनुरूप देणें याला न्यायीपणा म्हणतात.

११२ न्यायानें वागणाऱ्याचें वैभव कधी कमी होत नाही; तें अति दूरच्या पिढ्यां पर्यंतहि टिकतें.

११३ सत्पथच्युत होण्यानें संपत्ति मिळणार असली, तरी ती घेऊं नका. केवढाहि फायदा होणार असला तरी दूर रहा.

११४ परिणामावरून त्या त्या गोष्टीची योग्यायोग्यता ठरत असते, शहानिशा होत असते.

११५ सुखदुःख सर्वांच्याच वांट्यास येतें; परतु थोर मनुष्याचें न्यायी हृदय हे त्याचें खरें भूषण होय.

११६ ज्या क्षणीं तुझें हृदय सत्पथच्युत होऊन असत्पथाकडे वळूं लागेल, त्या क्षणी तुझा विनाश जवळ आला, असें समज.

११७ न्यायी नि सद्गुणी माणसाच्या दारिद्र्याकडे जग तिरस्कारानें पहात नाही.

११८ ती तराजूची सरळ दांडी न्यायाने मापते. त्या दांडीप्रमाणें सरळ राहून इकडे तिकडे न झुकतां न्यायनिष्ठ राहण्यांत शहाण्या माणसाचा गौरव आहे.

११९ जर हृदयांत सदैव सत्य असेल, तर त्या मनुष्याच्या मुखांतून बाहेर पडणारा शब्द म्हणजेच खरा न्याय होय.

१२० स्वतःच्या फायद्याप्रमाणेंच जो व्यापारी दुसऱ्याच्या फायद्याकडे बघतो, त्याचा पसारा वाढेल, वैभव वाढेल.

## सर्ग १३ : संयम

१२१ सयम स्वर्गाकडे नेतो; बेताल वासना-विकार अनत अंधारांत नेतात.

१२२ सयमाला मोलवान ठेव्याप्रमाणें जप. जगांत याहून अधिक मोलाचें कांहीं नाहीं.

१२३ या जगांतील वस्तूंचें योग्य मूल्यमापन जो करतो आणि संयमी जीवन जगतो, त्याला ज्ञान व इतर आनंद प्राप्त होतात.

१२४ ज्यानें मन जिंकलें आणि जो कर्तव्यदक्ष आहे, तो पर्वताहूनहि भव्य आहे.

१२५ नम्रता सर्वांनाच शोभते; परंतु श्रीमंताचे ठिकाणी ती सकल सौंदर्यानें शोभते.

१२६ कांसवाप्रमाणें इंद्रियें जो आकर्षून ठेवतो, त्याला सात जन्म पुरेल इतका मोठा ठेवा मिळाला.

१२७ दुसऱ्या कोणत्या गोष्टीला लगाम नाहीं घालतां आला, तर निदान जिभेला तरी घाल; उच्छृंखल जीभ वाटेल तें बोलेल आणि तुला दुःखाच्या दरीत लोटील.

१२८ एका शब्दानेंहि दुसऱ्याला दुखविलेंस, तर तुझ्या सर्व गुणांची माती झाली समज.

१२९ विस्तवानें भाजलेलें बरें होतें; परंतु जिभेनें भाजल्यामुळें झालेली जखम कधी सुकत नाही.

१३० अंतःकरणांत क्रोधाला थारा न देणाऱ्या संयमी स्थितप्रज्ञाचें दर्शन घ्यायला प्रत्यक्ष धर्म येतो.

## सर्ग १४ : शुद्ध वर्तन

१३१ ज्याचें वर्तन विशुद्ध आहे, त्याला सारे सन्मानितात. प्राणाहूनहि विशुद्ध वर्तनाला अधिक महत्त्व आहे.

१३२ आपल्या वर्तनाकडे डोळ्यांत तेल घालून पहात जा. तूं जगांत कितीहि शोध केलास, तरी सद्वर्तनासारखा मित्र तुला मिळणार नाहीं.

१३३ विशुद्ध जीवनावरून सत्कुलजता कळून येते; नीच वर्तनानें मनुष्य नीचांत जाऊन पडतो.

१३४ विसरलेले वेदहि पुन्हां पाठ करतां येतील; परंतु सत्पथच्युत ब्राह्मण चिरपतित झाला.

१३५ मत्सरग्रस्तास वैभव नाही, त्याचप्रमाणें दुराचारी माणसासहि.

१३६ निग्रही लोक सन्मार्गावर दृढ राहतात. उन्मार्गगामी होण्यानें कोणत्या आपत्ति येतात याची त्यांना जाणीव असते.

३७ सदाचारी मनुष्य सर्वत्र गौरविला जातो; दुराचारी माणसास सर्वत्र अपवाद नि अपकीर्ति सोसावीं लागतात.

१३८ सदाचार भाग्याची जननी; तर दुराचार संकटाची जननी.

१३९ चुकूनहि सत्कुळांत जन्मणाऱ्याच्या तोंडून अपशब्द बाहेर पडणार नाहीं.

१४० मूर्खांना तूं कितीहि शिकवायची खटपट केलीस, तरी सदाचारी माणसांप्रमाणें वागायला ते कधींच शिकणार नाहींत.

## सर्ग १५ : परस्त्रीकडे पाहूं नको

१४१ ज्याची दृष्टि सद्धर्माकडे आहे, ज्याला भाग्य हवें आहे, तो परस्त्रीची इच्छा करण्याचा मूर्खपणा कधींहि करणार नाही.

१४२ दुसऱ्याच्या उंबरठ्याचें अतिक्रमण करणारा पतितांहून पतित समजावा.

१४३ विश्वासानें राहणाऱ्या मित्राच्या घरावरच जे हल्ला करतात, ते खरोखरी मृत्यूच्या जबड्यांत पडतात.

१४४ व्यभिचारामुळें किती मानहानि होते, कशी मान खालीं घालावी लागते, हें दिसत असूनहि जर कोणी व्यभिचार करील तर त्याचा इतर कितीहि मोठेपणा असला तरी काय कामाचा ?

१४५ शेजाऱ्याची बायको मिळणें शक्य आहे म्हणून तिच्याकडे डोळे लावून बसणाऱ्यांचें नांव कायमचें बद्दू होईल.

१४६ व्यभिचारी माणसाची द्वेष, पाप, भीति, लज्जा, या चारांपासून सुटका नाहा.

१४७ शेजाऱ्याच्या बायकोच्या सौंदर्यानें जो विचलित होत नाहीं, तोच खरा सत्प्रवृत्त गृहस्थ होय.

१४८ परस्त्रीकडे कधीहि न पाहणारा मनुष्य केवळ थोर आहे; एवढेंच नव्हे, तर तो संत आहे.

१४९ परस्त्रीच्या बाहुपाशांत जो पडत नाहीं, तो जगांतील सर्व मंगलांचा मालक होईल.

१५० इतर पापांपासून परावृत्त नाहीं होतां आलें, तर निदान इतकें तरी कर की कधी व्यभिचार करूं नको. इतकें केलेंस तरीहि प्रतिष्ठा मिळेल.

## सर्ग १६ : क्षमा

१५१ आपलें पोट फाडणाऱ्यांचेंहि ही पृथ्वी पोषण करते, धारण करिते; त्याप्रमाणें तुला दु:ख देणाऱ्यांचाहि सांभाळ कर. कारण यांतच खरा मोठेपणा आहे.

१५२ दुसऱ्यांनीं कितीहि अपाय केले तरी तूं क्षमाच कर; आणि तें सारें विसरून गेलास तर सोन्याहून पिवळें.

१५३ दुसऱ्याचें स्वागत न करणें हें खरें लज्जास्पद दारिद्र्य; मूर्खांच्या मूर्खपणाचाहि राग येऊं न देणें हें खरें थोर सामर्थ्य.

१५४ थोरपणा हवा असेल, सदैव उन्नत राहण्याची इच्छा असेल, तर दुसऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणाची सदैव क्षमा करण्याची संवय मन:पूर्वक प्रयत्नांनी लावून घे.

१५५ अपकाराचा बदला घेणाऱ्यांविषयी शहाण्यांना फारसें कांहीं वाटत नाही परंतु शत्रूलाहि क्षमा करणाऱ्यांना ते सोन्यामोत्यांप्रमाणें जपतात.

१५६ सुडाचा आनंद एक दिवस टिकतो; क्षमा करणाऱ्याचें यश चिरंजीव आहे.

१५७ तुम्हांला झालेला अपाय केवढाहि मोठा असो, भोगावें लागलेलें दु:ख किती का तीव्र असेना, त्या गोष्टी मनाला लावून न घेणें, सूडबुद्धि मनांत येऊं न देणें, यांत खरा चांगुलपणा आहे.

१५८ अहंकारामुळें ज्यांनीं तुला दुखविलें, त्यांना मनाच्या थोरपणानें जिंकून घे.

१५९ उपहास करणाऱ्यांच्या विषारी जिभेला जे शांतपणे सहन करतात, ते सर्व-संग-परित्याग केलेल्या संन्याशांहूनहि थोर आहेत.

१६० उपवास करून तप करणारे मोठे खरे; परंतु दुसऱ्यांनी केलेल्या निंदेची, उपहासाची जे क्षमा करतात, अशांच्या खालींच त्यांचा नंबर.

## सर्ग १७ : निर्भत्सरता

१६१ ज्या वेळेस हृदयांत मत्सराचा लेशहि आढळणार नाही, त्या वेळेसच तुझें हृदय सद्गुणांकडे जात आहे असें समज.

१६२ निर्मत्सर स्वभावाहून अधिक थोर व श्रेष्ठ असें दुसरें काय आहे ?

१६३ ज्याला सद्गुणांची पर्वा नाहीं, भाग्याची इच्छा नाहीं, तोच शेजाऱ्याच्या भरभराटीचा आनंद न मानतां मत्सर करील.

१६४ शहाणे लोक मत्सरग्रस्त होऊन दुसऱ्यास कधीं अपाय करीत नाहींत. कारण अशा नीच भावना मनांत खेळवल्यानें काय तोटे होतात, तें त्यांना माहीत असतें.

१६५ मत्सरी माणसाच्या मनांतील मत्सर हीच त्याला शिक्षा होय. कारण त्याच्या शत्रूंनीं जरी त्याला वांचविलें तरी त्याच्या मनांतील मत्सर त्याचा नाश करील.

१६६ दुसऱ्याचें वैभव ज्याला बघवत नाहीं, त्याच्या कुटुंबाला दोन प्रहरची भ्रांत पडेल.

१६७ लक्ष्मीला मत्सरी माणसें आवडत नाहींत. आपल्या वडील बहिणीच्या—विपत्तीच्या—त्यांना स्वाधीन करून ती निघून जाते.

१६८ अति मत्सरानें मनुष्य भिकेला लागतो आणि शेवटीं नरकांत जातो.

१६९ मत्सरी वैभवांत आणि उदार मनुष्य विपत्तींत ? छेः; असें होणें म्हणजे नवलच म्हणायचें.

१७० द्वेषमत्सरानें कधीहि भाग्य लाभलें नाहीं; उदाराला कधीहि भाग्यच्युत व्हावें लागलें नाही.

## सर्ग १८ : निर्लोभता

१७१ परधनाचा लोभ धरायला ज्याला दिक्कत वाटत नाहीं, त्याची दुष्ट बुद्धि वाढत जाईल आणि त्याच्या कुटुंबाला अवकळा येईल.

१७२ वाईटापासून परावृत्त होणारे लोक निर्लोभ असतात; कुकर्म करायला ते कधीहि प्रवृत्त होत नाहीत.

१७३ ज्यांना खऱ्या आनंदाची तहान आहे ते क्षुद्र सुखांचा लोभ करित नाहीत, अन्यायाचा कधी आश्रय करित नाहीत.

१७४ थोर दृष्टीचे संयमी लोक " आम्हांला अमुक पाहिजे, आमच्याजवळ अमुक नाही " असें लोभाविष्ट होऊन कधी म्हणत नाहीत.

१७५ तुमची बुद्धि कितीहि मूलग्राही नि सूक्ष्म असली, तरी ती लोभवश होऊन तुम्हांला मूर्खपणाचीं कृत्यें करायला जर संमति देत असेल तर तिचा काय उपयोग ?

१७६ ईश्वराची कृपा व्हावी म्हणून ज्याला तळमळ आहे, ईश्वराकडे जाणाऱ्या मार्गावर जो आहे, अशानें द्रव्यहेतु मनांत धरून जर दुष्ट बेत केले तर त्याचाहि नाश होईल.

१७७ लोभाने गोळा केलेल्या संपत्तीचा लोभ धरूं नका. कारण सुखाची वेळ आली तरीहि त्या संपत्तीचें कडुच फळ मिळणार.

१७८ तुझ्या पुंजीत कमी पडायला नको असेल, तर शेजाऱ्याच्या द्रव्याचा लोभ नको करूं.

१७९ न्यायी व निर्लोभी अशा प्रज्ञावंताची योग्यता लक्ष्मी जाणते व त्याला शोधीत येते.

१८० अदूरदर्शी लोभामुळें सर्वनाश होतो; परंतु निरिच्छ मनाचा मोठेपणा सर्व विजयी होतो.

## सर्ग १९ : निंदा करूं नको

१८१ जो अन्यायानें वागतो, सदाचाराचें नांवहि जो कधीं काढित नाही, अशाहि माणसाला उद्देशून "हा पहा मनुष्य; हा कधीं कोणाची त्याच्या पाठीमागें निंदा करित नाही." असें जर कोणी म्हणालें तर तें ऐकून त्या माणसासहि समाधान वाटतें.

१८२ चांगलें सोडून वाईट करणें म्हणजे चूकच; परंतु तोंडावर हंसून मागें निंदा करणें हें मात्र फारच वाईट.

१८३ असत्यानें नि परनिंदेनें जगण्यापेक्षां तत्काळ मरणें शतपटीनें बरें.

१८४ एखाद्यानें तुमच्या तोंडावर जरी तुमचा अपमान केला असला, तरी त्याच्या पाठीमागें तुम्ही त्याची निंदा करूं नका.

१८५ ओठावर धर्मवचनें असली, तरी निंदेखोर जीभ हृदयाची क्षुद्रता प्रकट करतेच.

१८६ तूं दुसऱ्याची निंदा केलीस तर तोहि तुझीं सारी उणी पाहील; तुझे सारे किळसवाणे प्रकार तोहि बाहेर काढील.

१८७ निंदेंतच आनंद मानणाऱ्यांना मैत्री जोडण्याची मधुर कला अवगत नसते. त्यांचे जुने मित्रहि त्यांच्या निंदेला कंटाळून, विटून त्यांना सोडून जातील.

१८८ मित्रांचे दोषहि जगाला सांगण्यांत ज्यांना आनंद वाटतो, ते शत्रूचे दोष कसे पाहणार नाहींत ?

१८९ पाठीमागें निंदा करणाऱ्यांचा भार धरित्रीला कसा बरें सहन होतो ? केवळ कर्तव्य म्हणूनच भूमाता हें करीत असेल.

१९० शत्रूच्या दोषांचें आविष्करण, पृथक्करण करतां, त्याप्रमाणें स्वतःच्या दोषांचें निरीक्षण-परीक्षण कराल तर पाप जवळ येईल का ?

## सर्ग २० : पोकळ बडबड नको

१९१ उगीच बडबड करून दुसऱ्यांच्या कानांना सतावणारा—त्याच्यावर श्रोते संतापतात, सारे लोक त्याचा तिरस्कार करतात.

१९२ आपल्या मित्रांना दुखवण्यापेक्षांहि दुसऱ्यांच्यासमोर पोकळ बडबड करणें फार वाईट आहे.

१९३ जो वल्गना करितो तो स्वतःची नालायकी उद्घोषितो.

१९४ एखाद्या सभेंत उगीच व्यर्थ बडबड केल्यानें फायदा तर नाहींच; उलट जें कांहीं आपलें चांगलें असतें, तेंहि आपणांस सोडून जातें.

१९५ तुम्ही किती का मोठे असाना; उगीच वटवट कराल, वृथा वल्गना कराल, तर सारा मानसन्मान गमावून बसाल.

१९६ पोकळ वल्गनांवर प्रेम करणाऱ्याला सारहीन तूस म्हणा, भूस म्हणा.

१९७ योग्य वाटलें तर वेळप्रसंगीं शहाण्यांनीं कठोर शब्दहि वापरले तरी तें चालेल; परंतु निरर्थक बडबडीपासून दूर राहणें हें त्यांच्याहि हिताचें आहे.

१९८ गहन प्रश्न सोडवितांना गढून गेलेले लोक अर्थगंभीर शब्दांशिवाय निरर्थक शब्द बोलत नाहींत.

१९९ ज्यांची दृष्टि पूर्ण आहे, ते चुकूनसुद्धां पोकळ शब्द बोलत नाहींत.

२०० बोलण्यास योग्य असेच शब्द बोल; पोकळ शब्द कधीं बोलूं नकोस.

## सर्ग २१ : असत्कर्मांची भीति

२०१ पापाची दुष्टांना भीति वाटत नाहीं; परंतु सज्जन त्याच्यापासून दूर राहतात.

२०२ पापापासून पापच जन्मतें; आगीपेक्षांहि पापाचें भय वाटायला हवें.

२०३ शत्रूलाहि अपाय न करण्यांत खरें शहाणपण आहे असें म्हणतात.

२०४ नकळतांहि दुसऱ्याचें वाईट करूं नकोस. मनांत वाईट विचार खेळवणारा आणि दुष्ट बेत करणारा—ईश्वरी न्याय त्याचा नाश करील.

२०५ " मी दरिद्री आहें " असें म्हणून कधींहि वाईट कामास प्रवृत्त होऊं नकोस. कारण त्यामुळें आणखीच खालीं जाशील.

२०६ वाईट गोष्टीनीं दुःखी होण्याची ज्याला इच्छा नाहीं, त्यानें दुसऱ्यास कधी त्रास देऊं नये.

२०७ सर्व शत्रूंच्या कचाट्यांतून निसटण्याचा मार्ग सांपडेल; परंतु पापें कधीं मरत नाहींत आणि ती हात धुऊन पाठीस लागतील व तुमचा सत्यनाश करतील.

२०८ आपली छाया ज्याप्रमाणें आपणांस कधी सोडीत नाही, त्याप्रमाणें पापेंहि आपल्या सदैव पाठीशीं असतात आणि धुळीस मिळवितात.

२०९ मनुष्य स्वतःवर खरें प्रेम करीत असेल, तर त्यानें पापांकडे कधींहि वळू नये.

२१० सन्मार्ग सोडून पाप करण्याच्या भरीस जो कधी पडत नाहीं, तो सर्व संकटांपासून सुरक्षित आहे असें समजा.

## सर्ग २२ : सेवा, परकार्यतत्परता

२११ थोर माणसें निरपेक्ष उपकार करीत असतात. मेघाच्या उपकाराची फेड हें जग कशानें बरें करील ?

२१२ थोर लोक श्रम करून जें मिळवितात, तें दुसऱ्यांसाठींच असतें.

२१३ मोठ्या मनानें दुसऱ्याची केलेली सेवा—तिच्याहून अधिक चांगली गोष्ट पृथ्वीवर नाही वा स्वर्गांतहि नाही.

२१४ योग्य काम हें जो जाणतो, तोच खरोखर जगतो; हें न जाणणारा मृतसमानच समजावा.

२१५ कांठोकांठ भरलेलें गांवामधील तें तळें पहा; जगावर प्रेम करणाऱ्या माणसाचें वैभव त्याप्रमाणें असतें.

२१६ फलभारानें लवलेला एखादा वृक्ष गांवाच्या मध्यभागीं असावा. त्या वृक्षाप्रमाणें उदाराच्या हातांतील संपत्तीचें असतें.

२१७ सर्वांना सुलभ आणि औषधी गुणांनीं युक्त अशी एखादी दिव्य वनस्पती असावी, तद्वत् उदाराच्या हातांतील संपत्ति ही होय.

२१८ सदसत् जाणणारे जरी आपद्ग्रस्त असले, तरी दुसऱ्यास साहाय्य करण्यास चुकत नाहीत.

२१९ साहाय्य मागायला आलेल्यास ज्या वेळेस साहाय्य देतां येत नाहीं असें दिसतें, त्या वेळेसच आपण गरीब आहों हा विचार उदार मनुष्याच्या मनांत येतो.

२२० परोपकार करण्यासाठीं स्वतःला विकून गुलाम झालांत तरी हरकत नाहीं. परोपकार करित असतांना विपत्ति आली तरी ती स्पृहणीयच आहे.

## सर्ग २३ : भूतदया

२२१ दरिद्रनारायणास देणें ही खरी भूतदया; इतर देणें कर्ज देण्याप्रमाणें आहे.

२२२ दुसऱ्यापासून स्वीकारल्यामुळें स्वर्ग मिळत असला तरी तो नको. आणि दात्याला जरी स्वर्गांत मज्जाव झाला तरीहि दान देणें हा थोर गुणच समजावा.

२२३ "माझ्याजवळ नाही" असें हीनदीनपणें न बोलतां कुलवान मनुष्यच फक्त देत असतो.

२२४ याचकाच्या मुखावर समाधानाचें हास्य पाहिल्याशिवाय दात्याच्या हृदयाला खरा आनंद होत नाही.

२२५ स्वतःवर विजय मिळवणाऱ्याचा सर्वांत मोठा विजय म्हणजे भुकेवर विजय मिळविणें; परंतु हा विजयहि तेव्हांच मिळतो, जेव्हां आपण स्वतःला नाकारून दुसऱ्याची भूक आधीं शांत करतों.

२२६ गरिबांच्या आंतड्यांना सतावणारी ही भूक—ही भूक शान्त करणें हाच आपल्यावर पुढें वाईट दिवसांची पाळी आली तर त्या वेळेस आधार असावा म्हणून ठेवलेली पुंजी होय, असें श्रीमंतानें समजावे.

२२७ जो मनुष्य सर्वांना दिल्यावर स्वतः खातो, त्याला भुकेचा भयंकर रोग कधी शिवणार नाहीं.

२२८ दुसऱ्याला न देतां जे निर्दय, कृपण लोक स्वतःची संपत्ति नुसती सांचवून ठेवतात, त्यांनी देण्यांतील आनंद कधी चाखून तरी पाहिला आहे का ?

२२९ भिकाऱ्याच्या मोडक्यातोडक्या तुकड्यापेक्षांहि आपण एकटाच बसून खाणारा जो श्रीमंत, त्याच्या त्या सांचीव अन्नाला कमी चव आहे.

२३० मृत्यूहून दुःखदायक काय आहे? परंतु दुसरा मदत मागत असतां ती कशी द्यावी हें कळत नाही म्हणून आलेलें मरणहि गोड आहे.

## सर्ग २४ : यश

२३१ गरिबाला दे आणि नांवलौकिक मिळव. आपलें नांव उज्ज्वल करणें याहून दुसरा मोठा फायदा तो कोणता ?

२३२ जे गरिबास देतात, त्यांचें गुणगान सर्वांच्या तोंडी असतें.

२३३ या मर्त्यलोकीं सारें कांही काळाच्या उदरांत गडप होतें. परंतु ज्यांची कृति या मानवजातीच्या इतिहासांत अपूर्व आहे, अशा थोरांमोठ्यांची कीर्ति कधींच मरत नसते.

२३४ ज्यानें चिरंजीव विश्वव्यापि यश मिळविलें त्याला आकाशांतील देव साधुसंतांच्याहि आधीं जागा देतात.

२३५ ज्या त्यागानें यश वाढतें, ज्या मरणानें तेज चढतें, तो त्याग आणि तें मरण या गोष्टी खरा शूरच करूं शकतो; इतरांचें तें काम नाही.

२३६ जगांत आल्यासारखें यश मिळव. जगांत येऊन ज्यांनीं कीर्ति मिळविली नाही, ते जन्मास आले नसते तरी फार बेरं झालें असतें.

२३७ जे स्वतः दोषमुक्त नाहीत ते स्वतःवर कधी दांतओठ खातात का, स्वतःवर रागावतात का ? जर नसतील तर ते निंदकांवर कां संतापतात ?

२३८ कीर्तिरूप अमरजीवन ज्यांनी मिळविलें नाही, त्यांना धिक्कार असो.

२३९ अपकीर्ति झालेल्यांच्या भारानें ही पृथ्वी किती वांकली आहे पहा. धनधान्यासाठीं विख्यात अशी ही वसुंधरा अशा दुष्टांमुळे हीन दशेस गेल्याशिवाय कशी राहील ?

२४० ज्यांचे जीवन निर्दोष आहे तेच खरोखर जगले; जे कीर्तिशिवाय जगले तेच खरोखर मेले.

# भाग २ रा : यतिजीवन

## १ : साधनाविभाग : व्रतें

### सर्ग २५ : दया

२४१ दयापूर्ण हृदय हीच खरी संपत्ति. ही संपत्ति गरिबांतल्या गरिबाजवळहि असूं शकते.

२४२ सत्पथानें जा आणि दयाशील हो. दया हा एक मोक्षाचा मार्ग असें सर्व धर्मांतून, सर्व पंथांतून सांगितलेलें आहे.

२४३ दयामय हृदयाच्या लोकांना अंधकारमय लोकीं जावें लागणार नाही.

२४४ प्राणिमात्रावर जो दया करतो, प्रेम करतो, त्याच्या पाठीला जीवाला गांगरवून टाकणारी तीं कर्मफळें लागत नाहीत. तो मुक्त होतो.

२४५ दयार्द्र मनुष्याला कधी त्रास नसतो. वायुवेष्टित ही विशाल पृथ्वी या गोष्टीची साक्ष देत आहे.

२४६ जो निर्दय आहे आणि असत्याचरणी आहे, तो पूर्वजन्मांतील स्वत:ला भोगावें लागलेलें विसरला—दयेचा धडा विसरला—असें शहाणे म्हणतात.

२४७ ज्याचें हृदय दया करूं शकत नाही, त्याला परलोकीं सुख नाहीं; ज्याप्रमाणें द्रव्यहीनास या लोकीं सुख नाहीं.

२४८ द्रव्यानें दरिद्री असणाऱ्यांची एक दिवस भरभराट होण्याची शक्यता आहे, परंतु ज्यांच्याजवळ दयेचा तुटवडा आहे, त्यांच्या भाग्याचा दिवस कधीच येणार नाही.

२४९ संशयग्रस्त नि गोंधळांत पडलेल्या माणसास सत्य सांपडणें ज्याप्रमाणें कठीण, त्याप्रमाणें कठोर माणसाच्या हातून सत्कर्म होणें कठीण.

२५० गरिबावर जुलूम करावा असा मोह जेव्हां तुला पडेल, त्या वेळेला आपल्याहून प्रबल असणारांसमोर आपण कसे थरथरत होतों तें आठव.

## सर्ग २६ : मांसाशन नको

२५१ स्वतःची चरबी वाढावी म्हणून दुसऱ्या प्राण्यांचें जो मांस खातो, त्याला दया कशी बरें कधीं वाटेल ?

२५२ उधळ्यांच्या हातांत कधी पैसा दिसणार नाही आणि मांसाशन करणाऱ्यांच्या हृदयांत दयेचा लेशहि आढळणार नाही.

२५३ सशस्त्र शिपायाच्या हृदयांत ज्याप्रमाणें दया नसते, त्याप्रमाणें मांसाशन करणाऱ्याच्या हृदयांत सद्भाव नसतो.

२५४ प्राण्यांची हिंसा करणें खरोखर हृदयाचा निष्ठुरपणा आहे; आणि त्यांचें मांस खाणें म्हणजे तर फारच अन्याय वाटतो.

२५५ मांसाशन वर्ज्य करणें म्हणजे खरोखर जगणें. मांसाशन करशील तर नरकाच्या दरीत तुला कायमचें खितपत पडावें लागेल.

२५६ जगाला मांसाशन नकोच असेल, तर तें विकायला तरी कोण आणील ?

२५७ दुसऱ्या प्राण्यांच्या वेदनांची कल्पना जर मानवाला यथार्थपणें आली, तर तो कधींहि मांसाशन करूं इच्छिणार नाहीं.

१५८ या मायामय, अज्ञानमय संसाराची बंधनें सोडून जे मुक्त झाले, ते हत्या करून कधीहि मांसाशन करणार नाहींत.

१५९ हजारों यज्ञ करण्यापेक्षां प्राण्यांची हिंसा न करणें आणि मांस न खाणें श्रेष्ठ आहे.

१६० जो कोणाची हिंसा करीत नाहीं व मांसाशन करीत नाहीं, त्याला सारें जग हात जोडून वंदन करितें.

## सर्ग २७ : तप

१६१ सारें सहन करणें आणि कोणाहि प्राण्याची हिंसा न करणें, यांत सारें तप सांठवलेलें आहे.

१६२ पूर्वजन्मी ज्यांनी तप केलें असेल, तेच या जन्मीहि त्या मार्गानें जाऊं शकतील; इतरांना तें जमणार नाही.

१६३ तपोधनांची चिंता वाहण्यास दुसरे लोक हवेत; म्हणून तर कांहींनी तपश्चर्या सोडून दिली नसेल ना ?

१६४ तुझ्यावर प्रेम करणाऱ्यांचा जर तुला उत्कर्ष करायचा असेल आणि तुझ्या शत्रूचा जर तुला नाश करायचा असेल, तर तें सामर्थ्य तपानें मिळेल हें ध्यानांत धर.

१६५ तपोबलानें तुमच्या इच्छा पूर्ण होतात; म्हणून या जगांत लोक तपश्चर्येचा प्रयत्न करतात.

१६६ तप करणारेच स्वतःचें हित साधतात; बाकीचे वासनांच्या जाळ्यांत गुरफटून शेवटी विनाशाप्रत जातात.

१६७ अग्नि जितका प्रखर, तितकें त्यांत घातलेल्या सोन्याचें तेज अधिक; त्याप्रमाणें ज्या मानानें हाल व कष्ट अधिक त्या मानानें तपाचें तेज अधिक.

१६८ संयमी मनुष्याची सारे पूजा करतात.

२६९ तपानें बळ मिळविणारे मृत्यूवर विजय मिळविण्यांत यशस्वी होतात.

२७० या जगांत तप आचरणाऱ्यांची संख्या फार थोडी असते; न करणारेच पुष्कळ. म्हणून जगांत गरजू लोकांची संख्याहि पुष्कळ.

## सर्ग २८ : दंभ

२७१ ढोंगी माणसाचें ढोंग पाहून शरीरांतील पंचमहाभूतांची तत्त्वें हंसूं लागतात.

२७२ अंतःकरणांतील अशुद्धता नि मलिनता मनाला जर माहीत असेल तर वरपांगी गंभीर आविर्भावाचा काय बरें उपयोग ?

२७३ मनावर ताबा न मिळवितां खोट्या तपश्चर्येचा नि वैराग्याचा आव आणणारा वाघाचें कातडें पांघरून चरणाऱ्या गायीप्रमाणें आहे.

२७४ साधुपणाच्या आवरणाखाली जो पापें करितो, तो झुडपांत लपून पांखरांना फसवणाऱ्या पारध्याप्रमाणें आहे.

२७५ ढोंगी मनुष्य पावित्र्याचा आव आणतो नि म्हणतो, " मी माझे मनोविकार जिंकले आहेत. " परंतु शेवटीं त्याला दुःख करीत बसण्याची पाळी येईल आणि " अरेरे ! काय मी केलें ? " असें म्हणत रडत बसावें लागेल.

२७६ मनांतून त्याग न करतां, त्यागाचें सोंग आणून जगाला जो फसवितो, त्याच्याहूनहि अधिक दुष्ट असा लफंग्या आढळणार नाही.

२७७ गुंजेची एक बाजू काळी असते, दुसरी पांढरी असते; त्याप्रमाणें बाहेरून चांगलें परंतु अंतर्यामी वाईट असे दांभिक लोक असतात.

२७८ असे कितीतरी असतात कीं जे पवित्र तीर्थस्नानें करितात, पवित्र म्हणून मिरवतात; परंतु आंत वाईट असतात.

२७९ बाण सरळ दिसतो; परंतु त्याला रक्ताची तहान असते; वीणा वक्र असली तरी मधुर संगीत पसरवते. म्हणून बाह्य रागरंगावरून परीक्षा न करतां कृतीवरून करावी.

२८० ज्या गोष्टी जगांत वाईट मानल्या जातात, त्यांचा त्याग केलास म्हणजे पुरे. मग डोक्याचें मुंडन असो वा नसो.

## सर्ग २९ : कपटराहित्य

२८१ आपला अपमान होऊं नये, तिरस्कार केला जाऊ नये, अशी ज्याला इच्छा असेल, त्यानें कपटाचा विचार मनांत येऊं नये म्हणून दक्ष रहावें.

२८२ शेजाऱ्याला लुबाडीन, असे मनांत म्हणणेंसुद्धां पाप आहे.

२८३ कपटानें मिळविलेली संपत्ति आज भरभराटतांना दिसली, तरी उद्यां मातीतच जायची.

२८४ लुटण्याच्या इच्छेनें परिणामी अपरंपार दुःख प्राप्त होईल.

२८५ दुसऱ्याच्या धनाच्या अपहरणाची जो इच्छा करतो, दुसरा असावध असतां त्याच्यावर झडप घालायला जो बघतो, त्याला चांगुलपणा, दया माहीत नसतात. प्रेम त्याच्या हृदयापासून दूर असतें.

२८६ दुसऱ्याची लूटमार करूं पाहणाऱ्या माणसाला खरें मूल्यमापन करतां येत नसतें. सत्यधर्माचें आचरण तो कोठून करणार ?

२८७ संसारांतील सर्व वस्तूंची ज्यानें पारख केली आहे, त्यांची किंमत ओळखून ज्यानें आपलें हृदय खंबीर केलें आहे, मति दृढ केली आहे, तो शेजाऱ्याला फसवण्याची चूक कधीहि करणार नाही.

२८८ ज्याप्रमाणें चोराच्या मनांत कपट असतें, त्याप्रमाणें जगांतील वस्तूंचें खरें स्वरूप समजणाऱ्यांच्या हृदयांत धर्म असतो.

२८९ नेहमी मनांत कपट खेळवणारा सन्मार्गाचा त्याग करून शेवटी नाशाप्रत जाईल.

२९० जो दुसऱ्यास फसवतो, तो स्वतःच्या शरीराचाहि स्वामी नसतो. परंतु जो सद्धर्मानें नि न्यायानें वागतो, तो स्वर्गाचा स्वामी होतो.

## सर्ग ३० : सत्य

२९१ सत्य म्हणजे काय ? ज्या बोलण्याला दुष्टपणाचा थोडादेखील वास नाही, तें खरें सत्य बोलणें.

२९२ असत्यांतून सत् नि मंगल यांची निर्मिति होणार असेल, तर तें सत्यच होय.

२९३ जें तुला असत्य म्हणून माहीत आहे, तें सत्य म्हणून कधी मानू नको.

२९४ ज्याच्या हृदयांत असत्याचा लवलेशहि नाही, तो सर्वांच्या हृदयाचा सम्राट् होतो.

२९५ ज्याचें हृदय सत्यावर अधिष्ठित आहे, तो गरिबांना दानें देणाऱ्यांहूनहि अधिक मोठा आहे; तो खरा तपस्वी.

२९६ असत्याशी ओळखहि नसणें याहून माणसाची अधिक कीर्ति दुसरी नाही, याहून अधिक मोलाचा अलंकार नाही.

२९७ मनुष्य कधींहि खोटे बोलला नसेल, तर आणखी इतर सद्गुणांची काय जरूरी ?

२९८ पाण्याने बाहेरची शुद्धि; हृदयाची शुद्धि सत्यानें सिद्ध होते.

२९९ जे खरे महात्मे आहेत, ते सत्याच्या प्रकाशालाच प्रकाश मानतात; इतर प्रकाशांना ते मानीत नाहींत.

३०० या जगांत मी पुष्कळ वस्तु पाहिल्या; परंतु सत्याहून थोर दुसरी वस्तु पाहिली नाही.

## सर्ग ३१ : क्रोधराहित्य

३०१ मारण्याची शक्ति असून जो मारित नाही, त्याच्या ठायीं क्षमावृत्ति आहे असें समजावें. दुर्बलानें क्षमा केली काय, न केली काय, त्याला महत्त्व नाही.

२०२ प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसलें तरीहि रागावणें चांगलें नव्हे आणि शक्ति असून संतापणें याच्याहून वाईट तर दुसरें कांहीच नाही.

२०३ अपराध करणारा कोणीहि असो, त्याच्यावर रागावूं नको. कारण क्रोधापासून अनेक दुष्परिणाम जन्माला येतात.

२०४ क्रोधानें हास्य मरतें, उत्साह नष्ट होतो, आनंद मावळतो.

२०५ जर तुला स्वतःचें कल्याण हवें असेल तर क्रोधापासून दूर रहा. तूं दूर न राहशील तर तो तुझ्याकडे येऊन तुझा नाश करील.

२०६ क्रोध ज्याच्या ज्याच्या जवळ येईल, त्याचा त्याचा नाश करील. क्रोधाचें संवर्धन करणाऱ्याच्या कुळांचा संहार होईल.

२०७ क्रोधाला अमूल्य ठेव्याप्रमाणें जो जवळ जतन करून ठेवतो, त्याची स्थिति जमिनीवर हात आपटणाऱ्याच्या स्थितीसारखी होते.

२०८ त्या माणसाच्या हाताला इजा झाल्याशिवाय रहात नाही, त्याप्रमाणें क्रोध जवळ ठेवणाऱ्याचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही.

२०९ तुझ्या बाबतीत झालेले शेंकडों अन्याय अनंत अग्निज्वालांप्रमाणें जरी तुला जाळित असले, तरीहि तूं न रागावशील तर फार चांगलें.

२१० जो क्रोधवश होतो, तो मृत्युवश होय. परंतु ज्यानें क्रोधाचा त्याग केला तो संत होय.

## सर्ग ३२ : अहिंसा ( अपाय न करणें )

३११ ज्याचें मन विशुद्ध आहे, त्याला मोठें राज्यपद मिळालें तरी तो दुसऱ्याला अपाय करणार नाही.

३१२ ज्याचें हृदय निर्मळ नि पवित्र आहे, तो अपकार करणाऱ्यांवरहि प्रत्यपकार करणार नाहीं, दुसरे द्वेषवश झाले तरी तो होणार नाहीं.

३१३ कारणाशिवाय जरी कोणी तुला इजा केली, तरी प्रत्यपकार करूं नको. कारण तसें करशील तर अपरिहार्य अशा आपत्ति मात्र तूं आपल्यावर ओढवून घेशील.

३१४ अपकार करणाऱ्याचें, अपाय करणाऱ्याचें शासन तुम्ही त्याच्यावर उपकार करून करावें नि त्याला मनांत लाजवावें.

३१५ दुसऱ्याचें दुःख तें आपलेंच दुःख; असें वाटून दुसऱ्यास दुःख देण्यापासून जो परावृत्त होत नाहीं, त्याची बुद्धि काय कामाची ?

३१६ मनुष्याला स्वतःच एखाद्या दुःखाचा कटु अनुभव आला असेल, तर तेंच दुःख दुसऱ्याला न देण्याची त्यानें खबरदारी घ्यावी.

३१७ कधींहि कोणाला थोडीसुद्धां पीडा न देणें, ही खरोखरच फार मोठी गोष्ट आहे.

३१८ ज्याला स्वतःच दुःखाचा अनुभव आला, तो आपण होऊन दुसऱ्यास कसें बरें दुःख देईल ?

३१९ जर सकाळीं तुम्ही शेजाऱ्याला दुखविलें, तर तिसरे प्रहरींच तुमच्यावर आपत्ति आल्याशिवाय राहणार नाहीं.

३२० अपाय नि दुष्कृत्यें करणाऱ्यावर त्याचीं सारीं पापें येऊन आदळतात. ज्यांना दुष्परिणामांपासून नि अपायांपासून दूर राहण्याची इच्छा असते, ते पापांपासून नेहमी दूर राहतात.

## सर्ग ३३ : अहिंसा ( न मारणें )

३२१ अहिंसा सर्वोत्तम सद्गुण आहे; हिंसेसंगें सारीं पापें येतात.

३२२ भुकेलेल्यास जवळची भाकर दे नि हिंसेपासून दूर रहा, ह्या सर्व धर्मोपदेशकांच्या दोन मुख्य आज्ञा आहेत.

३२३ सद्गुणांचा राजा म्हणजे अहिंसा; त्याच्या खालोखाल सत्य.

३२४ सन्मार्ग कोणता? अगदी लहान जीवासहि कसें वांचवावें असा विचार ज्या मार्गानें गेल्यामुळें मनांत येतो, तो सन्मार्ग, तो श्रेष्ठ मार्ग.

३२५ संसारांतील त्रिविध तापांच्या भीतीनें अनेक संसार-निवृत्त होतात. परतु अशांमध्यें तोच खरोखर श्रेष्ठ, जो प्राणिमात्राचे प्राण पवित्र नि पूज्य मानतो.

३२६ अहिंसाव्रताचा निश्चय करणाऱ्यावर सर्वभक्षक काळहि वक्रदृष्टि करूं इच्छित नाही.

३२७ प्राण सर्वांना प्रिय आहे. स्वतःचा प्राण वांचविण्यासाठींहि कोणाचा प्राण घेऊ नकोस.

३२८ यज्ञामुळे नानाविध सुखें मिळतात असें म्हणतात. परंतु हिंसा करून मिळणारीं सुखें सज्जनाला, पवित्र हृदयाच्या मनुष्याला विष्ठेसमान त्याज्य नि तिरस्करणीय वाटतात.

३२९ हिंसेवर जगणाऱ्यांना विचारवत पिशिताशन करणारे असें म्हणतात.

३३० तो पहा भणंग भिकारी. त्याच्या सर्वांगाला व्रणें पडली आहेत, रक्तपूं वहात आहेत; पूर्वजन्मी त्याने रक्तपात केले होते असें विचारवंत ज्ञानी पुरुष म्हणतात.

## २ : ज्ञान

### सर्ग ३४ : संसाराची असारता

३३१ क्षणभगुराला शाश्वत मानणें, यापरता दुसरा मूर्खपणा कोणता? या मोहांधते-पेक्षां दुसरें मोठें अज्ञान तें कोणतें?

३३२ गांवांत तमाशा बघायला लोकांचे थवेच्या थवे क्षणांत जमतात; परंतु थोड्या वेळानें ते सारे परत जातात. त्याप्रमाणें वैभव येतें नि ओसरतेंहि.

३३३ संपत्ति बुडबुड्याप्रमाणें आहे. तू संपत्तिमान् झालास तर चिर-कल्याणकारी गोष्टी करायला वेळ लावूं नकोस.

३३४ काळ अगदीं निरुपद्रवी दिसतो; परंतु मानवी जीवनाला अखंड कर्वतणारी कर्वत म्हणजे तो हा काळ.

३३५ जिभेची जों बोबडी वळली नाही नि घशांत घुरघुरु सुरू झालें नाही, तोंच सत्कृत्यें करण्याची त्वरा कर.

३३६ तो काल होता नि आज नाही; अशी स्थिति आहे. या जगांतील आश्चर्यांतील आश्चर्य तें हेंच.

३३७ दुसऱ्या क्षणाचीहि आपणांस शाश्वति नसते; परंतु आपण किती दूरचा विचार करीत बसतों !

३३८ अंडें फोडून पांखरूं बाहेर पडतें, त्याप्रमाणें आत्मा नि शरीर यांचें प्रेम आहे.

३३९ मृत्यु निद्रेप्रमाणें आहे; जीवन निद्रोत्तर जागृतीप्रमाणें आहे.

३४० या क्षुद्र शरीरांत वस्ती करण्याची आत्मा कां बरें इच्छा करितो ? त्याचें शाश्वत असें दुसरें घर नाहीं का ?

## सर्ग ३५ : त्याग

३४१ मनुष्य ज्या वस्तूचा त्याग करतो, त्या वस्तूपासून होणाऱ्या दुःखापासून तो स्वतःला मुक्त करून घेतो.

३४२ आनंद हवा असेल तर निःसंग हो. सर्वसंगपरित्याग केल्यावर तुला अपार आनंद मिळेल.

३४३ पंचेंद्रियांचा चुराडा कर; ज्या ज्या वस्तूंत तुला सुख वाटतें, त्या सर्वांचा संपूर्णपणें संग सोड.

३४४ नि.संग असणें हेच व्रती मनुष्याचें खरें व्रत होय. एकाहि वस्तूचा पुन्हां संग्रह कराल तर पुन्हां पूर्वीच्या जाळ्यांत अडकाल.

३४५ जन्म-मरणाचे फेरे चुकविण्याची ज्याची इच्छा असते त्याला हें शरीरहि ओझें वाटतें, बंधनरूप वाटतें; मग इतर वस्तूंचें त्याला केवढें ओझें वाटत असेल त्याची कल्पना करा.

३४६ मी नि माझें म्हणजे दुसरें कांहीं नसून केवळ अहंकार होय, मिथ्याभिमान होय; यांतून मुक्त होतो तो देवलोकाहून श्रेष्ठ अशा लोकीं जातो.

३४७ आसक्ति न सोडणाऱ्याला चिंता चिकटून बसेल, दुःख त्याला घेरील. ती त्याला कधी सोडणार नाहीत.

३४८ निःसंग झाले ते मोक्षाच्या मार्गाला लागले; परतु आसक्त जाळ्यांत पडले.

३४९ आसक्ति सुटतांच जन्ममरण सुटतें; आसक्ताला या असार संसारांत खिचपत पडावें लागेल.

३५० ज्यानें आसक्ति जिंकली, त्याची आसक्ति धर; निःसंग झाला, त्याची संगति धर; तुझे पाश तुटावे म्हणून अशांशी भक्तिप्रेमाचे बंध जोड.

## सर्ग ३६ : सत्याचा साक्षात्कार

३५१ सारभूत वस्तू सोडून असाराचा स्वीकार करणें म्हणजे केवढा मोह ! त्यामुळें जीव पुनःपुन्हां या दुःखमय संसारांत पडतो.

३५२ जो मोहनिर्मुक्त झाला, त्याची दृष्टि निर्मळ झाली. अज्ञानांधकार त्याला घेरीत नाहीं; आनंद त्याच्याजवळ येतो.

३५३ ज्याचे संशय फिटले, ज्याला सत्याचा साक्षात्कार झाला, त्याला पृथ्वीहून स्वर्ग जवळ असतो.

३५४ मनुष्यजन्म मिळूनहि जर सत्याचा साक्षात्कार करून घेणार नसाल, तर कोणतें हित साधलेंत ?

३५५ कोणतीहि वस्तु असो; तिच्यासंबंधीं सारासार विवेक करणें यालाच प्रज्ञत्व म्हणतात, शहाणपण म्हणतात.

३५६ खोल विचार करून ज्यानें सत्याची अनुभूति घेतली तो अशा मार्गानें जाईल कीं जेणेंकरून जन्ममरणाची यातायात पुनश्च पाठीस लागणार नाहीं.

३५७ सत्याचें चिंतन करून ज्यांनीं तें मिळविलें त्यांना ‘ पुनरपि जननं, पुनरपि मरणं ’ चा विचार करायला नको.

३५८ जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडण्याचा मूर्खपणा होऊं नये म्हणून सत्याच्या नि पूर्णाच्या प्राप्तीसाठीं जो प्रयत्न करतो, तोच खरा प्रज्ञावंत.

३५९ स्वोद्धाराचे मार्ग ज्याला पूर्णपणे अवगत आहेत, जो सर्व प्रकारची आसक्ति जिंकून घेण्याचा प्रयत्न करतो, त्याला ज्या पापांची फळें तो भोगित असतो, ती प्रारब्धप्राप्त कर्मेंहि सोडून जातात; त्यांच्यापासून तो मुक्त होतो.

३६० काम, क्रोध, मोह ज्यानें जिंकले, त्याच्या सर्व दुःखांची निवृत्ति झाली.

## सर्ग ३७ : वासनाक्षय

३६१ वासनांच्या बीजामुळें जीवाला जन्ममरणाचें पीक लाभत असतें.

३६२ जर तुला कशाची तळमळ लागावी असें वाटत असेल, तर जन्ममरणापासून मुक्त होण्याची लागूं दे.

३६३ वासनाक्षयामारखी दुसरी संपत्ति इहलोकी नाही; स्वर्गांतहि या ठेव्याहून अधिक मोलवान ठेवा तुला आढळणार नाहीं.

३६४ शुद्धता म्हणजे काय ? शुद्धता म्हणजे वासनांवर विजय मिळविणें. पूण सत्याची तळमळ लागली, तरच वासनाबंध तोडतां येतात.

३६५ ज्यांनी वासना जिंकली, त्यांनाच मुक्त पुरुष असें म्हणतां येईल; दुसं मुक्तवत् दिसले तरी ते बद्धच असतात.

३६६ तुला धर्म प्रिय असेल तर वासनांपासून पळून जा. कारण वासना म्हणजे निराशा, वासना म्हणजे जाळें.

३६७ संपूर्णपणें निरिच्छ व्हाल, तर म्हणाल त्या मार्गानें मोक्ष मिळेल.

३६८ ज्याला वासना नाहीं, त्याला दुःख नाहीं; परंतु ज्याला साऱ्या वस्तूंचा सोस, त्याच्यावर दुःखापाठीमागून दुःखें कोसळतात.

३६९ वासना म्हणजे सर्वांत मोठी आपत्ति. ज्यानें वासनांना जिंकिलें, त्याला या जगांतच शाश्वत आनंद लाभेल.

३७० वासना कधी तृप्त होत नाहींत. ज्या क्षणी मनुष्य वासनांना झडझडून फेंकून देतो, त्याच क्षणीं त्याला परिपूर्णतेची प्राप्ति होते.

## सर्ग ३८ : नियति ( दैव )

३७१ दैवाची कृपा व्हायची असली म्हणजे मनुष्याला निश्चय-बुद्धिहि येते; परंतु दैव सोडून जाणार असेल तर आलस्य येऊन मिठी मारतें.

३७२ दुर्दैवाचा फेरा येणें म्हणजे मनुष्याची मनःशक्ति मंद होणें, बुद्धि मंद होणें; परंतु दैवाची कृपा व्हायची असेल तर बुद्धीचाहि विकास होऊं लागतो.

३७३ दैवच तुम्हांला ओढित नेऊं लागलें, तर सर्वांच्या डोळ्यांवर जणूं पटल येतें; मग तुमची विद्या, तुमची बुद्धि, यांचा कांही उपयोग नसतो.

३७४ जगाचे परस्परविरोधी असे दोन भाग पडतात. यशस्वी जीवन आणि साधुता या दोन भिन्न गोष्टी आहेत.

३७५ जेव्हां काळ तुझ्या विरुद्धच असेल, तेव्हां चांगल्या गोष्टीहि वाईट होतील; परंतु वेळ बदलतांच वाईटाचेंहि चांगलें होईल.

३७६ तूं कितीहि काळजी घेतलीस तरी दैवाच्या मनांत जें तुला द्यावयाचें नाहीं, तें तुला ठेवून घेतां येणार नाहीं. आणि दैवाला जें तुला द्यावयाचें आहे, तें तूं नको नको म्हटलेंस तरी तुझ्याजवळून जाणार नाहीं.

३७७ दैव सर्वशासक आहे. त्याच्या आज्ञेवांचून तुला तुझ्या अगणित संपत्तीचा उपभोग घेतां येणार नाही.

३७८ या जगांत रंजले गांजलेले शेवटीं वैराग्याकडे मनें वळवतात; परतु जीं दुःखें त्यांच्या नाशिबी आहेत, त्यांच्या भोगासाठीं दैव त्यांचा पाठपुरावा करितें, त्यांना अडवून ठेवतें.

३७९ चांगलें झालें असतां जे उड्या मारतात, तेच वाईट झालें असतां कां रडूं लागतात ? कां दुःखीकष्टी होतात ?

३८० नियतीहून, दैवाहून बलवान असें काय आहे ? प्राणी आपणांस खाऊं पहाणाऱ्या दैवावर विजय मिळविण्याचे बेत करीत असतो; परंतु दैव त्याला आधीच बांधून खाली खेंचतें.

# भाग ३ रा : अर्थ

## १ : राजा

### सर्ग ३९ : राजाचे गुण

३८१ सैन्य, प्रजा, संपत्ति, मांत्रि, मित्र नि किल्लेकोट या सहा वस्तू ज्याच्याजवळ आहेत तो खरा राजसिंह.

३८२ धैर्य, औदार्य, धूर्तता नि उत्साह हे चार गुण राजाजवळ नेहमी हवेत.

३८३ जे पृथ्वीवर सत्ता गाजवतात, त्यांच्याजवळ पुढील तीन गुण असतात: १ सदैव सज्जता २ विद्या ३ प्रत्युत्पन्नमतित्व (झटपट निर्णय घेण्याची बुद्धि)

३८४ गुणहीन राजा काय कामाचा? राजानें अधर्माचें शासन करावें, स्वतःच्या यशाला प्राणांपेक्षां जपावें, क्षात्रधर्माविरुद्ध पाप त्यानें करूं नये.

३८५ आपल्या राज्यांतील समृद्धि कशी वाढेल, आपला खजिना भरलेला कसा राहील, या गोष्टी राजाला माहीत हव्यात. त्याप्रमाणेंच आपल्या संपत्तीला कसें जपावें, तिचा योग्य व्यय कसा करावा, हेंहि त्याला माहीत हवें.

३८६ ज्या राजाजवळ प्रजेला जातां येतें, जो सर्वांना प्राप्य आहे, जो गोड बोलतो, त्या राजाच्या राज्याची इतर राज्यापेक्षां सर्वत्र अधिक प्रशंसा होईल.

३८७ जो उदारपणानें देतो नि प्रेमानें राज्य करतो, अशा राजाची कीर्ति जगभर पसरते; जो प्रदेश घ्यावा असें त्याला वाटेल, तो त्याच्या सत्तेखाली येईल.

३८८ जो निःपक्षपाती न्याय देतो नि प्रजापालन काळजीपूर्वक करतो, तो नरश्रेष्ठ म्हणून मानला जाईल, तो देवमाणूस होईल.

३८९ ज्या राजाजवळ कटु बोलणेंहि शान्तपणें ऐकून घेण्याचा गुण आहे, त्याच्या छत्रछायेच्या पाठोपाठ सारी प्रजा येईल, सारी प्रजा त्याच्या पाठीशी उभी राहील.

३९० जो राजा उदार आहे, जो मनाचा मोठा आहे, जो प्रसन्न दिसतो, न्यायी असतो, जो प्रजेचें नीट पालन करतो, तो राजकुलदीपक होय. तो खरा राजमणि.

## सर्ग ४० : विद्या

३९१ संपाद्य विद्या सतत यत्नपूर्वक संपूर्णपणें संपादावी.

३९२ मनुष्याचे खरे डोळे दोन : अंकज्ञान नि अक्षरज्ञान ( गणित नि लेखन )

३९३ जे विद्यावंत आहेत, तेच खरे डोळस; इतरांच्या तोंडावर दोन खांचा फक्त आहेत.

३९४ विद्वानांचा मेळावा म्हणजे आनंदाची पर्वणी, ती खरी दिवाळी, तो खरा दसरा; पुन्हां वियुक्त होतांना त्यांची हृदयें किती कष्टी होतात, उदासीन होतात !

३९५ याचक धनिकासमोर धुळींत वांकतो, त्याप्रमाणें गुरूसमोर वांकावें लागलें तरी तूं विद्या मिळवीत असतोस. जे विद्या मिळवूं इच्छित नाहींत ते खरे नीच जातीचे.

३९६ ज्ञान हें वाळूतील झऱ्याप्रमाणें आहे; जितकें खोल खणाल तितकें अधिकच स्वच्छ नि उत्कृष्ट पाणी.

३९७ विद्वानाला सर्वत्र स्वदेशच आहे. हें विश्व त्याचें घर बनतें. असें आहे तरीहि मनुष्य मरेपर्यंत ज्ञानार्जनाच्या बाबतींत उदासीन कां बरें राहतो ?

३९८ या जन्मीं मिळवलेल्या विद्येनें तुम्हांला सात जन्मभर श्रेष्ठता लाभेल.

३९९ ज्या ज्ञानानें मला आनंद होतो, तें ऐकून इतरांनाहि होईल हें विद्वान मनुष्य जाणतो; आणि म्हणून तो ज्ञानावर अधिकच प्रेम करूं लागतो.

४०० खरा अन्याय नि निर्दोष असा ठेवा जर कोणता असेल तर तो ज्ञानाचा होय; त्याच्यापुढें बाकी सारी संपत्ति तुच्छ आहे.

## सर्ग ४१ : शिकण्याच्या बाबतींत काळजी न घेणें

४०१ भरपूर ज्ञान असल्याशिवाय सिंहासनावर बसणें; म्हणजे पटाशिवाय सोंगट्या खेळण्याप्रमाणें आहे.

४०२ ज्ञानाशिवाय सभेंत वक्ता म्हणून मिरविण्याची इच्छा करणें हें कुरूप स्त्रीनें सर्वां-कडून वाहवा मिळविण्याची इच्छा करण्याप्रमाणें आहे.

४०३ विद्वानांसमोर मौन धरणारा मूर्ख असला, तरी पंडित मानला जाईल.

४०४ अनधीत मनुष्य कितीहि हुशार असला तरी प्रज्ञावत लोक त्याच्या मताला मान देत नाहीत.

४०५ अध्ययनाची उपेक्षा करून आपण हुशार व शहाणे आहोंत अशी कल्पना करून जो बसतो, त्यानें सभेंत तोंड उघडतांच त्याची फजीती होते.

४०६ अध्ययनहीन मनुष्य पीक न देणाऱ्या पडित वावराप्रमाणें आहे. हा केवळ जिवत आहे एवढेंच त्याच्याविषयीं बोलतील.

४०७ ज्याची बुद्धि सूक्ष्म नि महान् वस्तूंत शिरूं शकत नाहीं, तो बाहेरून कितीहि सुंदर असला तरी तें त्याचें सौंदर्य मातीच्या मूर्तीच्या सौंदर्याप्रमाणें आहे.

४०८ विद्वान् मनुष्य दरिद्री असतो ही गोष्ट खरी; परंतु मूर्खाच्या हातीं द्रव्य असणें ही गोष्ट फारच वाईट.

४०९ हीनकुळांत जन्मूनहि ज्यानें ज्ञान मिळविलें, अशाला जसा मानसन्मान मिळेल तसा मोठ्या कुळांत जन्मून परंतु अडाणी असणाऱ्याला मिळणार नाही.

४१० पशूहून मनुष्य जितका श्रेष्ठ, तितका मुर्खाहून विद्वान् श्रेष्ठ.

## सर्ग ४२ : शहाण्यांची शिकवण ऐकणें

४११ कानांनीं आपण जें ऐकतों तें सर्वश्रेष्ठ धन होय.

४१२ ज्या वेळेस कानांना खाद्य नसेल त्या वेळेसच पोटाला खाद्य मिळेल. (ज्ञानाच्या गोष्टी ऐकायला मिळत असतां पोटाकडे कोण लक्ष देईल ?)

४१३ ज्यांनीं बहुश्रुतत्व संपादिलें, अपार ज्ञानामृत सेविलें, ते जणूं पृथ्वीवरचे देव आहेत.

४१४ तुमच्याजवळ विद्या नसली तरी निदान कानांनी ऐका; ज्या वेळेस अडचणी आ पसरून येतील, त्या वेळेस कानांवर पडलेलें कामास येईल. (तें श्रवणज्ञान खांबाप्रमाणें आधार देईल.)

४१५ धर्मवान् लोकांचा उपदेश भक्कम काठीप्रमाणें आहे. हा उपदेश ऐकणारा कधी घसरणार नाही, काठीप्रमाणें घसरण्यापासून वांचवील.

४१६ थोडेंसें जरी चांगले ऐकायला मिळालें तरी तें ऐकावें. त्या थोड्याशा शब्दांनीहि तुला थोडी श्रेष्ठता नि प्रतिष्ठा लाभेल.

४१७ ज्यानें भरपूर मनन केलें आहे, पुष्कळ श्रवण केलें आहे, तो चुकूनहि वायफळ बोलत नाहीं.

४१८ ज्या कानांना श्रवणाचा अभ्यास नाहीं, थोरांची शिकवण ज्यांनी कधीं ऐकिली नाहीं. ते कान ऐकणारे असले तरी बहिरेच समजावे.

४१९ प्रज्ञावंतांचे सूक्ष्म नि अर्थगंभीर संवाद ज्यांनी कधी ऐकले नाहीत, त्यांच्या जवळ नम्र वाणी कोठून येणार ?

४२० जे कानांची चव न जाणतां फक्त जिभेची चव जाणतात, ते काय कामाचे ?

## सर्ग ४३ : समजून घेणें

४२१ अकस्मात् येणाऱ्या सर्व भयांपासून सरक्षण करणारें ( चिलखत ) कवच म्हणजे ज्ञान होय. ज्ञानाचा किल्ला शत्रूला कधीहि जिंकतां येणार नाहीं.

४२२ तुमच्याजवळ व्यवस्थित ज्ञान असलें, सारें नीट पद्धतशीरपणें समजून घेण्याची बुद्धि असली म्हणजे तुमची इंद्रियें वारेमाप भटकणार नाहींत. ती पापापासून दूर राहून मंगलाकडेच वळतील.

४२३ कोणत्याहि माणसाच्या उद्‌गारांतील सत्यासत्याचा निवाडा करतां येणें म्हणजे खरें शहाणपण.

४२४ ज्याचें बोलणें सर्वांना समजतें आणि दुसऱ्याच्या बोलण्यांतील सूक्ष्म नि गर्भितार्थ ज्याला समजतात, तोच खरोखरचा शहाणा.

४२५ शहाणा मनुष्य सर्वांना आकर्षितो, सर्वांना वेध लावतो; त्याचा स्वभाव नेहमी शान्त असतो; तो संकुचित नसतो, अघळपघळहि नसतो. सारे प्रमाणांत.

४२६ जगाच्या रीतिभातीप्रमाणें आपली चालचलणूक ठेवणें यांत शहाणपणाचा भाग आहे.

४२७ शहाणा विचारी मनुष्य पुढें काय होणार तें ओळखतो; मूर्खाला पुढें कांही दिसत नाहीं.

४२८ संकटांत, धोक्यांत एकदम उडी घेणें म्हणजे मूर्खपणा आहे; भीति वाटण्या-सारख्या वस्तुविषयी भीति वाटणें, सावध असणें, यांत शहाणपणाच आहे.

४२९ दूर दृष्टीचा मनुष्य येणाऱ्या प्रत्येक प्रसंगासाठी सज्ज असतो.

४३० ज्याच्याजवळ विवेकबुद्धि आहे, त्याच्याजवळ सारें कांही आहे; मूर्खाजवळ सारें असून नसल्यासारखेंच.

## सर्ग ४४ : दोषांचें निर्मूलन करा

४३१ जो मनुष्य औद्धत्य, क्रोध नि क्षुद्रता या दोषांपासून दूर असतो, त्याच्या जवळ एक प्रकारची प्रतिष्ठा, श्रेष्ठता तुम्हांला दिसेल. त्याचें वैभव त्यामुळें शोभून दिसतें.

४३२ कार्पण्य, फाजील आत्मविश्वास आणि अमर्याद अनंगरंग हे राजाचे तीन मोठे दोष होत.

४३३ स्वतःच्या कीर्तीला डोळ्यांत तेल घालून जे जपतात, ते स्वतःच्या लहानशा दोषालाहि पर्वतासमान लेखतात.

४३४ कोणत्याहि प्रकारचें दुर्बलत्व अंगी नसावें म्हणून जप; कारण त्यामुळें शेवटी नाश होतो. सर्वांत मोठा शत्रु म्हणजे दुर्बलत्व.

४३५ अकस्मात् येणाऱ्या संकटासाठी ज्याची तयारी नसते, त्याचा, अग्नीनें गवताची गंजी जळून जाते त्याप्रमाणें, सर्वनाश होईल.

४३६ राजानें प्रथम आपले दोष दूर करावे नि मग दुसऱ्याचे दाखवावे. असें करील तर त्याच्यावर दुःखसंकटें कशी येतील ?

४३७ खर्चायला पाहिजे तेथेंहि खर्च न करणाऱ्या कृपणाची धनदौलत शेवटीं धुळीस मिळते.

४३८ मूठ कधीहि सैल न करणारा कंजूषपणा हा एक स्वतंत्र दुर्गुण आहे. त्याची इतर दुर्गुणांत गणना करून चालणार नाहीं.

४३९ कधींहि कशानें फुशारून जाऊं नको, शेफारून जाऊं नको. ज्यामुळें तुझें भलें होणार नाहीं, असें धाडस करण्याच्या भानगडींत पडूं नको.

४४० ज्या गोष्टींमध्यें तुझ्या हृदयाचा परमानंद आहे, त्या गोष्टींसुद्धां तूं जर दुसऱ्यांस कळूं दिल्या नाहींस, त्यांना सांगितल्या नाहींस, तर शत्रूंनी कितीहि कारस्थानें केली तरी त्यांना तुझें कांहीहि वांकडें करतां येणार नाहीं.

## सर्ग ४५ : सज्जनांची मैत्री

४४१ सदाचाराच्या मार्गानें जातां जातां जे वृद्ध झाले, त्यांना मान दे, त्यांचा स्नेह जोड.

४४२ तुझ्यावर आलेली संकटें जो दूर करूं शकेल आणि येणाऱ्या आघातांपासून जो तुला वांचवूं शकेल, अशाला धुंडाळून मोठ्या उत्सुकतेनें त्याची मैत्री जोड.

४४३ खऱ्या योग्यतेच्या माणसांची निष्ठा जर तुला मिळूं शकली तर अत्यंत दुर्मिळ असा एक ठेवा तुला मिळाला.

४४४ तुझ्याहून मोठ्या योग्यतेचे जर तुझे मित्र झाले तर ज्याच्यापुढें इतर सारी सामर्थ्यें फिकीं पडतील असें थोर सामर्थ्य तूं मिळवलेंस असें म्हणतां येईल.

४४५ मंत्री म्हणजे राजाचे डोळे. सारासार विचार करून मोठ्या शहाणपणानें त्यानें ते निवडावे.

४४६ खऱ्या थोर पुरुषांच्या संगतीत जो असतो, त्याच्यासमोर त्याचे शत्रु हतप्रभ होतात.

४४७ जे आपणांस शिकवूं शकतील, आपले कान उपटण्याचा ज्यांना अधिकार आहे, अशांची मैत्री ज्यानें जोडली, त्याचा नाश कोण करूं शकेल ?

४४८ आपल्याहून जे श्रेष्ठ आहेत, जे आपणांस चार हिताचे शब्द सांगूं शकतील आपली कानउघाडणी करूं शकतील, अशांची मैत्री जो राजा जोडित नाही, त्याचा शत्रु नसले तरीहि नाश होईल.

४४९ भांडवलाशिवाय नफा नाही. त्याप्रमाणें शहाण्यांचा ज्याला खंबीर आधार नाही, त्याचें आसन स्थिर नाही.

४५० एकदम अनेक शत्रू उत्पन्न करणें अविचार होय; परंतु भल्याभल्या माणसांचा स्नेह गमावून बसणे हा दुसपट अविचार होय.

## सर्ग ४६ : नीच संगत नको

४५१ थोर लोक नीचांच्या संगतीस भितात; परंतु हलक्या मनाचे लोक त्यांच्यांत इतके मिसळतात की जणूं एका कुटुंबांतील होतात.

४५२ पाणी ज्या जमिनीवरून वाहातें, तिचा रंगरूप घेतें. त्याप्रमाणेंच मन ज्या संगतींत रमतें तसें होतें.

४५३ मनुष्याची बुद्धि, त्याचे विचार त्याच्या मनांत असतात. परंतु त्याचा नांवलौकिक तो जी संगत धरतो तिच्यावर अवलंबून असतो.

४५४ मनुष्याचा स्वभाव त्याच्या मनोवृत्तींत आहे असें दिसतें; परंतु ज्या मंडळींत तो उठतो बसतो तेथें त्याच्या स्वभावाचें खरें माहेर असतें.

४५५ मनाची शुद्धता नि कृतीची निर्मलता पवित्र संगतीवर अवलंबून असतात.

४५६ ज्यांची मनें विशुद्ध, त्यांची संततीहि विशुद्ध असते. ज्यांनीं भल्यांची संगति धरिली, त्यांची सर्वतोपरी भरभराट झाली.

४५७ शुद्ध हृदय हा मनुष्याचा अमोल ठेवा होय; सतसंगतीमुळें कीर्ति मिळते, मोठेपणा मिळतो.

४५८ शहाणे लोक स्वत: सर्वगुणसंपन्न असले तरी थोरांची संगत धरतात. कारण थोरांची संगति म्हणजे सामर्थ्याचा सांठा असें ते मानतात.

४५९ सद्गुण तुम्हांला स्वर्ग देतात; सत्संगति मनुष्यास सत्पथावर स्थिर करते.

४६० सत्संगतीहून दुसरा मोठा मित्र नाहीं. वाईट संगतीमुळें जितकीं संकटें येतात तितकी कशानेंच येत नाहींत.

## सर्ग ४७ : करण्यापूर्वी विचार

४६१ कोणतेंहि काम सुरू करण्यापूर्वीं भांडवल किती लागेल, नफा किती होईल, तोटा किती होईल, याचा विचार कर.

४६२ योग्यतेचे म्हणून ज्यांना निवडले अशांशी विचारविनियम करूनच जो राजा कोणत्याहि कार्यास उद्युक्त होतो, त्याला या जगांत अशक्य असें कांहीच नाही.

४६३ अमुक केलें तर भरपूर फायदा होईल असें वाटतें. मनुष्य भुलतो; परंतु-फायदा तर राहोच, भांडवलहि जातें. विचारवंत लोक अशी कार्ये कधी अंगावर घेत नाहीत.

४६४ दुसऱ्यांनीं आपला उपहास करूं नये असें ज्यांना वाटतें, त्यांनी विचार केल्याशिवाय कोणत्याहि कार्यास प्रवृत्त होऊं नये.

४६५ युद्धास उद्युक्त होण्यापूर्वी बारीकसारीक गोष्टीचाहि विचार नि तरतूद जर तुम्ही केलेली नसेल, तर आपण होऊन तुम्ही स्वतःच्या शत्रूस अजिंक्य करतां.

४६६ न करण्यासारख्या गोष्टी करशील तर नाश होईल; करण्यासारख्या न करशील तरीहि नाश.

४६७ पूर्ण विचार केल्यावांचून कांहींहि नक्की करूं नको; आधीं कामाला आरंभ करून मागून मी विचार करीन असें जो मनांत म्हणतो, तो मूर्ख होय.

४६८ योग्य मार्गानें जो कार्यास प्रवृत्त होत नाहीं, त्याच्या मदतीस कितीहि धांवून आले तरी उपयोग नसतो.

४६९ आपण जें करतों तें दुसऱ्यांना कितपत मानवेल, त्याला ते कितपत पात्र आहेत, याचा विचार न करतां जरी भलें केलेंत तरी तें चूक असण्याचा संभव असतो.

४७० जें कांहीं करायचें ठरवशील तें अनिंद्य असें असो. स्वतःला न शोभणारें कर्म करायला जो प्रवृत्त होतो, त्याचा जग उपहास करतें.

## सर्ग ४८ : सामर्थ्याचा अंदाज

४७१ कोणत्याहि कार्यास प्रवृत्त होण्यापूर्वीं त्यांतील अडचणी, शत्रूचें नि स्वतःचें बलाबल, शत्रूच्या नि आपल्या मित्रांचें बल, या सर्वांचा नीट विचार करायला हवा.

४७२ जो राजा स्वतःची शक्ति जाणतो, स्वतःच्या सैन्याचें बळ जाणतो, माहीत हव्यात अशा सर्व गोष्टी ज्याला माहीत असतात, आपल्या शक्तीपलीकडील गोष्टीस आणि माहीत नाही अशा कामास जो हात घालीत नाहीं, त्याला कधीं अपयश येणार नाहीं.

४७३ सूडबुद्धीमुळें, रक्ताच्या तहानेमुळें, स्वतःच्या शक्तीची अवास्तव कल्पना करून जे साहसास प्रवृत्त झाले नि शेवटी मारले गेले, अशांचीं कितीतरी उदाहरणें दाखवतां येतील.

४७४ स्वतःच्या सामर्थ्याची ज्यांना नीट कल्पना नसते, शान्तिमय जीवनाची ज्यांना जाणीव नाही, जे अहंमन्य असतात, त्यांचा नाश होतो.

४७५ मोराची पिसें झाली म्हणून तू जर तीं वाटेल तितकी गाडीत भरशील तर त्यामुळेंहि गाडीच्या चाकाचा कणा मोडेल. ( एकेकटा शत्रु तादृश धोक्याचा

न वाटला, तरी अनेक शत्रू जर एकदम निर्माण झाले तर राजाचा अंत निश्चित. )

४७६ जे झाडाच्या शेंड्याला पोंचल्यावरहि आणखी वर चढूं पाहतात, त्यांचा नाश होतो, ते जीवनास मुकतात.

४७७ आपली संपत्ति किती आहे तें लक्षांत घेऊन देणग्या देत जा; आपलें द्रव्य-बळ नीट राखून व्यय करावा.

४७८ पाण्याची नळी बारीक असली तरी हरकत नाही; तोटी मोठी ठेवूं नको म्हणजे झालें. ( सर्वशक्ति संपुष्टांत आल्यावरहि आणखी नवीन साहसें करूं पाहणाऱ्यांना ही धोक्याची सूचना आहे. )

४७९ आपल्या शक्तीचा जो विचार करीत नाही, प्रमाणांत जो रहात नाहीं, तो जरी वैभवांत दिसला तरी त्याचा नाश होईल, त्याचा मागमूसहि राहणार नाही.

४८० जो आपल्या द्रव्याची नीट गणना करीत नाही, वाटेल तशी जो उधळपट्टी करतो, त्याचें लौकरच सारें संपुष्टांत येईल.

## सर्ग ४९ : योग्य संधी ओळखणें

४८१ ज्या राजाला आपले शत्रू जिंकून घ्यायचे आहेत, त्यानें संधींचें महत्त्व नीट ओळखलें पाहिजे. दिवस असतो तेव्हांच कावळा घुबडावर विजय मिळवितो.

४८२ काळाच्या मागें न राहतां बरोबर रहा. म्हणजे भाग्यदेवतेशी तुझा दृढ संबंध राहिल.

४८३ योग्य साधनें योजून नि योग्य वेळ ओळखून जर मनुष्य कार्यप्रवृत्त होईल तर त्याला अशक्य काय आहे ?

४८४ तुझे हेतू योग्य असतील नि वेळहि योग्य असेल तर सारी पृथ्वी तूं जिकून घेशील.

४८५ जे विजिगीषु आहेत ते योग्य संधीची वाट पहात असतात. ते गोंधळणार नाहीत, गडबडघाई करणार नाहीत.

४८६ जोराचा तडाका देण्यापूर्वीं शेळी जरा मागें येते. सामर्थ्यवान् मनुष्य निष्क्रिय दिसला तरी त्याचें निष्क्रियत्व या तऱ्हेचें असतें.

४८७ शहाणा मनुष्य त्याच वेळेस आपला क्रोध दाखवीत नाही. तो त्याला मनांत ठेवून योग्य संधीची वाट पहात बसतो.

४८८ तुझे शत्रू तुझ्यापेक्षां बलवान् असतील तेव्हां त्यांच्यासमोर नमतें घे; परंतु त्यांची शक्ति कमी होत आहे असें दिसतांच जर त्यांच्यावर निर्धारानें हल्ला चढवशील तर त्यांचा उच्छेद करशील.

४८९ कधीं न येणारी संधीहि गमावलीस तरी रडत बसूं नकोस. अशक्यहि पुन्हां मिळवीन अशा निर्धारानें कामाला लाग.

४९० वेळ प्रतिकूल असेल त्या वेळेस करकोचाप्रमाणें निष्क्रियतेचें ढोंग कर; परंतु योग्य वेळ येतांच ( भरतीची वेळ येतांच ) झपाट्यानें प्रहार कर. ( करकोचाच्या चोंचीच्या वेगानें घाव घाल. )

## सर्ग ५० : स्थानपरीक्षा

४९१ युद्धाच्या जागेची नीट पाहणी केल्याशिवाय युद्धाची पाळी आणूं नकोस.

४९२ सुरक्षित, नीट मार्‍याची जागा असेल तर सामर्थ्यसंपन्नांचाहि फार फायदा होतो.

४९३ युद्धभूमीचें नीट निरीक्षण करून कुशलतेनें नि सावधानपूर्वक हालचाल केली तर दुर्बलसुद्धां प्रबलांसमोर टिकाव धरतील; एवढेंच नाहीं, तर त्यांच्यावर विजय मिळवूं शकतील.

४९४ नीट पाहणी करून दुर्गम अशा स्थळी जर ठाण मांडून रहाल तर शत्रूचे सारे बेत फसतील.

४९५ खोल पाण्यांत सुसरीचें बळ; ती बाहेर येईल तर शत्रूचें खेळणे होईल.

४९६ कितीहि भक्कम चाकांचा असला तरी रथ समुद्राच्या पाण्यावरून धडधड जाणार नाही; आणि समुद्रावरून झरझर जाणारें गलबत जमिनीवरून चालणार नाही.

४९७ जो आधींपासून तयार आहे, आणि योग्य वेळ येतांच तडाखा द्यायची जो वाट पहात आहे, त्याला स्वतःच्या धैर्याची जोड असली म्हणजे पुरे; अशा राजाला दुसऱ्या दोस्तांची जरूर नाही.

४९८ राजानें जर योग्य असें रणक्षेत्र निवडलें तर थोडें सैन्य असूनहि तो प्रबळ शत्रूचे सारे खटाटोप व्यर्थ दवडील.

४९९ शत्रू जोंपर्यंत स्वतःच्या जागेंत आहे तोंपर्यंत, मग त्याची ती जागा नीट सुरक्षित जरी नसली किंवा तेथें इतर सोयी जरी नसल्या तरी, त्याचा पराभव करणें कठीण जातें.

५०० हजारों भालाइतांना पाहूनहि जो गजराज जराहि डोळा लववीत नाहीं, तोच दलदलींत फसल्यावर कोल्ह्यांकडून पराभूत केला जातो.

## सर्ग ५१ : ज्यांच्यावर विश्वास टाकायचा त्यांची परीक्षा

५०१ मनुष्याची परीक्षा चार रीतीनें करावी : सत्यप्रीति, धनप्रीति, सुखप्रीति आणि प्राणप्रीति. या चार कसोट्या लावून मग विश्वास ठेवावा.

५०२ जो कुलज आहे, अपकीर्तीला जो भितो, जो निर्दोष आहे, तो मनुष्य तुला योग्य आहे.

५०३ हृदयानें पवित्र, विद्वत्तेनें गाढे असे पुरुषहि कांही बाबतीत अनभिज्ञ असतात, असें परीक्षान्तीं दिसून येतें.

५०४ मनुष्यांतील चांगुलपणा नि वाईटपणा, दोहोंचें वजन करून ज्याचें वजन जास्त भरेल तो त्या मनुष्याचा स्वभाव समजावा.

५०५ मनुष्याच्या वर्तनावरून तो मोठ्या मनाचा आहे कीं क्षुद्र मनाचा आहे तें दिसून येतें.

५०६ ज्यांना आप्तेष्ट नाहीत त्यांच्याजवळ जपून वागावें. त्यांच्या मनांत प्रेमाचा ओलावा नसतो, ते कमालीचे निष्ठुर असतात.

५०७ एखाद्या मूर्खावर केवळ आपलें प्रेम आहे म्हणून त्याला जर तूं सल्लागार नेमशील तर तो तुला वाटेल तितके वेडेचार करायला लावील.

५०८ पारख केल्याशिवाय जो दुसऱ्यावर विश्वास ठेवतो, तो आपल्या भावी पिढ्यांसाठीहि भरपूर त्रास व संकटें निर्माण करून ठेवितो.

५०९ परीक्षा केल्याशिवाय कोणावर विश्वास ठेवूं नकोस. आणि परीक्षा केल्यावर त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांना काम दे.

५१० परीक्षा घेतल्याशिवाय माणसावर विश्वास ठेवणें, तसेच मोठ्या योग्यतेच्या माणसाविषयी संशय घेणे — दोहोंमुळें फार त्रास सोसावा लागतो.

## सर्ग ५२ : परीक्षा घेऊन कामावर नेमणें

५११ सत् काय, असत् काय, याचा विवेक करून जो सत् पसंत करतो, त्याला कामावर नेम.

५१२ राज्यांतील साधन-सामुग्रीचा नीट उपयोग करून राज्याची जो भरभराट करूं शकेल, आणि आपत्तींचा जो परिहार करूं शकेल, अशाला तूं कारभारी कर.

५१३ दयाळू, बुद्धिवान, पटकन निर्णय घेणारा आणि निर्लोभ, अशाला आपल्या सेवेंत घे.

५१४ सर्व कसोटींना उतरूनहि मनुष्य ऐन वेळीं बदलूं शकतो, अशीं पुष्कळ उदा-
हरणें आहेत.

५१५ जो कर्मकुशल आहे, चिकाटीनें कष्टपूर्वक जो काम करूं शकेल, अशावर काम सोंपव. केवळ एखाद्यावर आपलें प्रेम आहे म्हणून नको.

५१६ सेवकाची नीट निवड करून मग योग्य तें काम त्याला दे. कोणतेंहि कार्य करायची योग्य वेळ येईल तेव्हांच सेवकास तें करायला सांग.

५१७ त्या त्या माणसाची पात्रता, शक्ति बघून मगच कोणत्याहि कामाची जबाबदारी त्याच्यावर सोंपवावी.

५१८ एखाद्या कामाला अमूक एक मनुष्य लायक आहे असें दिसल्यावर, त्याचा दर्जा वाढव; तें काम त्याला ज्यायोगें पार पाडतां येईल, त्या साऱ्या सवलती त्याला दे.

५१९ कार्यकुशल सेवकानें आपण होऊन कांहीं सवलती घेतल्या, थोडें स्वातंत्र्य घेतलें, तर धन्यानें लगेच त्याचा विपर्यास करूं नये. धनी असें करील तर भाग्य त्याला सोडून जाईल.

५२० राजानें प्रत्यहीं सर्व कामावर देखरेख ठेवावी. राज्यांतील अधिकारी जोंपर्यंत चांगले आहेत, तोंपर्यंत धोका नाहीं.

## सर्ग ५३ : आप्तेष्टांना संतुष्ट ठेव

५२१ विपत्तींतहि स्नेहसंबंध ठेवणें हें आपल्या रक्ताचे आप्तच करूं शकतील.

५२२ ज्यांचें प्रेम जुगारी नाहीं असे प्रेमळ आप्त जर मनुष्याला असतील तर त्याचें भाग्य नेहमीं वाढतच जाईल.

५२३ जो मनुष्य आपल्या आप्तांजवळ मिळून मिसळून वागत नाहीं, त्यांचें प्रेम संपादूं शकत नाहीं, तो बांध नसलेल्या तळ्याप्रमाणें आहे. त्याचें भाग्य वाहून जाईल.

५२४ कुंटुंबियांना, आप्तांना एकत्र आणणें, त्यांचें प्रेम संपादणें, हा संपत्तीचा हेतु नि उपयोग आहे.

५२५ मनुष्य उदार नि जिभेचा गोड असेल तर सारे आप्त त्याच्या भोंवतीं गोळा होतील.

५२६ जो कुरकुर न करतां उदारपणानें देतो त्याच्यासारखा सखा नि आप्त या जगांत दुसरा कोण ?

५२७ स्वार्थी बनून कावळासुद्धां आपला तुकडा आपल्या जातभाईपासून लपवून ठेवूं इच्छित नाही; तर प्रेमानें सर्वांसह खातो. समानशील लोकांपाशीं भाग्य राहते.

५२८ आप्त असले तरी त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप राजानें त्यांना वागवावें. कारण आपणांस मिळालेल्या सवलती नि अधिकार दुसऱ्यांस मिळूं नयेत असें कांहींना वाटतें.

५२९ रागावून सोडून गेलेल्या आप्ताला परत आणण्याचा सोपा उपाय आहे, ज्यामुळें स्नेहभाव दूर झाला होता तें कारण दूर करणें.

५३० एकदां फुटून निघून गेलेला आप्त परत आला तर त्याला जवळ करावें; परंतु जरा जपून त्याच्याजवळ वागावें.

## सर्ग ५४ : अखंड सावधानता

५३१ सुखासीन बनून सावधगिरी न ठेवणें फार वाईट. अतिक्रोधाहूनहि अशी बेसावधगिरी वाईट असते.

५३२ दारिद्र्यामुळे आकलन शक्ति मरते, त्याप्रमाणें सुरक्षिततेच्या खोट्या कल्पनेनें तुमचें वैभव नष्ट होतें.

५३३ जो दक्ष नाही त्याला भाग्य नाहीं. जगांतील सर्व विचारवंतांनी हा निर्णय दिला आहे.

५३४ किल्लेकोट असून भ्याडाला काय उपयोग ? जो दक्ष नि सावध नसतो, त्याला साधनांची विपुलता असूनहि काय उपयोग ?

४३५ जो आधींपासून दक्ष रहात नाहीं, तो संकट आल्यावर आपल्या निष्काळजी-पणासाठीं रडत बसेल.

५३६ सर्वाच्या बाबतीत नेहमीं जागरूक असणें फार चांगलें.

५३७ ज्याचें मन सदैव सावधान नि दक्ष असतें, त्याला या जगांत अशक्य कांहीं नाहीं.

५३८ विचारवतांनी जें करायला सांगितलें आहे तें राजानें परिश्रमपूर्वक नेहमीं करावें. जर तो दुर्लक्ष करील तर सात जन्म पस्तवावें लागेल.

५३९ निश्चिंत असावें, कशाची काळजी करूं नये, असें तुला वाटलें तर बेफिकीर राहिल्यामुळें ज्यांचा सर्वनाश झाला, त्यांचीं उदाहरणें डोळ्यांसमोर आणीत जा.

५४० मनुष्य ध्येयाला सदेव डोळ्यांसमोर ठेवील तर तें प्राप्त करून घेणें त्याला खरोखर कठीण नाही.

## सर्ग ५५ : न्यायी राज्य

५४१ तुला चांगला न्याय द्यायचा आहे ना ? तर नीट विचार कर, पंडितांचा सल्ला घे आणि निःपक्षपातीपणानें वाग.

५४२ जगाची जगण्यासाठी आकाशांतील ढगांकडे दृष्टि असते. त्याप्रमाणें रक्षणा-साठी लोकांचे डोळे राजदंडाकडे असतात.

५४३ विद्येचा नि धर्माचा मुख्य आधार राजदंड होय.

५४४ जो राजा प्रेमानें प्रजापालन करतो, त्याला सोडून राज्यपद जाणार नाही.

५४५ जो राजा न्यायानें राजदंड हातांत ठेवतो नि योग्य रीतीनें राज्य चालवितो, त्याच्या राज्यांत वेळेवर पाऊस पडेल.

५४६ राजाला भालातरवारीनें विजय मिळत नसतो; नि:पक्षपाती न्याय त्याला विजय देतो.

५४७ राजा सर्व प्रजेचा पालक होय. कोणत्याहि बाजूला न झुकतां तो जर नि:पक्षपाती राहील तर राजदंड त्याचा सांभाळ करील.

५४८ जो राजा प्रजेला भेटूं इच्छित नाहीं, जो योग्य कारणमीमांसा कधी करीत नाहीं, तो वैरी नसतांहि नाश पावतो.

५४९ अन्तर्बाह्य शत्रूंपासून प्रजेचा सांभाळ करणाऱ्या राजानें दुष्ट लोकांचें, वाईट मार्गानें जाणाऱ्यांचें जर शासन केलें तर तो दोष नव्हे; त्याचें तें कर्तव्यच आहे.

५५० दुष्टांना देहान्तशासन देणें हें धान्याच्या शेतांतून निरुपयोगी गवत उपटून टाकण्याप्रमाणें.

## सर्ग ५६ : छळ

५५१ जो राजा सर्वांना समतेनें वागवीत नाही, प्रजेवर जुलूम करतो, तो खुनी माणसाहूनहि वाईट.

५५२ सत्तेच्या जोरावर प्रजेजवळ वाटेल तें मागणें म्हणजे "उभा रहा. काय असेल तें दे." असें मागणाऱ्या दरोडेखोराप्रमाणेंच होय.

५५३ जो राजा रोज राज्यकारभाराची देखरेख करीत नाहीं, राज्यांतील अव्यवस्था दूर करीत नाही, त्याचें प्रभुत्व प्रत्यहीं घसरत जात असतें.

५५४ ज्या अविचारी राजाचे राज्यांत न्याय नाही, त्याचें राज्य लौकरच जाईल.

५५५ छळामुळें विव्हळणाऱ्यांचे अश्रु राजाचें राज्य फार धुऊन नेतील.

५५६ न्यायानें राज्य चालविलें तर कीर्ति पसरते; अन्यायानें चालविलें तर यश कलंकित होतें.

५५७ पाऊस पडला नाही, तर जशी जगाची दशा होईल, तशी दुष्ट राजाच्या प्रजेची होत असते.

५५८ जुलमी राजाचे राज्यांत गरिबांपेक्षां श्रीमंतांचीच स्थिति अधिक दुःखद असते.

५५९ सत्याच्या नि न्यायाच्या पथापासून विचलित होणाऱ्या राजाच्या राज्यांत पाऊस पडणार नाही.

५६० राजा न्यायानें राज्य न करील तर गाईचे स्तन आटतील, ब्राह्मण विद्या विसरतील.

## सर्ग ५७ : दुःखावह गोष्टींपासून दूर राहणें

५६१ गुन्हा कोणत्या स्वरूपाचा आहे हें नीट पाहूनच त्यानें पुन्हां गुन्हा करू नये म्हणून शिक्षा करावी. परंतु शिक्षा प्रमाणाबाहेर कधींहि नसावी.

५६२ आपली सत्ता अबाधित रहावी असें ज्यांना वाटतें त्यांनी जोरानें दंडा उचलावा; परंतु घाव हलके घालावा.

५६३ जो राजा प्रजेची पायमल्ली करतो, हातांत जणुं यमदंड घेऊन बसतो, जो प्रजेला मृत्यूप्रमाणे वाटतो, त्याला कोणीहि मित्र मिळणार नाही. त्याचा सत्यनाश होईल.

५६४ ज्या राजाचा दुष्टपणा उदाहरण म्हणून सांगितला जातो, त्याचे दिवस लवकरच भरतील, त्याला राज्य गमवावें लागेल.

५६५ अनुदार, प्रजेला कधी न भेटणारा, अशा राजाची संपत्ति पिशाच्चानें राखलेल्या संपत्तीप्रमाणें आहे.

५६६ ज्या राजाला क्षमा माहीत नाही, जो नेहमी मर्मच्छेदी बोलतो, त्याचें भाग्य कितीहि मोठें असलें तरी लौकरच संपुष्टांत येईल

५६७ कठोर शब्द नि निष्ठुर शिक्षा लोखंडावरील गजाप्रमाणें आहेत. त्या राजाचें राज्य त्या लोखंडाप्रमाणें गंजून नष्ट होईल.

५६८ मंत्र्यांचा सल्ला जो घेत नाही, आणि आपले बेत फसले म्हणजे मात्र रागानें लाल होतो, त्याचें वैभव लयाला जाईल.

५६९ वेळ आहे तोंच जो राजा डागडुजी करीत नाहीं, संरक्षण-साधनांकडे लक्ष देत नाही, तो युद्धाची वेळ येतांच आपण आतां पकडले जाऊं अशा भीतीनें लटलटूं लागतो नि तत्काळ नाशास जातो.

५७० ही धरणी कोणता भार सहन करूं शकत नसेल तर तो दुष्ट राजांच्या जुलमाचा होय.

## सर्ग ५८ : विवेक

५७१ विवेक-देवतेचें स्वरूप किती रमणीय आहे! हें जग कोणामुळें नीट चालत असेल तर तिच्यामुळें होय.

५७२ जीवनांतील समाधान नि शान्ति, जीवनांतील आनंद नि सौंदर्य विवेकामुळें असतात. ज्यांच्याजवळ विवेक नाही, धीर नाहीं, ते पृथ्वीला भार आहेत.

५७३ जें गीत रागदारीत बसवून गातां येत नाही, त्याचा काय उपयोग? ज्या डोळ्यांत प्रेमळपणा नाही त्यांचा काय उपयोग?

५७४ त्या त्या माणसाच्या योग्यतेनुरूप जे डोळे प्रसन्नता नि शांति दाखवीत नाहीत, ते तोंडावर असून काय उपयोग?

५७५ प्रसन्नता हा डोळ्यांचा अलंकार आहे. ज्या डोळ्यांत माधुर्य नाही, तो डोळा नसून खांच होय.

५७६ ज्याचे डोळे दुसऱ्यांची पर्वा करीत नाहीत, दुसऱ्यांविषयी सद्भाव दाखवीत नाहींत, तो मनुष्य जमिनीत उभ्या असलेल्या झाडाप्रमाणें होय.

५७७ जे दुसऱ्याविषयी तिळभरहि पर्वा दाखवीत नाहीत, ते खरोखर आंधळे आहेत; दुसऱ्यांच्या दोषांकडेहि जे प्रेमळपणें पाहतात तेच खरोखर डोळस होत.

५७८ आपल्या कर्तव्यापासून च्युत न होतां, दुसऱ्याविषयी जो सहानुभूति दाखवितो, तो या पृथ्वीचा स्वामी होईल.

५७९ अपराध्यावरहि प्रेम करणें, त्याला क्षमा करणें, यांतच मनाचा खरा मोटेपणा आहे.

५८० ज्यांना मूर्तिमंत क्षमा व्हायचें आहे, ते डोळ्यांसमोर विष मिसळून दिलें जात असताहि विश्वासानें तें पिऊन टाकतील.

## सर्ग ५९ : हेरखातें

५८१ राजनीति आणि हेर हे राजाचे दोन डोळे. त्यांच्या साहाय्यानें तो बघतो.

५८२ कोणाला कोणत्या वेळेस कोठें काय झालें ते वेळीच समजून घेणें राजाचें कर्तव्य आहे.

५८३ गुप्तचरांच्या साहाय्यानें आजूबाजूच्या सर्व घडामोडी इत्थंभूतपणें जो राजा समजून घेत नाहीं, त्याला विजयी होतां येणार नाही.

५८४ राज्यांतील सर्व अधिकाऱ्यांवर, एवढेंच नव्हे तर आप्तेष्टांवरहि, तसेंच शत्रूवर राजानें हेर ठेवावे.

५८५ ज्याच्या चर्येवरून कोणाला कधी संशय येणार नाही, जो कोणासमोर कधीहि गोंधळून जात नाही, जो आपल्या गुप्त गोष्टी कधीहि प्रकट होऊं देत नाहीं, असा मनुष्य गुप्त चर होण्याला लायक असतो.

५८६ हेरांनी साधुसंन्याश्यांचा वेष घेऊन हिंडावें. संपूर्णपणें शोध करावा. त्यांनी कांहीहि झालें तरी गुप्त गोष्ट फोडूं नये.

५८७ दुसऱ्यांचीं गुपितें काढण्यांत जो तरबेज आहे, जो घोटाळा न करतां बिन चूक माहिती आणतो, अशा मनुष्यास गुप्त कामावर नेमावें.

५८८ एका हेरानें आणलेली वार्ता दुसऱ्या हेरानें आणलेल्या वार्तेशी ताडून बघावी

५८९ एका हेराला त्याच कामी योजिलेल्या दुसऱ्या हेराची वार्ता असतां काम नये. जेव्हां तीन हेरांची बातमी जुळेल तेव्हां तिच्यावर विश्वास ठेवावा.

५९० गुप्त हेरांवरील अधिकाऱ्यांना उघडपणें बक्षिसें देऊं नयेत. कारण अशानें आपणच आपलें गुपित प्रकट करतों.

## सर्ग ६० : उत्साह

५९१ जे उत्साहमूर्ति असतात तेच खरोखर श्रीमंत होत; निरुत्साही माणसाल स्वत:सहि स्वत:चें असें म्हणतां येणार नाही.

५९२ उत्साह हीच माणसाची खरी संपत्ति; दुसरी संपत्ति क्षणिक आहे.

५९३ ज्याच्याजवळ अदम्य उत्साहाचें प्रभावी साधन आहे, तो "हाय हाय! सर्वस्वं बुडालों!" असें कधीहि म्हणणार नाही.

५९४ कितीहि श्रम पडले तरी जो कंटाळत नाहीं, त्याच्या घराचा शोध करीत लक्ष्मी आपण होऊन येते.

५९५ झाडाला येणाऱ्या सुंदर फुलांवरून त्याला किती पाणी घातलें याची कल्पन येते; तुमच्या श्रमांच्या प्रमाणांत तुम्हांला भाग्य मिळेल.

५९६ तुझे सर्व हेतु उदात्त असोत. कारण मग जरी अपयश आलें तरी तुझ्य नांवाला काळिमा लागणार नाही.

५९७ धैर्यशील लोक पराभूत झाले तरी हातपाय गाळीत नाहीत. गजराज बाणा विरुद्ध पाय अधिकच जोरानें रोंवतो.

५९८ रडक्या लोकांजवळ अनंत दातृत्वाची कीर्ति कधी येऊं शकत नाहीं.

५९९ मोठा आकार नि अणकुचीदार सुळे असूनहि उडी मारू पाहणाऱ्या व्याघ्रास पाहून हत्तीचें हृदय खचतें.

६०० अतूट उत्साह हेंच खरें बळ होय. ज्यांच्याजवळ ते नाही तो मानवदेहधारी निर्जीव खुंट होत.

## सर्ग ६१ : आलस्य

६०१ तुमचें कुल म्हणजे तुमचा चिरंतन प्रकाश, स्थिर नंदादीप; परंतु आलस्याच्या विषारी वाऱ्यानें हा दिवा मालवला जाईल.

६०२ ज्याला आपल्या कुळाची भक्कम पायावर उभारणी करायची असेल त्यानें आळसाला आळस म्हणून संबोधावें नि त्याला दूर ठेवावें.

६०३ आळस हा मारेकरी आहे; याला हृदयांत जागा द्याल तर तुमच्या कुळाचा तुमच्या डोळ्यांदेखत नाश होईल.

६०४ जे आळशी बनून, महत्त्वाची कामें अंगावर घेत नाहीत, त्यांच्या ठिकाणी दुर्गुणांची झपाट्यानें वाढ होईल आणि त्यांच्या घराण्याचा नाश होईल.

६०५ ज्याचा विनाशकाल जवळ आला आहे ते आळस, निद्रा, विसराळूपणा नि दिरंगाई या चार दुर्गुणांच्या आहारी जातात.

६०६ राजाची कृपादृष्टि असली तरीहि आळशी मनुष्य जगांत पुढें येणार नाही त्याची भरभराट होणार नाहीं.

६०७ जे आळशी आहेत, मोठमोठ्या कामांसाठी ज्यांचे हात उपयोगांत आणले जात नाहीत, त्यांना जगाची निंदा सहन करावी लागेल, उपहास सहन करावा लागेल.

६०८ ज्या घरांत आळस घर करतो, तें लौकरच शत्रूच्या कचाट्यांत जातें.

६०९ आळस सोडून द्या की तावडतोब तुमच्या कुटुंबावर कोसळूं पाहणारीं दुःखें दूर होतील.

६१० ज्या राजाला आळस काय तें माहीत नाही, तो वामनाच्या तीन पावलांत मावलेल्या त्रिभुवनाला स्वसत्तेखाली आणूं शकेल.

## सर्ग ६२ : पुरुषार्थशाली उद्योग

६११ अशक्य समजून कोणत्याहि कार्यापासून मागें नको वळूं. तुझे प्रयत्न कोणतीहि गोष्ट प्राप्त करून घ्यायला तुला समर्थ करतील.

६१२ कोणतेंहि काम अर्धवट नको ठेवूं. काम अर्धवट सोडणाऱ्यांची जग पर्वा करीत नाही.

६१३ कितीहि कष्ट पडले तरी जो खचत नाही, त्यालाच सर्वांची सेवा करण्याची शक्ति लाभण्याचें भाग्य असतें.

६१४ षंढाच्या हातांतील हत्याराप्रमाणें आळशी माणसाचें औदार्य होय. ते औदार्य टिकत नाही.

६१५ जो सुखासीन नसून यत्नदेव आहे, तो सामर्थ्यस्तंभ आहे; तो आपल्या मित्रांना आधार वाटतो; तो त्यांचे दुःखाश्रु पुसून टाकतो.

६१६ उद्योग म्हणजे भाग्यजननी; आलस्य म्हणजे दारिद्र्य आणि विनाश यांची जननी.

६१७ दुःखदेवतेचें घर आलस्यांत असतें. परंतु जो आलस्य-वश होत नाहीं, त्याच्या उद्योगांत लक्ष्मी येऊन नांदते.

६१८ जवळ संपत्ति नाहीं म्हणून लाजायचें कारण नाही; परंतु जाणूनबुजून श्रमांपासून पराङ्मुख होणें ही गोष्ट मात्र लाजिरवाणी आहे.

६१९ जरी देव आणि दानवहि तुझ्याविरुद्ध उभे राहिले तरी उद्योगदेवता तुझ्या श्रमाचें फळ तुला दिल्यावांचून राहणार नाही.

६२० दैवाला शरण न जातां जे अखंड यत्नशील असतात, ते दैवाला फजीत करतात.

## सर्ग ६३ : दुर्दैव आलें तरी धीर न सोडणें

६२१ दुर्दैव भेटायला आल्यास प्रसन्न मुखानें त्याचें स्वागत करा. दुर्दैव आलें असतां धीर द्यायला एकच वस्तु समर्थ आहे. ती म्हणजे हास्य.

६२२ अस्थिर मन संकटसमुद्राला तोंड देण्यासाठी स्थिर वृत्तीनें सिद्ध होतांच संकटें खालीं मान घालतात, ती लाजतात.

६२३ जे दुःखानें दुःखी होत नाहीत, ते दुःखाला दुःखी करतात.

६२४ प्रत्येक अडचणींतून मार्ग काढण्यासाठीं जे पराकाष्ठेचा प्रयत्न करतात, तेच खरे पुरुष होत.

६२५ अनंत अडचणी आ पसरून समोर असतांनाहि ज्याचा धीर खचत नाही, त्याच्या मार्गांत यायला अडचणींनाच अवघड वाटतें.

६२६ दैवाची कृपा असतांना जे फुशारून जात नाहींत, ते दुर्दैव आलें असतांना तरी कां म्हणून रडतील?

६२७ शरीर दुःखाचें माहेरघर आहे असें जाणून शहाणे लोक शरीरावर संकटें आलीं तरी रंजीस येत नाहीत.

६२८ जो मनुष्य सुखासक्त नाहीं, तो दुःखें हा मर्त्य जीवनाचा नियमच आहे असें समजून अडचणींनीं कष्टी होत नाहीं.

६२९ वैभवाचे काळीहि जो सुखांत रमत नाहीं, तो पडत्या काळांत दुःखानेंहि रडत नाहीं.

६३० कष्टांमुळें होणाऱ्या त्रासाला नि दगदगीला जो आनंदरूपच मानतो, त्याची शत्रुहि स्तुति करतात.

# ? : राज्यसंस्थेंतील घटक

## सर्ग ६४ : मंत्री

६३१ मोठमोठ्या गोष्टी कशा सिद्धीस न्याव्या, तदर्थ साधनें कोणती, मार्ग कोण आरंभ केव्हां करावा; हें सारें जो जाणतो, तो मंत्री नेमण्यास योग्य हो

६३२ ज्ञान, निश्चय, अदम्य श्रम, प्रजेच्या हिताकडे अखंड प्रेमळ दृष्टि, आ वरचें एक, अशीं मंत्र्याची पांच लक्षणें होत.

६३३ जो विभक्तांना एकत्र आणूं शकतो, एकत्र असलेल्यांत फूट पाडूं शकत अस्तित्वांत असलेले स्नेहसंबंध सांभाळूं शकतो, तो खरा समर्थ मंत्री होय.

६३४ कोणते बेत करावे हें जो ठरवतो, ते बेत कसे पार पाडावे हें जो जाणत ज्याचें मत नेहमीं निश्चित नि निर्णायक असतें, तो योग्य मंत्री असें समजा

६३५ जो विधिज्ञ आहे, धर्मज्ञ आहे, जो पुष्कळ अध्ययन केलेला आहे, विचारपूर्वक बोलतो, प्रसंगोचित जाणतो, तो योग्य मंत्री होय.

६३६ उपजत बुद्धिमान् असून अध्ययनानें ज्यांनी भरपूर ज्ञान मिळविलें आ त्यांना जगांत दुर्बोध असें काय आहे, सूक्ष्म असें काय आहे ?

६३७ तूं पुस्तकी पंडित असलास तरी अनुभवानें येणारें शहाणपण मिळव तदनुसार वाग.

६३८ राजा मूर्ख असला, पदोपदी मंत्र्याच्या कामांत अडथळे आणीत असत तरीहि मंत्र्यानें त्याला योग्य नि रास्त तेंच नेहमीं सांगत रहावें.

६३९ जो मंत्री गुप्त कारस्थानें करून राजाचाच नाश करूं बघतो, तो सात को शत्रूंपेक्षांहि भयंकर होय.

६४० जे दृढमति नसतात, ते मोठमोठ्या योजना आंखतात; परंतु प्रत्यक्ष कृतीच्या वेळेस कचरतात, त्यांचे हेतु कधीहि तडीस जाणार नाहीत.

## सर्ग ६५ : वक्तृत्व

६४१ वक्तृत्वाची देणगी खरोखर इतर सर्व देणग्यापेक्षां अपूर्व अशी आहे.

६४२ भाग्य वा दुर्भाग्य जिभेवर अवलंबून आहे. बोलण्यांत उद्धटपणा येऊं नये म्हणून जप.

६४३ ज्या वक्तृत्वानें मित्र अधिकच जवळ येतात, आणि शत्रूहि विरघळतात, तेंच खरें वक्तृत्व.

६४४ प्रत्येक प्रसंग नीट तोलून बघ नि प्रसंगोचित बोल. याहून हितकर नि पुण्यप्रद दुसरें कांहीं नाहीं.

६४५ अशी वाणी बोल की दुसऱ्यांच्या शब्दांनीं जी निरुत्तर होणार नाहीं.

६४६ श्रोत्यांना आपलेसें करून घेणें, दुसऱ्यांच्या भाषणांतीलहि मथितार्थ आपल्या भाषणांत आणणें, हें कसलेल्या मुत्सद्याचें काम आहे.

६४७ जो गोंधळत नाही, भीत नाही; जो अस्खलित बोलतो; त्याचा वादविवादांत कोण पराजय करील ?

६४८ ज्याचें भाषण मुद्देसूद नि व्यवस्थित असतें, मनें वळवणाऱ्या शब्दांत असतें; त्याच्या पाठीशी सारें जग उभें राहील.

६४९ मोजक्या निवडक शब्दांत ज्यांना आपले विचार मांडतां येत नाहीत, तेच भाराभर बोलण्यासाठी हपापलेले असतात.

६५० स्वतः मिळविलेलें ज्ञान जे दुसऱ्यास नीट देऊं शकत नाहीत, ते फुलूनहि सुवास न देणाऱ्या फुलांप्रमाणें समजावे.

## सर्ग ६६ : कर्माचें पावित्र्य

६५१ दुसऱ्याशी मैत्री जोडल्यानें यश येतें; परंतु आपली कृति शुद्ध असेल तर सर्व मनोरथ पूर्ण होतील.

६५२ ज्या कर्मापासून शाश्वत सुख नि कीर्ति लाभणार नाहींत, त्यांच्यापासून पराङ्मुख हो.

६५३ या जगांत परमोच्च पदी शोभावें असें ज्यांना वाटतें, त्यांनीं कलंक लावणाऱ्या सर्व कर्मापासून दूर रहावें.

६५४ वस्तूंचें यथार्थ स्वरूप जाणणारे, वाईट दिवस आले तरीहि वाईट कृत्यें करायला प्रवृत्त होणार नाहीत.

६५५ " अरेरे ! काय मी केलें ? " असें पाठीमागून ज्या कृत्यांमुळें रडत म्हणावें लागेल, त्यांपासून आधीच दूर रहावें; असें कृत्य एकदां हातून झालें असलें तरी फिरून करू नये.

६५६ सूज्ञ लोक ज्या कृत्यांस निंद्य नि त्याज्य समजतात, तीं कधी करूं नये; भुकेनें तळमळणारे आईचे प्राण वांचवावयाचे असले तरीहि तीं कर्मे करूं नयेत.

६५७ अन्याय्य मार्गानें मिळवलेल्या संपत्तीपेक्षां थोरांचें दारिद्र्यहि श्रेयस्कर होय.

६५८ श्रेष्ठ नीतिधर्म ज्या गोष्टी करूं नये म्हणून सांगतो, त्या करून जरी तुम्ही यशस्वी झालांत तरी शेवटीं तुम्हांस पस्तावावें लागेल.

६५९ दुसऱ्यांना छळून, पिळून, रडवून जें मिळवाल, तें तुमच्या हातांतूनहि जाईल आणि जातांना तुम्हांलाही ढळढळां रडवील; परंतु खऱ्या धर्मानें जोडलेलें जरी मध्येंच गेलें तरी पुन्हां येईल आणि वाढेल.

६६० कपटानें संपत्ति मिळवूं बघणें म्हणजे कच्च्या मडक्यांत पाणी ठेवण्याप्रमाणें आहे.

## सर्ग ६७ : निश्चयी संकलपशाक्ति

६६१ कर्तृत्वाचा मोठेपणा हा वास्तविक दृढ इच्छाशक्तीचा मोठेपणा असतो. तिच्यामुळें कर्तृत्व शक्य होतें. इतर गोष्टी शेवटपर्यंत टिकत नसतात.

६६२ जें सिद्धीस जाणारच नाहीं असें नक्की वाटतें त्याचा आरंभ न करणें, आणि ज्याचा आरंभ केला तें कितीहि अडचणी आल्या तरी न सोडणें — ही शहाण्या लोकांच्या वागणुकींची दोन तत्त्वें आहेत.

६६३ कार्यसिद्धीनंतरच कार्यकर्ता आपलें मन बोलून दाखवितो; आपण आधीच आपले बेत जाहीर केले तर अपरिहार्य अडचणी मार्गांत येण्याचा संभव असतो.

६६४ बोलणें सोपें असतें; बोलल्याप्रमाणें तडीस नेणें महाकर्म कठीण.

६६५ मोठमोठीं कामें करून दाखवल्याबद्दल ज्याची प्रसिद्धि आहे, अशा मनुष्याची राजाला फार जरूर असते. तो राजाच्या उपयोगी पडेल नि सारे त्याची वाहवा करतील.

६६६ इच्छेनुसार तुम्हांला सारें कांही मिळेल; परंतु सारी इच्छाशक्ति तेथें हवी, सारी निश्चयी संकलपशक्ति तेथें हवी.

६६७ केवळ तोंडाकडे बघून मनुष्याला तुच्छ मानूं नको. धडधड जाणारा प्रचंड रथ लहानशा आंसावर अवलंबून असतो.

६६८ संपूर्ण विचारानें एखादी गोष्ट करण्याचें तूं निश्चित केलें असशील, तर चलबिचल होऊं न देतां उत्साहपूर्वक त्या गोष्टीच्या मागें लाग.

६६९ ज्यांमुळें सुखाची वृद्धि होईल तीं कर्मे कर, तीं सिद्धीस नेण्यासाठीं मन वज्राप्रमाणें कठोर नि खंबीर करून प्रयत्न कर; मरणान्तिक दुःखें सहन करावीं लागलीं तरी हटूं नको.

६७० ज्यांचा निश्चय दृढ नाहीं, त्यांनीं आपल्या मार्गात कितीहि मोठेपणा मिळविला, तरी जग त्यांना किंमत देत नाहीं.

## सर्ग ६८ : कामें नीट करणें

६७१ साऱ्या चर्चांचा हेतु कांही तरी निश्चित करणें हा असतो. निश्चित ठरल्यावर कामाला विलंब लावणें चूक आहे.

६७२ ज्या गोष्टी हळुहळुच करायच्या असतात, त्या सावकाश विचारानें कर; परंतु ज्या झटपट उरकायला हव्यात, त्या क्षणभरहि दूर ढकलूं नको.

६७३ जेव्हां जेव्हां परिस्थिति अवसर देईल, तेव्हां तेव्हां आपल्या ध्येयाकडे सरळ जात जा; जेव्हां परिस्थिति प्रतिकूल असेल, तेव्हां ज्या मार्गांत फार विरोध नाहीं, त्याचें अनुसरण कर.

६७४ अपुरें कार्य नि अशान्त शत्रू न विझलेल्या विस्तवाप्रमाणें आहेत; वेळ येतांच वाढून निष्काळजी मनुष्याचा ती निःपात करितील.

६७५ कोणतेंहि कार्य करतांना पांच गोष्टी लक्षांत ठेवायला हव्यात : कार्याचें स्वरूप, योग्य वेळ, योग्य स्थळ, कसें करायचें, कशानें करायचें ( साधनें ).

६७६ कोणतेंहि कार्य सुरू करण्यापूर्वी त्याला श्रम किती पडतील, मार्गांतील अडचणी आणि अपेक्षित फायदा या गोष्टी लक्षांत घ्याव्यात.

६७७ आपणांला जी गोष्टी साध्य करून घ्यावयाची आहे, तिच्यांत जो तज्ज्ञ आहे, त्याच्या पोटांत शिरून त्या गोष्टीचें वर्म समजून घ्यावें.

६७८ एका हत्तीकडून दुसऱ्या हत्तीस फशीं पडतात. त्याप्रमाणें एक कार्य दुसऱ्या कार्याचें साधन कर.

६७९ मित्रांना बक्षिसें देण्याआधीं शत्रूंना शान्त करण्याची नि त्यांना मित्र बनवण्याची त्वरा कर.

६८० जीविताची रोज उठून धागधुग वाटूं नये म्हणून दुर्बलांनी संधी येतांच प्रबळाशीं दोस्ती जोडायला नेहमी तयार असावें; निर्धास्त वाटावें म्हणून सतत प्रयत्न करावे.

## सर्ग ६९ : दूत ( वकील )

६८१ प्रेमळ स्वभाव, श्रेष्ठ कुळांत जन्म, राजाला आकर्षील अशी चालचलणूक हे दूताचे गुण होत.

६८२ राजनिष्ठा, प्रखर बुद्धि, बोलण्यांतील चातुर्य, त्वरित ग्रहणशक्ति हे गुण दूतास अत्यन्त आवश्यक होत.

६८३ आपल्या राजाचा फायदा व्हावा अशा रीतीनें जो दुसऱ्या राजांजवळ बोलूं शकतो, तो बुद्धिमतां वरिष्ठ समजावा.

६८४ व्यवहारकुशल, विद्याव्यासंगी आणि दिसायला रुबाबदार अशा माणसास शिष्टाईसाठी पाठवावें.

६८५ अप्रिय बोलणें शक्य तों टाळून, मोजक्या गोड शब्दांनी दूतानें आपल्या स्वामीचें हित साधावें.

६८६ विद्यावान्, उत्साही, प्रसंगोचित जाणणारा, मन जिंकून घेणारें सुंदर बोलणें ज्याला साधतें, अशा माणसाला परराष्ट्रांकडे दूत म्हणून पाठवावें.

६८७ जो काळ वेळ ओळखतो, जो स्वकर्तव्य जाणतो, शब्द उच्चारण्यापूर्वी जो मनांत ते बोलून पाहतो, तो उत्कृष्ट दूत होय.

६८८ शिष्टाईसाठीं पाठवलेला दूत निश्चयी वृत्तीचा, शुद्ध हृदयाचा नि सुंदर चालचलणुकीचा असावा.

६८९ ज्याच्या बोलण्यांत दुर्बलत्व नाही; न शोभणारें असें कांहीं नाही; जो निश्चयाचा खंबीर आहे; असा मनुष्यच दुसऱ्या राजांच्या दरबारांत आपल्या राजाचा संदेश घेऊन जायला योग्य होय.

६९० मरणाची भीति दाखवली तरीहि जो खरा राजदूत आहे तो कर्तव्यांत कसूर करणार नाही; आपल्या स्वामीचें हित प्रयत्नपूर्वक तो साधील.

## सर्ग ७० : राजासमोर कसें वागावें

६९१ राजाजवळ वागतांना, ऊब येण्यासाठी विस्तवापासून फार दूर नाहीं, परंतु फार जवळहि नाही असें आपण बसतों, तसें असावें.

६९२ ज्या गोष्टीची राजाला इच्छा असते, तिच्याविषयी आपण हपापलेले नसणें, हा त्याची मर्जी संपादण्याचा निश्चित उपाय आहे. त्यामुळें धनलाभहि होईल.

६९३ आपली नाचक्की होऊं नये असें वाटत असेल तर अपयशी न होण्याची दक्षता बाळग. तूं कोणतेंहि काम नीट पार पाडूं शकत नाहींस, असा एकदां बभ्रा झाला म्हणजे तो कधींहि दूर करतां येणार नाही.

६९४ थोरांमोठ्यांच्या देखत कानांत कुजबुजूं नये; किंवा ते जवळ असतां दुसऱ्यांकडे पाहून हंसूंहि नये.

६९५ कोणाचें बोलणें चोरून ऐकूं नकोस; जें तुझ्यापासून मुद्दाम गुप्त राखण्यांत आलेलें आहे, तें माहीत करून घेण्याच्या भानगडींत पडूं नकोस. ज्या वेळेस एखादी गोष्ट तुला सांगितली जाईल त्या वेळेसच तूं ती ऐक.

६९६ राजाची लहर लक्षांत घ्यावी; काळवेळ ओळखून राजाला ज्यायोगें संतोष होईल असें आकर्षक बोलणें करावें.

६९७ प्रिय असणाऱ्या गोष्टीच राजासमोर बोलाव्या. त्यानें सांग म्हणून आज्ञापिलें तरीहि अप्रिय नि अहितकर गोष्टी त्याला सांगूं नये.

६९८ राजा अल्पवयी असो वा आप्तसंबंधी असो; त्याच्याजवळ थट्टामस्करी करूं नये. त्याच्या प्रतिष्ठेस साजेसेंच वर्तन त्याच्याजवळ करावें.

६९९ ज्यांची दृष्टि गोंधळलेली नसून निर्मळ नि स्वच्छ आहे, ते आपण राजाचे आवडते आहोंत म्हणून अनुचित वर्तन कधींहि करणार नाहींत.

७०० आपण राजाच्या फार विश्वासांतील आहोंत असें समजून जे अयोग्य वर्तन करतात, त्यांचा नाश होईल.

## सर्ग ७१ : तोंडावरून परीक्षा

७०१ दुसऱ्याचें तोंड उघडण्यापूर्वींच त्याच्या मनांतील जो जाणतो, तो या जगाचें भूषण होय.

७०२ दुसऱ्याच्या मनांतील जो खात्रीपूर्वक ओळखतो तो जणूं देवच आहे असें समज.

७०३ दुसऱ्यांच्या तोंडावरूनच त्यांच्या मनांतील जे ओळखतात अशांना कांहींहि करून तूं आपल्या सल्लागारमंडळांत घे.

७०४ न बोलतां जे ओळखतात, अशांची चर्या इतरांप्रमाणेंच दिसली तरी अशांना एक विशिष्ट वर्गच असतो.

७०५ हृदयांत काय चाललें आहे तें एका दृष्टिक्षेपानेंच जर डोळ्याला ओळखतां आलें नाही तर ज्ञानेंद्रियांतील वैशिष्ट्य कोठें उरलें ?

७०६ जवळच्या वस्तूचा रंग स्फटिक धारण करतो, त्याप्रमाणें मनाचा रंग मुद्रा धारण करीत असते.

७०७ मुद्रेहून सूक्ष्म नि संवेदनाक्षम असें दुसरें जगांत काय आहे ? हृदयांतील सुखदुःख प्रथम चर्याच दर्शविते.

७०८ बोलल्याशिवाय तुझ्या अंतःकरणांतील गोष्टी जो जाणूं शकतो, तो जर तुझा झाला तर त्याच्याकडे पाहूनच तुझे हेतू पूर्ण होत जातील.

७०९ डोळ्यांच्या लहरी जो जाणतो तो केवळ त्यांच्याकडे पाहूनच हृदयांत प्रेम आहे की वैर आहे तें सांगेल.

७१० स्वतःला पाताळयंत्री समजतात त्यांच्यामध्यें विशेष कांहीं असेल तर त्यांचा डोळा.

## सर्ग ७२ : श्रोत्यांची वृत्ति ओळखणें

७११ बांधवहो, तुम्ही वक्तृत्वाचा अभ्यास केलेला आहे; सद्‌भिरुचि काय तेंहि तुम्ही जाणतां; श्रोतृवृंदाचें स्वरूप नीट ओळखा, त्यांना रुचेल नि पचेल असें भाषण करा.

७१२ वक्तृत्वकलाभिज्ञांनों, प्रथम श्रोत्यांची लहर नि मनोवृत्ति नीट ओळखून मगच काळजीपूर्वक विचार करून तुम्ही भाषण करीत जा.

७१३ सभेचा रागरंग न बघतां जो एकदम बोलूं लागतो, त्याला वक्तृत्वकला कळत नाही; एवढेंच नव्हे तर त्याला कांहींहि कळत नाहीं.

७१४ शहाण्यांच्या नि पंडितांच्या सभेंत शहाणपणाच्या नि पांडित्याच्या गोष्टी कराव्या; परंतु मूर्खांच्या सभेंत साधेपणाचा शुभ्र वेष धारण करावा.

७१५ वृद्धांच्या परिषदेंत पुढाकार घ्यावयाचा नाही, असें मनांत ठरवायला फारच संयम लागतो. हा गुण इतर सद्गुणांपेक्षां शतपटीनें शोभतो.

७१६ सुज्ञांसमोर जो अपशब्द बोलतो तो स्वतःचें नुकसान करतो. आपण धर्ममार्गापासून च्युत झालों असें मनांत येऊन नंतर त्याला पस्तावावें लागेल.

७१७ गुणी विचक्षणांच्या सभेंत विद्वानाची विद्या खुलून दिसते.

७१८ सुज्ञ व जाणत्या लोकांना उत्तम सल्ला देणें म्हणजे जिवंत वृक्षाच्या मुळांना पाणी घालण्याप्रमाणें आहे.

७१९ प्रतिष्ठित व सुज्ञ लोकांनी आपलें भाषण मोठ्या आवडीनें ऐकावें असें ज्यांना वाटत असेल, त्यांनीं चुकूनहि मूर्खांच्या सभेंत भाषण करूं नये.

७२० जे लोक तुमचें उणें पाहण्यासाठीं अधीर आहेत, अशांच्या समोर व्याख्यान देणें म्हणजे गटारावर अमृतवर्षाव करण्याप्रमाणें आहे.

## सर्ग ७३ : सभेंतील आत्मविश्वास

७२१ जे वक्तृत्वकलाभिज्ञ आहेत, जे रस जाणतात, सद्‌भिरुचि ओळखतात, ते आपलें म्हणणें व्यवस्थित रीतीनें कसें मांडावें तें जाणतात. सुज्ञांच्या सभेंत त्यांची कधी फजिती व्हायची नाही.

७२२ विद्वानांच्या सभेंतहि जो आपली निश्चित मतें निर्भयपणें मांडतो, त्यांचें समर्थन करूं शकतो, तो विद्वानांचा मुकुटमणि होय.

७२३ समरांगणांत मृत्यूलाहि आह्वान देणारे अनेक आढळतात; परंतु न गांगरतां सभेला तोंड देणारा दुर्मिळ.

७२४ ज्यांत तूं तज्ज्ञ आहेस, जें तूं आपलेंसें केलें आहेस, ते ठामपणें विद्वानांसमोर मांड; परंतु ज्याचें तुला ज्ञान नाही, ज्यांत तूं पारंगत नाहीस, तें सारें त्यांच्यापासून शीक.

७२५ सभेंत निर्भयपणें बोलतां यावें म्हणून तर्कशास्त्र नि न्यायशास्त्र यांचा अभ्यास कर.

७२६ ज्या तरवारींत पाणी नाहीं, ती काय चाटायची आहे ? पंडितांच्या सभेंत घाबरणाऱ्याला ग्रंथांचा काय फायदा ?

७२७ षंढाच्या हातांतील तरवारीप्रमाणें पंडितसभेंत घाबरणाऱ्यांचें ज्ञान होय.

७२८ विद्वानांच्या सभेंत आपलें म्हणणें जर त्यांच्या गळीं उतरवतां आलें नाही तर आपलें ज्ञान फोल होय.

७२९ विद्वानांच्या सभेंत गलितधैर्य होणाऱ्यांची विद्या केवढीहि असली तरी अडाण्यापेक्षांहि त्यांची योग्यता कमी लेखिली जाईल.

७३० सभेंत गांगरणारे आणि स्वतःचे विचार ज्यांना नीट विवरून सांगतां येत नाहीत, ते जिवंत असले तरी मृतवत्‌च होत.

## सर्ग ७४ : देश

७३१ जेथें नेहमीं भरपूर पीक येते, जेथें ऋषिमुनींचें माहेर आहे, भाग्यवान आणि संपन्न लोक जेथें नांदतात, तो देश थोर होय.

७३२ आपल्या सकलैकधर्मामुळें जो देश जनतेचें प्रेम ओढून घेतो, दुष्काळ नि दुर्भिक्ष यांपासून जो देश मुक्त असतो, तो देश थोर होय.

७३३ कितीहि ओझें पडलें तरी जो देश सारें सहन करतो, आणि कर वगैरे व्यवस्थित देतो, तो देश थोर होय.

७३४ जेथें दुष्काळ नाहीं, रोगराई नाहीं, शत्रूंचे हल्ले जेथें होत नाहींत, तो देश थोर होय.

७३५ ज्या देशांत आपसांत झगडणारे पंथ नि जाति नाहीत, जेथें खुनी अराजक नाहीं, जेथें देशाचा नाश करणारे देशद्रोही नाहीत, तो देश थोर होय.

७३६ शत्रूमुळें ज्या देशाची धूळदाण होत नाहीं, आणि परचक्र आलें तरीहि ज्याच्या उत्पन्नांत कांहीं कमी होत नाही, तो देश सर्वश्रेष्ठ होय.

७३७ नद्या, झरे, वेळेवर पाऊस, योग्य ठिकाणी डोंगरपर्वत, मजबूत तटबंदी, या गोष्टींची प्रत्येक देशास अत्यन्त जरूरी असते.

७३८ संपत्ति, भरपूर पीक, सुखी प्रजा, रोगमुक्तता, परचक्रापासून सुरक्षितता, राज्याची, कोणत्याहि देशाची हीं पांच भूषणें होत.

७३९ लोकांच्या श्रमाशिवायहि जो देश विपुल देतो, तोच खरोखर देश; श्रम केल्यावरच जो देतो, त्याला देश म्हणणें योग्य नाही.

७४० देशाला वरील सर्व गोष्टी अनुकूल असूनहि जर राजसुख नसेल तर सारें व्यर्थ.

## सर्ग ७५ : दुर्ग, किल्लेकोट.

७४१ संरक्षणाच्या चिन्तेंत असणाऱ्या दुर्बळ राजांना दुर्ग साहाय्य देतातच; परंतु प्रबळांनाहि त्यांच्यापासून मदत होते.

७४२ नद्या, समुद्र, वाळवंटें, पर्वत, घनदाट जंगलें, ही निरनिराळ्या तऱ्हेचीं संरक्षक साधनेंच आहेत.

७४३ किल्ल्यांच्या बाबतीत उंची, जाडी, भक्कमपणा आणि अभेद्यपणा या चार गोष्टी लक्षांत घेतल्या जातात असें शास्त्र सांगतें.

७४४ ज्याला फार थोड्या जागीं धोका आहे, जो विस्तीर्ण आहे, पाडाव करूं पाहणाऱ्यांना जो पुरून उरतो, तो खरोखर अजिंक्य दुर्ग होय.

७४५ अभेद्यता, आंतील सैन्याला स्वसंरक्षणाची शक्यता, आंत भरपूर धान्य-सामुग्री व इतर सामान असणें, या गोष्टी किल्ल्याला आवश्यक आहेत.

७४६ ज्यांत सर्व प्रकारची सामुग्री आहे, ज्याच्या रक्षणासाठी राजनिष्ठ लोक सिद्ध आहेत, जो चांगल्या तऱ्हेनें तोंड देईल तोच खरोखर किल्ला होय.

७४७ वेढा घालून, हल्ला करून किंवा दगलबाजी करून जो घेणें शक्य नाही, तोच खरोखर अजिंक्य किल्ला.

७४८ शत्रू शर्थ करीत असतांहि आंतील सैन्य ज्यामुळें शत्रूला पराभूत करतें तो खरा किल्ला होय.

७४९ विविध तटबंदी नि माऱ्याच्या जागा, यांमुळें जो दुर्ग अभेद्य केला गेला आहे, शत्रू दूर आहे तोंच त्याची धुळधाण उडवायला जो स्वतःच्या सैनिकांना समर्थ करतो, त्यालाच किल्ला म्हणावें.

७५० किल्ला कितीहि अभेद्य नि बळकट असला, तरी तेथील सैन्य जर दमदार नि शर्थीनें लढणारें नसेल तर काय उपयोग ?

UNIVERSITY LIBRARY HYDERABAD-7

## सर्ग ७६ : द्रव्य मिळविणें

७५१ महत्त्व नसणाऱ्यांना महत्त्व प्राप्त करून देणारें द्रव्यासारखें दुसरें कोणतें साधन आहे ?

७५२ दरिद्री माणसाचा सर्वत्र अपमान होतो; धनवानाला सर्वच या बसा म्हणतात.

७५३ द्रव्य म्हणजे अचंचल दीप-ज्योति; ज्याच्याजवळ हें निष्कंप द्रव्यतेज आहे, त्याला कोठेंच अंधार नाही.

७५४ उत्तम व्यवहारानें जोडलेल्या धनानें पुण्य नि सुख प्राप्त होतात.

७५५ ज्या द्रव्यार्जनांत दया नि उपकार यांना थारा नाहीं, तें द्रव्यार्जन नको.

७५६ जप्त केलेल्या मालमत्ता, बेवारशी मिळकती, जकाती, लढाईतील लूट, या सर्वांमुळें राजाचा खजिना समृद्ध होत असतो.

७५७ प्रेमामुळें दया नि सहानुभूति जन्मतात; परंतु त्यांचें संवर्धन व्हायला लक्ष्मी ही धात्री हवी असते.

७५८ श्रीमंतानें एखादें काम अंगावर घेणें म्हणजे टेंकडीवरून हत्तींची झुंज पाहण्याप्रमाणें आहे. ( म्हणजे त्या मनुष्याला भीति नि चिंता नसते. )

७५९ द्रव्य भरपूर मिळवावें. शत्रूचा अभिमान धुळींत मिळवायला यासारखें तीक्ष्ण शस्त्र नाही.

७६० न्याय्य रीतीनें धनार्जन करणाऱ्याला धर्म आणि काम हे पुरुषार्थहि सहज प्राप्त होतील.

## सर्ग ७७ : सैन्य

७६१ राजाच्या मालकीच्या गोष्टीपैकी मुख्य गोष्ट म्हणजे शिस्तींत वाढलेलें सुसज्ज सैन्य होय.

७६२ बिकट परिस्थितींत भयंकर हल्ले होत असतांहि जे खरे वीर असतात ते मारूं किंवा मरूं या निश्चयानें उभे असतात.

७६३ उंदरांची प्रचंड सेना समुद्राप्रमाणें गदारोळ करीत आली तरी भुजंगाचा एक फूत्कार ऐकतांच त्यांची गर्जना बंद पडेल.

७६४ ती खरी सेना, जिला पराजय माहीत नाही, फितुरी ठाऊक नाहीं, आणि पराक्रम जिची परंपरा आहे.

७६५ खवळलेला काळ प्रत्यक्ष समोर युद्धास आला असतांहि जें सैन्य शौर्यानें तोंड देतें, तें खरें सैन्य.

७६६ पराक्रम, स्वाभिमान, गोंधळांतहि झटपट निर्णय घेणें आणि परंपरागत शौर्य-धैर्याची प्रभा, या चार गोष्टी म्हणजे सैन्याचें चिलखत होय.

७६७ खरें लढाऊ सैन्य शत्रूसाठीं टपलेलें असतें, शत्रू केव्हांहि आला तरी त्याला तेव्हांच मातीत मिळवूं असा त्याला आत्मविश्वास असतो.

७६८ सैन्य जरी दमदार, काटक नि सहनशील असलें, तरी दारुगोळा नि इतर लष्करी साधनांच्या योगेंच विजय प्राप्त होत असतो.

७६९ जें संख्येनें कमी नाही, वेळेवर पगार मिळत असल्यामुळें जें उपाशी नाही, जें द्वेषमत्सरद्रोहानें ग्रस्त नाही, तें सैन्य नेहमी विजयीच होणार.

७७० सैनिक भरपूर आहेत; परंतु सेनानीची वाण असेल तर सैन्य कसें उभें करतां येईल ?

## सर्ग ७८ : : आत्मनिरपेक्ष योद्धा

७७१ हे शत्रूंनो, रणांगणांत माझ्या स्वामीसमोर उभे राहूं नका. ज्यांनी ज्यांनीं आजपर्यंत त्याला आह्वान केलें, त्यांच्या शवांवर कबरी उभ्या राहिल्या.

७७२ नेम धरून सशाला बाणानें ठार मारण्यापेक्षां हत्तीवर भाला फेंकून त्याला तो न लागला तरी त्यांत अधिक शौर्य आहे.

७७३ निःशंकपणें शत्रूवर तुटून पडण्याला पराक्रम म्हणतात; परंतु पराभूताला उदारपणें क्षमणें नि वांचवणें यांत मनाचा मोठेपणा आहे. त्यानें पराक्रमाला शोभा चढते.

७७४ त्या वीरानें स्वतःचा भाला शत्रूच्या हत्तीवर फेंकला; तो दुसरा भाला बघत होता, इतक्यांत स्वतःच्या शरीरांतच रुतलेला भाला त्याला दिसला. परमानंदानें तोच उपटून त्यानें हातांत घेतला.

७७५ आपल्यावर भाला फेंकला जात असतां डोळा लवणें हें वीराला लाजिरवाणें नाहीं का ?

७७६ रक्तस्रावी जखमा ज्या दिवशी वीराला स्वतःच्या शरीरावर दिसत नाहींत, तो दिवस त्याला व्यर्थ गेल्याप्रमाणें वाटतो.

७७७ त्रिभुवनव्यापी कीर्ति मिळावी म्हणून जे उत्सुक असतात, प्राणांची ज्यांना पर्वा नसते, त्यांच्या डाव्या पायांतील तो तोडर पाहणें किती धन्यतेचें असतें !

७७८ योद्धे युद्धांत प्राणांची पर्वा करीत नाहींत; प्राण धोक्यांत घालूं नका असें सेनानीनें सांगितलें तरीहि ते निःशंकपणें शत्रूवर तुटून पडतात.

७७९ स्वीकृत कामी यश यावें म्हणून जे प्राणपर प्रयत्न करतात, त्यांना कोण बरें नांवें ठेवील ?

७८० ज्याला आपल्या मरणानें सेनानीच्या डोळ्यांतून अश्रू आणतां येतील, असें मरण यावें म्हणून भिक्षा मागितली तरी काय हरकत ?

## सर्ग ७९ : मैत्री

७८१ मैत्रीहून दुर्मिळ जगांत काय आहे ? शत्रूच्या सर्व दुष्ट कारस्थानांपासून बचाव करणारें मैत्रीहून अधिक बळकट असें चिलखत कोठें मिळणार ?

७८२ थोरांची मैत्री शुक्लेन्दुवत् वर्धमान असते; मूर्खांची कृष्णपक्षांतील चंद्राप्रमाणें असते.

७८३ थोरांची मैत्री थोर ग्रंथांच्या अध्ययनाप्रमाणें आहे; जितकें अधिक अंतरंगांत शिरावें, तितकी अधिकच शोभा नि गोडी.

७८४ मैत्री म्हणजे गप्पा नव्हे, केवळ हास्यविनोद नव्हे; तर आपण चुकीच्या मार्गानें जात असतां ती कानउघाडणीहि करते व सांवरते.

७८५ नेहमी भेटणें व एकमेकांच्या जवळ बसणें या वरपांगी गोष्टी; मैत्रीचें बंधन हृदयैक्यामुळें दृढ होत असतें.

७८६ तोंड देखल्या स्मित करणें म्हणजे मैत्री नव्हे; हृदयाला हंसवणारी प्रीति जेथें असते तेथें मैत्री असते.

७८७ पापापासून परावृत्त करणारा, सन्मार्गाकडे वळवणारा, विपत्तीत बाजू घेणारा, तो खरा मित्र.

७८८ वाऱ्यानें कमरेचें वस्त्र उडवलें जात असतां तें सांवरण्यासाठी हात ज्याप्रमाणें झटकन् धांवतो, त्याप्रमाणें उघड्या पडलेल्या मित्राच्या साहाय्यास धांवतो, तोच खरा मित्र.

७८९ मैत्रीचें खरें माहेर कोठें ? जेथें दोन मनें परस्परांची उन्नति व्हावी म्हणून शक्य त्या सर्व गोष्टीत सहकार्य करतात तेथें.

७९० तो मजवर इतकें प्रेम करतो, मी त्याच्यावर इतकें प्रेम करतों, असें किती जरी म्हटलेंत तरी जी मैत्री मोजली जाते, तिच्यांत कांहीं तरी कमी आहे.

## सर्ग ८० : मैत्रीसाठीं योग्यायोग्य परीक्षा

७९१ प्रथम पारख केल्याशिवाय मैत्री करणें याच्यासारखा धोका नाहीं. कारण एकदां मैत्री जडली म्हणजे ज्याला म्हणून हृदय आहे, तो ती सोडणार नाहीं.

७९२ प्रथम परीक्षा केल्याशिवाय जो मित्र जोडतो तो स्वत:वर संकट ओढून घेतो. अशा गोष्टीचा परिणाम अखेर प्राणनाशांत होतो.

७९३ ज्याच्याशीं मैत्री करायची असेल, त्याचें कुटुंब, त्याचे गुणावगुण, त्याचे आप्तेष्टमित्र, या सर्वांची नीट चौकशी करून मगच मैत्री जोडावी.

७९४ जो सत्कुलज आहे, जो निंदा, अपकीर्ति यांना भितो, अशाची मैत्री वाटेल ती किंमत देऊन जोडावी.

७९५ ज्यांना सन्मार्ग माहीत आहे, तूं वाईट मार्गानें जातांच जे तुझी नीट कान-उघाडणी करू शकतील, अशांना मित्र कर.

७९६ विपत्तीतहि एक गुण आहे; मित्रांची प्रीति मोजण्याचें विपत्ति हें एक माप आहे.

७९७ मूर्खाच्या मैत्रीपासून मुक्तता हा सर्वांत मोठा फायदा आहे.

७९८ ज्या गोष्टींत अपयश आल्यानें तुला फार वाईट वाटेल, त्यांना आरंभूच नको; विपत्तींत जे तुला टाकून जातील अशांची मैत्री नको.

७९९ आपत्कालीं दगा देणाऱ्याच्या मैत्रीचा विचार मनांत येतांच मृत्युशय्येवरहि हृदय करपून जाईल.

८०० पवित्रांची मैत्री मोठ्या असोशीनें मिळव; अपात्रांची संगति—त्यांना कांहीं देऊन का होईना—परंतु सोडून दे.

## सर्ग ८१ : जीवश्च कंठश्च

८०१ आपल्या मित्रानें आपल्याशी वागतांना कितीहि स्वातंत्र्य घेतलें तरी जर आपण रागावणार नसूं तरच ती खरी मैत्री.

८०२ मोकळेपणानें नि प्रेमळपणानें परस्परांजवळ वागणें यांत मैत्रीचें सर्वस्व आहे. अशा अतिपरिचियाचा थोरांना कधीं राग येत नाहीं.

८०३ तुमची मैत्री फारां दिवसांची असेल; परतु ती जर मित्राला मोकळीक देणार नसेल, स्वातंत्र्याची सवलत देणार नसेल, तर ती काय कामाची ?

८०४ परस्परांच्या दृढ परिचयावर विसंबून एकमेकांस न विचारतांहि मित्र जेव्हां एखादी गोष्ट करतो, तेव्हां जे प्रेमळ हृदयाचे असतात, त्यांना त्यांत प्रेमच दिसतें.

८०५ मित्रानें केलेल्या एखाद्या गोष्टीमुळें, समजा, तुम्हांला दुःख झालें तरी त्याची एकरूपता, अभिन्नता, आपल्या मित्राला यामुळें दुःख होईल ही त्याला नसलेली कल्पना, इत्यादि गोष्टी मनात आणाव्या.

८०६ मित्र तुमच्या नाशाला कारणीभूत झाला तरीहि तुम्ही जर खरे मित्र असाल तर त्या हृदयाच्या मित्रास टाकणार नाही.

८०७ ज्यानें मनापासून कित्येक दिवस प्रेम केलें, त्याचें प्रेम, मित्रानें वरचेवर जरी नुकसानींत आणलें तरी, कमी होत नाही.

८०८ आपल्या खऱ्या मित्रासंबंधी कोणी कितीहि कागाळ्या केल्या तरी जो ऐकत नाही, त्याला तो मित्रच जेव्हां अपाय करतो, तेव्हांहि आनंदच होतो. (कारण मित्राला क्षमा करून आपली गाढ मैत्री दाखवायला प्रसंग मिळतो.)

८०९ जो दुसऱ्यावर अविचल प्रेम करतो, त्याच्यावर सारें जग प्रेम करतें.

८१० आपल्या जुन्या मित्रांवरचें ज्याचें प्रेम बदलत नाही, त्याच्याकडे शत्रूसुद्धां प्रेमानें पाहतील.

## सर्ग ८२ : अपायकारी मैत्री

८११ जणु तुम्हांला खाऊन टाकतील इतकें प्रेम जे तुमच्यावर करतात, मैत्री जोडण्याच्या वेळेपेक्षां तोडण्याच्या वेळेसच जे अधिक गोडीगुलाबी दाखवतात, अशांच्या हृदयांत प्रेमाचा लवलेशहि नसतो.

८१२ फायद्यासाठी जे खुशामत करतात, फायदा नाहीं असें दिसतांच जे खुशाल सोडून जातात, अशा नीचांची मैत्री लाभली काय न लाभली काय, सारखीच.

८१३ मैत्रीमुळें काय फायदा होईल याचा जे हिशेब करीत बसतात ते वेश्या व चोर यांच्या वर्गातीलच समजावे.

८१४ वरती बसणारास फेंकून रणांतून पळून जाणाऱ्या घोड्याप्रमाणें कांहीं लोक असतात; असे मित्र मिळण्यापेक्षां नसलेले बरे.

८१५ विश्वास टाकणाऱ्या मित्रास संकटकाळीं आणि त्याला मदतीची अपेक्षा असतांना जे सोडून जातात, अशा नीचांची मैत्री नसलेली बरी.

८१६ मूर्खांशीं दृढ मैत्री असण्यापेक्षां शहाण्यांचें शत्रुत्वहि शतपटीनें बरें.

८१७ खुशामत्ये आणि चलती आहे तोंवर मैत्री करणारे, अशापेक्षां शत्रूचा द्वेषहि पुरवला.

८१८ एखाद्या कामांत तूं जिवापाड मेहनत करीत असतां जे तुझ्या मार्गात अडथळेच आणतात, अशांजवळ एक शब्दहि न बोलतां दूर जाणें हें चांगलें.

८१९ ज्यांच्या वाणीत आणि करणींत मेळ नाहीं, अशांजवळ मैत्री स्वप्नांतहि मनांत आणाल तरी नुकसान होईल.

८२० तुम्ही एकटे असतांना तुमच्या जवळ गोड बोलतात; परंतु सभेंत जे तुमची टर उडवतात, उपहास करतात, अशांच्याजवळ जरासुद्धां जाऊं नकोस.

## सर्ग ८३ : खोटी मैत्री

८२१ शत्रूनें वरपांगी दाखविलेली मैत्री म्हणजे ऐरण होय; वेळ येतांच या ऐरणीवरच तो तुला ठोकून काढील.

८२२ जे वरून मित्र दिसतात, परंतु अंतरी शत्रु असतात, अशांची मैत्री स्त्री-हृदयवत् चंचल समज.

८२३ शत्रु कितीहि विद्वान् असला, त्याने नीतिशास्त्राचे, धर्मशास्त्राचे कितीहि ग्रंथ वाचले असले, तरी त्याच्या हृदयांतील द्वेष जाणें अशक्य आहे.

८२४ तोंडावर हास्य खेळवणारे परंतु मनांत मत्सर बाळगणारे, अशा दांभिक दुष्टांना भिऊन वाग.

८२५ ज्यांची मतें तुझ्याशी एकरूप नाहीत, अशांची वाणी कितीहि मोहक वाटली, तरी त्यांच्यावर थोडाहि विश्वास ठेवूं नकोस.

८२६ शत्रु लोणकढी प्रेमाची भाषा बोलला, तरी त्याचें खरें स्वरूप एका क्षणांत प्रगट होईल.

८२७ शत्रूनें बोलण्यांत कितीहि नम्रता दाखविली तरी विश्वसूं नकोस; वांकलेलें धनुष्य उपाय सुचविते.

८२८ जोडलेल्या हस्तांजलींतहि शत्रूनें शस्त्र लपविलें असेल; त्याच्या अश्रूंवरहि विश्वसू नकोस.

८२९ बाहेर चारचौघांत तुझी स्तुति करणार, परंतु गुप्तपणें तुझी कुटाळकी करणारे, अशांजवळ तूंहि वरून हसून खेळून वाग, परंतु वेळच आली तर आलिंगन देतांना त्याला चिरडून टाकण्यास कचरूं नकोस.

८३० उघडपणे शत्रूजवळची मैत्री झुगारून देतां येत नसेल, तर मैत्रीचें सोंग चालू ठेव. तो वरपांगी मैत्री दाखवतो, तशी तूंहि दाखव. परंतु हृदयांत त्याला जागा देऊं नकोस.

## सर्ग ८४ : मूर्खपणा

८३१ तुला मूर्खपणा समजून घ्यायचा आहे? हितकर फेंकणें नि अहितकर कवटाळणें याला मूर्खपणा म्हणतात.

८३२ अयोग्य नि नीच गोष्टीकडे मन जाणें याला मूर्खपणा म्हणतात.

८३३ अविवेकी मनुष्य कर्तव्यपराङ्मुख आणि उद्धट असतो, त्याला लाज नसते. ज्या गोष्टी हृदयाशीं धराव्या त्या तो कधींहि धरणार नाहीं.

८३४ विद्वान् आहे, दुसऱ्यास शिकवतो; परतु स्वतःच्या वासनांचा मात्र गुलाम आहे; अशाहून मूर्ख अविचारी दुसरा कोण आहे ?

८३५ मूर्ख एका जन्मांत स्वतःविषयी इतकें बोलतो कीं त्यामुळें सात जन्म नरकांत निःशंक स्थान मिळेल.

८३६ क्षणभर टिकणारे उद्योग जो आरंभतो, आणि त्यांचीहि पुढे माती करतो, तो पुढें गोत्यांत, बंधनांत पडल्याशिवाय राहणार नाहीं.

८३७ मूर्खाला मिळालेल्या ठेव्यामुळे इतरेजनांची चंगळ उडेल; घरची मात्र उपाशी मरतील.

८३८ मूर्खाच्या हातांत मोलवान् वस्तु पडल्या तर आधींच मर्कट तशांत मद्य प्यायलेला, अशासारखा तो वागेल.

८३९ मूर्खाची मैत्री मोठी गमतीची असते; ती तुटली तरी दुःख होत नाहीं.

८४० न धुनलेला पाय कोचावर ठेवावा, तद्वत् सन्मान्य लोकांच्या सभेंत मूर्खानें पाऊल ठेवणें होय.

## सर्ग ८५ : अहंकारी मूर्खपणा

८४१ व्यवहारज्ञानाचा अभाव हें खरें दारिद्र्य; दुसऱ्या दारिद्र्याला जग दारिद्र्य समजत नाहीं.

८४२ मूर्खानें आपण होऊन देणगी दिली, तर देणगी मिळणाऱ्याचे नशीब म्हणायचें, दुसरें काय ?

८४३ शत्रूसुद्धां आणणार नाहीं अशीं संकटें आपल्या हातांनी मूर्ख आपल्यावर ओढून घेतो.

८४४ मी मोठा शहाणा असें म्हणण्यांत जितकी उथळ बुद्धि आहे, तितकी कोठेंच दिसणार नाहीं.

८४५ नसलेलें ज्ञान स्वतःजवळ आहे असें सांगणारा मूर्ख, स्वतःजवळ असलेल्या ज्ञानाविषयींहि साशंकता निर्मितो.

८४६ मनोबुद्धीची कुरूपता जर पदोपदीं प्रकट होत असेल, तर शरीर शृंगारून काय फायदा ?

८४७ गुप्त गोष्ट स्वतःजवळ न राखूं शकणारा उथळ आणि उतावीळ मनुष्य स्वतःवर मोठी संकटें ओढून आणील.

८४८ जो दुसऱ्याचा चांगला सल्ला ऐकत नाही, आणि चांगलें काय हें कळण्याची ज्याला अक्कल नाहीं, तो मरेपर्यंत स्वजनांना दुःख देत मात्र राहणार.

८४९ मूर्खाचे डोळे उघडण्याचा प्रयत्न करणारा मूर्ख होय; कारण मूर्ख एकाच दृष्टिकोनानें बघतो, आणि तेंच बरोबर असें त्याला वाटत असतें.

८५० सारें जग ज्या गोष्टी मानतें, त्याहि नाकारणारा मनुष्य पृथ्वीवरचा मूर्तिमंत सैतान होय.

## सर्ग ८६ : विरोधी वृत्ति

८५१ दुसऱ्याला नेहमीं उडवून लावण्याच्या वृत्तीमुळें शेवटी द्वेष जन्माला येतो.

८५२ मुद्दाम भांडण उकरून काढण्यासाठीं तुझा शेजारी जरी अपाय करायला आला, तरीहि तूं सूडबुद्धि मनांत न बाळगणें उत्तम.

८५३ नेहमीं भांडणें उकरीत बसण्याचा रोग फार वाईट; या रोगापासून मुक्त होणारा कायम टिकणारी कीर्ति मिळवील.

८५४ उद्धटपणासारखा अवगुण नाहीं; तो तुला हृदयांतून घालवतां आला तर तुला परमोच्च आनंद लाभेल.

८५५ जो वैर टाळतो, त्याला धुळींत मिळविण्याची कोण इच्छा करील ?

८५६ शेजाऱ्यावर सदैव जळफळणारा आणि उद्धटपणांतच आनंद मानणारा लौकरच ठेंचाळेल नि पडेल.

८५७ जो राजा कलहप्रिय आहे, मत्सरी आहे, त्याला देशाच्या अभ्युदयाची दृष्टि नसते.

८५८ कलहनिवृत्ति भाग्य देते; परंतु कलहाचें भूतच वाढवाल तर लगोलग नाश आल्याशिवाय राहणार नाहीं.

८५९ तुमच्यावर दैव सुप्रसन्न असेल तर तुम्ही क्रोधवश होणार नाहीं; परंतु दैवानें तुमचा नाश करायचेंच ठरवलें असेल, तर तुम्ही शेजाऱ्याजवळ इतक्या घमेंडखोरपणानें वागाल कीं सीमा नाही.

८६० उद्धटपणामुळें सारी कटुता जन्मते; सुस्वभावामुळें शान्ति नि ऐक्य यांचें मधुर फळ मिळतें.

## सर्ग ८७ : शत्रूचीं लक्षणें

८६१ प्रबळांशी स्पर्धा नको; परंतु दुबळ्यांवर क्षणभरहि न थांबतां चढाई कर.

८६२ जो राजा दुष्ट आहे, ज्याला मित्र नाहींत, एकाकी ठाण मांडण्याची ज्याला शक्ति नाही, तो शत्रूच्या सैन्याविरुद्ध कसा टिकाव धरणार ?

८६३ ज्या राजाला धैर्य नाहीं, अक्कल नाहीं, जो शेजाऱ्याशीं स्नेहानें वागत नाहीं, तो तावडतोब शत्रूच्या भक्ष्यस्थानीं पडतो.

८६४ जो राजा तामसी आहे, ज्याच्या ताब्यांत जीभ नाहीं, तो सर्व काळीं, सर्व स्थळीं, सर्वांच्या भक्ष्यस्थानीं पडेल.

८६५ ज्याला कसें वागावें तें कळत नाहीं, ज्याला स्वाभिमान नाहीं, राजनीतीकडे जो लक्ष देत नाहीं, त्याला पाहून शत्रूंना आनंद होतो.

८६६ जो राजा विषयवासनास बळी पडतो, क्रोधान्ध होऊन बुद्धि गमावतो, त्याच्याशीं वैर आल्यास वैरी आनंदतो.

८६७ जो राजा कामांना हात घालतो; परंतु त्यांत यश यावें म्हणून खटपट मात्र करीत नाही, अशाशी किंमत देऊनहि शत्रुत्व पत्करावें.

८६८ राजा अवगुणांचा पुतळा असेल तर त्याला मित्र मिळणार नाहीत आणि त्याचे शत्रू आनंदतील.

८६९ प्रतिस्पर्धी मूर्ख नि भित्रा असेल तर शत्रूला आनंद होतो.

८७० मूर्ख शेजाऱ्यांशी लढून सहजपणे मिळणाऱ्या विजयाकडे जो लक्ष देत नाहीं, त्या राजाला कधीहि कीर्ति मिळणार नाही.

## सर्ग ८८ : उगीच शत्रु निर्माण करणें

८७१ थट्टेनेंसुद्धां आपण होऊन शत्रुत्वाची दुष्ट भावना मनांत बाळगू नये.

८७२ धनुष्य ज्यांचें शस्त्र आहे अशांना आह्वान देच; परंतु जिह्वा हें ज्यांचें शस्त्र आहे त्यांना मात्र उगीच संतापवं नकोस.

८७३ मित्र नसतांना जो राजा अनेक शत्रूंना आह्वान देतो, तो मूर्खाहून मूर्ख समजावा.

८७४ शत्रूला मित्र बनविण्यांत जो पटाईत आहे, त्याची सदैव सत्ता राहील.

८७५ दोन शत्रूंशीं तुला एकाकी लढण्याचा जर प्रसंग आला, तर त्या दोहोंतील एकाला स्वतःच्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न कर.

८७६ शेजाऱ्याच्या बाबतीत—तो शत्रु असो वा मित्र असो—तूं जर कांही करावयाचें ठरविलें असशील, तर तें तूं जेव्हां स्वतः अडचणीत असशील, त्या वेळेस करू नकोस.

८७७ तुझ्या अडचणी ज्यांना माहीत नाहींत, त्यांना त्या कळूं देऊं नकोस; तुझी व्यंगें शत्रूसमोर उघड करूं नकोस.

८७८ चांगल्या योजना कराव्या; साधनें समृद्ध करावी; किल्लेकोट नि संरक्षणाची साधनें बळकट ठेवावी. असें कराल तर तुमच्या शत्रूचा अभिमान लौकरच धुळीला मिळेल.

८७९ कांटेरीं झाडें लहान आहेत, तोंच तोडावी; कारण मोठी झाल्यावर ती तोडूं पाहाल तर ती तुमचे हात कापून टाकतील.

८८० तुम्हांला तुच्छ मानणाऱ्यांचा गर्व जर तुम्ही दूर न कराल, तर तुमचा लौकरच नाश होईल.

## सर्ग ८९ : घरभेदे

८८१ आमराया, झरे, यांच्यापासून रोगराई उत्पन्न होत असेल तर त्यांच्यापासून कोठला आनंद, कोठलें सुख? तद्वत् आप्तेष्टच जर तुमच्या नाशाची खटपट करीत असतील, तर त्यांचा त्यागच करावा.

८८२ नागव्या तरवारीप्रमाणें उघड शत्रुत्व करणाऱ्याची तेवढी भीति नाहीं, परंतु मैत्रीचें ढोंग करणाऱ्या शत्रूपासून मात्र सावध राहिलें पाहिजे.

८८३ गुप्त शत्रूंच्या बाबतींत सावध रहा; कारण तूं संकटांत आहेस असें दिसताच ते तुझा निःपात करतील.

८८४ मैत्रीचें ढोंग करणारे शत्रु अनेक कारस्थानें रचीत असतात; तुझ्या आप्ते-ष्टांच्या मनांत ते विष कालवतील.

८८५ स्वतःचे आप्तेष्टच जेव्हां द्रोही नि विश्वासघातकी बनतात, तेव्हां ते संकटें आणून तुझा जीव धोक्यांत आणतील.

८८६ फंदफितुरी एकदां का राजवाड्यांत, सैन्यांत शिरली, म्हणजे मग तिला बळी न पडणें अशक्य होतें.

८८७ घरभेद्या असलेलें घर घट्ट झांकण असलेल्या भांड्याप्रमाणें असतें; दिसायला एक; परंतु वस्तुतः दोन.

८८८ ज्या घरांत घरभेदी असतो, तें गंजलेल्या लोखंडाप्रमाणें धुळीत मिळतें.

८८९ घरभेद्या असलेल्या घराचें गृहछिद्र लहानसें असलें, तरी विनाश तेथें घिरट्या घालीत असतो.

८९० तुमच्याविषयी द्वेषमत्सर बाळगणाऱ्याजवळ तुम्ही आपलेपणानें वागणें म्हणजे घरांत सर्प घेऊन राहण्याप्रमाणें आहे.

## सर्ग ९० : बलवंतांचा राग

८९१ जे सर्वशक्तिमान् आहेत, कर्तुमकर्तु करूं शकतील, अशांच्या क्रोधापासून स्वसंरक्षणेच्छु माणसानें जपावें; त्यांच्या क्रोधाला तिळभरहि जागा देऊं नये.

८९२ तुम्ही बलवंतांचा अपमान कराल, तर त्यांची शक्ति तुमच्यावर अपरिहार्य अशी अनन्त दुःखें लोटील.

८९३ तुला स्वतःचा सर्वनाश करून घ्यायचा आहे ? तर मग जा आणि तुझा नाश करण्याचें ज्यांना सामर्थ्य आहे त्यांना डंवच.

८९४ जो प्रबळाला दुखवितो, तो आपण होऊन मृत्यूला बोलावतो.

८९५ प्रबळ शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा राजाचा राग जो ओढवून घेईल, त्याची कोठेंहि धडगत नाही.

८९६ वणव्यांत सांपडलेले एक वेळ जिवानिशीं सुटतील; परंतु प्रबळांचा अपमान करणाऱ्यांना मात्र आशा नाही.

८९७ तपःसामर्थ्यसंपन्न ऋषि जर तुझ्यावर संतापले, तर तुझें हें कुबेराचें वैभव कोठें राहील ?

८९८ आपला पाया पक्का आहे, कोणाचेंहि भय नाहीं, असें जरी तुम्हांस वाटलें तरी पर्वताप्रमाणें बलवान् असणाऱ्यांनीं मनांत आणलें तर तुमचें तें समूळ उत्पाटन करूं शकतील.

८९९ पवित्र व व्रती लोक देवेन्द्रावर संतापले तर तो देवेन्द्रहि स्वाराज्य गमावून रसातळास जाईल.

९०० तपोनिधीची वक्र दृष्टि वळली, तर मी मी म्हणणारे मातबरहि धुळीस मिळतील.

## सर्ग ९१ : बाईलवेडे

९०१ बाईलवेड्यांना मोठेपणास मुकावें लागतें; मोठमोठ्या गोष्टी आपण करूं अशी ज्यांना महत्त्वाकांक्षा असेल, त्यांनी या मोहापासून दूर रहावें.

९०२ अति स्त्रैणाची विलासलालसा लोकांत उदाहरण म्हणून दाखविली जाईल व लज्जेनें त्याला मान खाली घालावी लागेल.

९०३ पत्नीसमोर लाळ घोटणाऱ्याला थोरांमोठ्यांसमोर तोंड दाखवायला जागा नसते.

९०४ जो आपल्या पत्नीचा दास आहे, त्याला मोक्ष नाही. त्याची बुद्धि पै-किंमतीची समजा.

९०५ जो आपल्या पत्नीलाहि भितो, तो थोरांमोठ्यांची सेवा कशी करणार ?

९०६ पत्नीच्या सुकुमार बाहुपाशांना भिऊन जे उभे राहतात, ते देवांप्रमाणें राहिले, वागले, तरी त्यांना कोणीहि मान देणार नाही.

९०७ राज्यकारभारांत जो बायकांचें बंड चालू देतो, त्याच्याहून विनयशील कुमारिका अधिक थोर नि श्रेष्ठ आहे.

९०८ बायकोच्या मुठींत वागणारे आपल्या मित्रांच्या गरजा पुरवूं शकणार नाहींत, कोणतेहि चांगलें काम करूं शकणार नाहीत.

९०९ जे स्त्रियांच्या हातीं सत्ता देऊन त्यांच्या तंत्रानें वागतात, त्यांना धर्मार्थ नाहींतच; परंत प्रेमाचाहि खरा आनंद त्यांना लाभणार नाहीं.

९१० मोठ्या गोष्टी मनांत खेळवणारे, ज्यांच्यावर ईश्वरी कृपा असते, ते स्रेण- पणाचा मूर्खपणा कधींहि करणार नाहीन.

## सर्ग ९२ : वारांगना

९११ ज्या स्त्रिया प्रेमासाठी नव्हे तर पैशासाठी म्हणून परपुरुषाची इच्छा करतात, त्यांच्या मोहक लीला दुःखाकडे नेतील.

९१२ वरपांगी प्रेम दाखवून स्वार्थावर ज्यांची दृष्टि असते, अशा स्त्रियांचे मार्ग नीट पहा व चार पावले दूर रहा.

९१३ प्रियकराला आलिंगन देतांना वेश्या प्रेम दाखविते; परतु प्रेतालाच आपण कवटाळीत आहोंत असें ती मनांत समजते.

९१४ निर्मळ कर्माची आवड असणारे वेश्येच्या स्पर्शानें स्वतःला अपवित्र करीत नसतात.

९१५ गाढी विद्वत्ता नि विवेक ज्याच्याजवळ आहे, असा पुरुष जिचें सौन्दर्य सर्वांसाठी आहे अशा वेश्येच्या स्पर्शानें स्वतःला कलंक लावून घेणार नाही.

९१६ स्वहितदक्ष मनुष्य आपल्या सौंदर्याची विक्री करणाऱ्या वेश्येच्या हाताला स्पर्श करीत नाही.

९१७ फुलपांखरी वृत्तीचे उथळ लोकच शरीरानें कवटाळणाऱ्या परंतु मन अन्यत्र असणाऱ्या स्त्रियांच्या पाठोपाठ जातात.

९१८ धूर्त व मायावी स्त्रियांचीं आलिंगनें फसव्या अप्सरांच्या आलिंगनांप्रमाणें मूर्खांनाच मोहक वाटतात.

९१९ शृंगारसाज केलेल्या वेश्येचे मृदु बाहु म्हणजे नरकाची गर्ता; नीच लोकच या गर्तेत पडून सडतात.

९२० देवाची अवकृपा असणारे लोकच दोन मनें असणाऱ्या वेश्या, मद्य आणि द्यूत यांत आनंद मानतात.

## सर्ग ९३ : सुरापान

,२१ मद्यपी माणसाचे शत्रु त्याला कधीहि भिणार नाहीत; मद्यपी मिळविलेली कीर्ति गमावील.

,२२ सुरापान करूं नका; सज्जनांनी आपणास मानावें असें वाटत असेल तर दारूपासून दूर रहा.

,२३ दारुड्याचें दर्शन जन्मदात्या मातेसही किळसवाणे वाटतें; मग इतर सन्मान्य जनांस वाटेल यांत काय आश्चर्य ?

,२४ दारूचें व्यसन ज्याला लागतें, त्याला लज्जादेवी सोडून जाते.

,२५ स्वतःचे पैसे देऊन दारू पिणें आणि बुद्धिभ्रष्ट होऊन गटारांत लोळणें, हा मूर्खपणाचा कळस होय.

,२६ नेहमी ताडी पिणारा नेहमी झोपी गेल्याप्रमाणें किंवा मृतवत्‌च मानावा.

,२७ चोरून दारू पिऊन जे बेहोष होऊन पडतात, त्यांच्या व्यसनाचा लोकरच गवगवा होऊन फजीती होते.

,२८ दारुड्यानें दारू म्हणजे काय तें मला माहीतहि नाही, असें ढोंग तरी करू नये; कारण खोटें बोलण्याचें आणखी एक पाप ते करतात.

,२९ सुरामत्ताजवळ जो बुद्धिवाद करूं पाहतो, सुरापानाचे तोटे त्याला समजवूं पाहतो, त्याचें तें करणें म्हणजे पाण्यांत बुडालेल्याजवळ मशाल शोधण्याप्रमाणें आहे.

,३० मद्यप्याची स्थिति तुम्ही शुद्धीवर असतांना पहाल तर दारू प्यायल्यावर आपली स्थिति कशी होईल, त्याचें चित्र डोळ्यांसमोर नाहीं का आणतां येणार ?

## सर्ग ९४ : द्यूत

९३१ तूं जिंकणार असलास तरीहि द्यूत खेळूं नको. तुझें तें जिंकून घेणें माशानें गिळलेल्या गळाप्रमाणें आहे.

९३२ द्यूतासक्त लोक एक मिळवतील; तर शभर गमावतील. या जगांत स्वतःची भरभराट करून घ्यायला त्यांना कोठें वाव आहे ?

९३३ पुनः पुनः सारें पणास लावाल तर सारें गमावाल.

९३४ द्यूतानें जितक्या लौकर दारिद्र्य येतें, तसें कशानेंच येत नाहीं. द्यूतानें नांव बद्द होतें आणि वाटेल तें घाणेरडें कृत्य करायलाहि मनुष्य तयार होतो.

९३५ फांसे खेळण्यांतील आपल्या कौशल्याचा अभिमान बाळगणारे नि द्यूतगृहाकडे जाणारे पुष्कळ झाले. परंतु रडला नाहीं, पस्तावला नाहीं, असा कोणीहि त्यांत दिसत नाहीं.

९३६ द्यूतासक्तीच्या रूपानें तुमचें दुर्दैवच येतें नि तें तुम्हांला अंध करते. शेवटी अन्नान्नदशा प्राप्त होते.

९३७ जुगाराच्या अड्ड्यावर जाऊन तूं आपला वेळ वायां दवडशील, तर लौकरच सारी संपत्ति संपुष्टांत येईल, तुझा नांवलौकिकहि नष्ट होईल.

९३८ द्यूतामुळें संपत्ति जाईल, प्रामाणिकपणाहि नाहींसा होईल, द्यूतामुळें तुझें हृदय कठोर होईल, तुझ्यावर दुःखसंकटें कोसळतील.

९३९ जो द्यूतरत आहे, त्याला यश, तेज, विद्या, वैभव—सारें सोडून जाईल. त्याला दुपारची भ्रान्त पडेल.

९४० दुःखीकष्टी मनुष्य आशेनें अधिकच जीवनासक्त होतो, त्याप्रमाणें द्यूतांत गमावणारा अधिकाधिकच इरेस पडतो.

## सर्ग ९५ : औषधें

९४१ कफ, पित्त, वात, यांत कोणाचेंहि आधिक्य होतांच रोग होतो.

९४२ पहिलें अन्न पचल्यावरच जर दुसरें खाल्लें, तर औषधाची जरूरच नाहीं.

९४३ बेतानें खा; पहिलें पचलें असेल तरच खा; आयुष्यवर्धनाचा हा राजमार्ग होय.

९४४ सणसणून भूक लागेपर्यंत वाट पहा आणि मग प्रकृतीस मानवणारें अन्न बेतानें घे.

९४५ प्रकृतीला मानवणारा आहार प्रमाणांत घेशील, तर कधींच शारीरिक व्याधि होणार नाही.

९४६ पोट रिकामें असेल तेव्हांच खाणाऱ्याला आरोग्य शोधित येतें; आणि अपचन असतांहि खच्चून खाणाऱ्याला नाना रोग शोधित येतात.

९४७ पचनशक्तीच्या बाहेर मूर्खपणानें आधाशासारखें खाणाऱ्यास सतरा रोग जडतात.

९४८ रोग जडण्याचें कारण नि रोग हटण्याचे उपाय यांचा विचार कर; आणि नीट काळजी घेऊन रोग दूर करण्याच्या कामास लाग.

९४९ चिकित्सकानें रोग्याची एकंदर स्थिति, रोगचिकित्सा व काळ ह्या सर्व गोष्टींचा विचार करावा; आणि मग रोग्याला बरें करण्याच्या मार्गाला लागावें.

९५० रोगी, वैद्य, औषधें नि औषधें देणारे, या चार गोष्टींवर रोग बरा होण्याचें अवलंबून असतें. या चारांचे पुन्हां चार विविध गुण आहेत.

# संकीर्ण प्रकरण

## सर्ग ९६ : सत्कुल

९५१ जे कुलज असतात, त्यांच्याजवळ उपजतच सत्य, विनय, हे गुण असतात.

९५२ कुलवान् मनुष्य सद्वर्तन, सद्‌भिरुचि, चांगली रीतभात, प्रामाणिकपणा यांच्यापासून कधीहि च्युत होत नाहीं.

९५३ हंसतमुख, उदार हात, गोड वाणी नि नम्रता, हे कुलवानाचे चार गुण आहेत.

९५४ कुलवान् मनुष्य कोटि कोटि द्रव्य मिळत असलें, तरीहि यशाला कलंक लावूं देणार नाही.

९५५ जे कुलज आहेत ते दारिद्र्यांतहि औदार्य टाकणार नाहीत.

९५६ आपल्या कुळाची थोर परंपरा, उत्तम चालरीत जो राखूं इच्छितो, तो कधीहि वाम मार्गाचा अवलंब करणार नाही.

९५७ चंद्रावरील डाग स्पष्ट दिसतो; तद्वत् मोठ्या घराण्यांतील माणसाचा दोषहि पटकन् डोळ्यांत भरतो.

९५८ थोर कुलांत जन्मलेल्याच्या ठायी जर उद्धट वाणी दिसून आली, तर लोक त्याच्या कुलशीलाविषयी शंका घेतील.

९५९ अंकुरावरून भूमीची इच्छा; त्याप्रमाणें वाणीवरून कुळाची ओळख.

९६० जर सद्गुणाची पारख असेल तर विनयशील हो; स्वतःच्या कुलाचा मान राखायचा असेल तर सर्वांना सन्मानावयास आधी शीक.

## सर्ग ९७ : स्व-मान

९६१ प्राण गेला तरी मानहानि सहन करूं नको.

९६२ आपल्यामागें आपलें विशुद्ध नांव रहावें असें वाटत असेल, तर मोठेपणासाठी म्हणूनहि खोटें कर्म करूं नको.

९६३ वैभवाच्या काळी विनय अंगी असूं दे; पडत्या काळांत स्वाभिमानधनाला दृढ धरून ठेव.

९६४ ज्यांनी विशुद्ध नांव मळविलें, ते मुंडन केलेल्या डोक्यावरून फेंकून दिलेल्या केसांप्रमाणें नीच आहेत.

९६५ पर्वतासमान धीरगंभीर असणारीं माणसें अणूइतकेंहि दुष्कृत्य करतील तर क्षद्रांहून क्षद्र तीं दिसं लागतील.

९६६ तुमचा उपहास नि तिरस्कार करणाऱ्या लोकांची खुशामत करून तेज चढत नसतें, कीर्ति मिळत नसते. मग कां बरें असें करावें ?

९६७ आपला तिरस्कार करणाऱ्यांचें तोंड पाहून जगण्यापेक्षां तत्काळ मरणें बरें.

९६८ स्वाभिमान गमावून कातडी राखूं पाहणाऱ्यांना प्रश्न आहे : स्वाभिमानापेक्षां का कातडी मोलाची आहे ?

९६९ अंगावरची लोंकर जातांच कावरिमा प्राणी प्राणत्याग करतो; त्याप्रमाणें हळुवार हृदयाचीं कांही माणसें आपला स्वाभिमान राखतां येत नाहीं असें दिसतांच जीवनाचा सोक्षमोक्ष करतात.

९७० नांव गमावण्यापेक्षा मरणें बरें, असें म्हणणाऱ्या मानधनांना जग वंदील, त्यांच्या यशोमंदिरांत त्यांना पूजील.

## सर्ग ९८ : मोठेपणा

९७१ उदात्त कर्माची महत्त्वाकांक्षा असणें म्हणजे मोठेपणा होय, मला त्या उदात्ताची जरूर नाही असें म्हणणें म्हणजे क्षुद्रता होय.

९७२ सारी माणसें एकाच पद्धतीनें जन्मतात; परंतु जगतांत निरनिराळ्या रीतीनें त्यांची कीर्तिहि वेगवेगळी होते.

९७३ मोठ्या कुलांत जन्मून मन मोठें नसेल तर ते मोठे नव्हेत, क्षुद्र कुलांत जन्मून मन क्षुद्र नसेल तर ते क्षुद्र नव्हेत.

९७४ स्त्रीच्या पातिव्रत्याप्रमाणें स्वतःशी सत्यनिष्ठ असणाऱ्यांनाच मोठेपणा मिळवतां येतो.

९७५ अशक्य गोष्टी योग्य साधनांनी शक्य करणें, हा योजकत्वाचा आणि चिकाटीचा गुण मोठ्यांच्या ठिकाणीं असतो.

९७६ क्षुद्र वृत्तीच्या लोकांना पूज्यांना पूज्य मानून त्यांची सदिच्छा नि कृपा मिळवावी असें कधीच वाटत नाही.

९७७ क्षुद्रांना सुदैवानें जर ऐश्वर्य प्राप्त झालें तर त्यांच्या घमेंडीला सीमा उरत नाहीं.

९७८ मोठेपणा विजयी असतो; तेथें ढोंग नसतें; क्षुद्र लोक आपले गुण जगासमोर मांडित सुटतात.

९७९ जो मोठा आहे, तो सर्वांजवळ नम्रतेनें वागतो. क्षुद्र लोक उद्धटपणाचें आगर असतात.

९८० मोठेपणा दुसऱ्यांच्या दोषांवर पांघरूण घालतो; क्षुद्रता परनिंदेशिवाय कधी बोलतच नाही.

## सर्ग ९९ : पात्रता

९८१ स्वतःची पात्रता वाढावी असें ज्यांना वाटतें, जे स्वकर्तव्य जाणतात, त्यांना जें जें चांगलें तें तें करावेंसें वाटतें.

९८२ पात्रता चारित्र्याच्या पावित्र्यांत असते; इतर गोष्टींनी पात्रता वाढत नसते.

९८३ विनय, प्रसन्न दयालुत्व, दुसऱ्याचे दोष क्षमणें, सर्वांवर प्रेम आणि सत्यनिष्ठा, हे थोर चारित्र्याच्या इमारतीचे पांच खांब आहेत.

९८४ साधूचा मोठा गुण म्हणजे अहिंसा; आणि ज्याची थोर योग्यता असते तो निंदेचा शब्द कधीं बोलत नाही.

९८५ नम्रता हेंच बलवंताचेंहि बळ; मोठ्यांचें शत्रुविरुद्ध हेंच संरक्षक कवच असतें.

९८६ योग्यता कशी पारखावी? आपल्याहून क्षुद्र असणाऱ्यांच्या ठिकाणीं श्रेष्ठत्व दिसून आलें, तर तेंहि आनंदानें कबूल करणें म्हणजे पात्रता, म्हणजे योग्यता.

९८७ अपाय करणाऱ्यावर उपकार न करील, वाईट इच्छिणाऱ्याचेंहि भलें न चिन्तील, तर मग थोरांचें थोरपण तें कोठें उरलें?

९८८ शीलाची संपत्ति भरपूर असेल तर दारिद्र्य हें कांहीं दूषण नाहीं.

९८९ आणिबाणीच्या प्रसंगीहि जो सत्त्वच्युत होत नाही तोच थोर योग्यतेचा.

९९० मोठी माणसेंहि मोठेपणापासून च्युत होऊं लागलीं तर पृथ्वीला मानवांचा भार सहन करवणार नाही.

## सर्ग १०० : सभ्यता

९९१ जे मोकळ्या हातांनी सर्वांना जवळ घेतात, त्यांच्याजवळ सभ्यता सहजच असते.

९९२ मानवाविषयीची सहानुभूति आणि कुलीनता यांच्यांतून सभ्यता जन्माला येते.

९९३ बाह्य चिन्हें मानवांना एक करूं शकणार नाहींत; हृदयांतील विनयशील सभ्य भावच सर्वांना जोडूं शकेल.

९९४ न्यायी, सत्यनिष्ठ, परोपकारी, सदाचारी, यांच्या चालीरीतीला जग श्रेष्ठ मानतें.

९९५ थट्टेतहि उपहासात्मक नि अपमानात्मक शब्द उच्चाराल तरी दुसऱ्याचें हृदय दुखवलें जातें; म्हणून कुलवान् मनुष्य शत्रूजवळहि सभ्यतेनें वागतो.

९९६ चांगल्या चालीरीतींची माणसें जगांत आहेत म्हणून जगाचें गाडें सुरळीत चाललें आहे. तीं नसतीं तर जगांतील सारा सद्भाव, सारी प्रेममय माधुरी नष्ट झाली असती.

९९७ केवळ कुशाग्र असून काय उपयोगी? जर सभ्य चालरीत तुमच्याजवळ नसेल तर तुम्ही केवळ ओंडकेच आहांत.

९९८ असभ्यता मानवाला शोभत नाहीं. अन्यायी अशा वैऱ्यांजवळहि असभ्यपणें वागणें बरें नव्हे.

९९९ ज्यांना हास्य माहीत नाहीं, त्यांना या विशाल सृष्टींत दिवसाहि अंधारच आहे.

१००० पोरकटाजवळील धन-दौलत म्हणजे न घासलेल्या भांड्यांतील दुधाप्रमाणें होय.

## सर्ग १०१ : संपत्तीचा उपयोग न करणें

१००१ संपत्ति सांठवून तिचा उपभोग न घेणारा मृतवत् समजावा.

१००२ राशिवेरी द्रव्य जमवून त्याचा यत्किंचितहि उपयोग न करणारा कवडी-चुंबक कृपण मनुष्य पुढील जन्मीं भूत होईल.

१००३ जे नेहमीं संचयच करतात, कीर्तीची ज्यांना स्पृहा नाहीं, त्यांचें जगणें पृथ्वीला भारभूत होय.

१००४ शेजाऱ्यांचा लोभ, प्रेम, स्नेह, मिळविण्याविषयी बेफिकीर असलेला आपल्या मागें ठेवील तरी काय ?

१००५ जे दुसऱ्यांस देत नाहीत, स्वतःहि उपभोगित नाहींत, त्यांची कोटि कोटि संपत्ति असली तरी काय उपयोग ?

१००६ जो दुसऱ्यास देत नाही, स्वतः भोगित नाही, तो संपत्तीला मिळालेला शाप होय.

१००७ जवळ असूनहि गरजू माणसास जो देत नाहीं, तो एकटी राहून आपलें तारुण्य व्यर्थ दवडणाऱ्या तरुणीप्रमाणें आहे.

१००८ ज्याच्यावर लोकांचें प्रेम नाही, त्याचें वैभव गांवाच्या मध्यभागी वैभवानें शोभणाऱ्या विषवृक्षाप्रमाणें आहे.

१००९ जो मनांत कधींहि धर्मविचार करित नाही, केवळ धनाच्या राशि जोडीत असतो, तो स्वतःचें शरीर नि मन दोघांना उपाशी ठेवतो. त्याचें द्रव्य दुसऱ्यांची धन होते.

१०१० उपकार करण्यांत ज्यानें सारें गमावलें, त्याला आलेली कष्ट दशा रिकाम्या झालेल्या पावसाळी ढगाप्रमाणें समजावी: ती फार वेळ राहणार नाहीं.

## सर्ग १०२ : लज्जेची जाणीव

१०११ स्वतःला न शोभणारें कर्म करायला सज्जन लोक लाजतात. त्यांची ही लज्जा स्त्रियांच्या लज्जाशीलतेहून निराळी असते.

१०१२ अन्न, वस्त्र, संतति, या गोष्टी सर्वांना सारख्याच असतात. माणसाचें वैशिष्ट्य वरील लज्जाशीलतेंत आहे.

१०१३ प्राण शरीरांत असतो; थोरपणा पवित्र लज्जाशीलतेंत असतो.

१०१४ सलज्जता हा थोरांचा अलंकार होय, निर्लज्जपणें बडबडणारा डोळ्यांपुढें नको असें वाटतें.

१०१५ दुसऱ्याचा अपमान स्वतःचा समजून जे खालीं मान घालतात, ते कोमल मधुर भावनांचें माहेर होत.

१०१६ ज्या साधनांचा उपयोग केल्यानें मान खाली घालावी लागणार नाहीं, अशा साधनांहून भिन्न साधनांनीं थोर लोक राज्य मिळविण्याचाहि प्रयत्न करणार नाहींत.

१०१७ ज्यांची स्वाभिमान-भावना अति हळु आहे, ते अपकीर्ति न व्हावी म्हणून प्राणहि फेंकतील; प्राण वांचावेत म्हणून ते लाज उगाळून पिणार नाहीत.

१०१८ ज्या गोष्टीमुळें दुसऱ्यास लाज वाटते, त्या गोष्टीनीं ज्यांना लाज वाटत नसेल, त्यांच्याबद्दल धर्माला लाज वाटते.

१०१९ परंपरागत कुलाचार न पाळल्यानें मनुष्य कदाचित् कुटुंबाला मुकेल; परंतु तो लाजच सोडील तर त्याला साऱ्याच हितमंगलाला मुकावें लागेल.

१०२० ज्यांना लाज नाहीं, ते जिवंत असून मेलेलेच समजावे; कळसूत्री बाहुल्या-प्रमाणें ते जीवनाचें नाटक करतात झालें.

## सर्ग १०३ : कुटुंबाला कळा चढवा

१०२१ हातांनीं काम करायला मी कधीच दमणार नाहीं अशा निश्चयासारखें कुटुंबाची भरभराट करणारें दुसरे साधन नाहीं.

१०२२ पुरुषार्थशाली श्रम, भरपूर काम, उत्कृष्ट व्यवहारज्ञान, हे गुण ज्या कुटुंबांत आहेत तें वर चढलेंच समजा.

१०२३ मी माझ्या घराण्याला चांगले दिवस आणीन, अशा निश्चयानें जो बाहेर पडतो, त्याच्यासाठीं देवसुद्धां कमर कसून कामाला पुढें होतात.

१०२४ कुटुंबाचा उत्कर्ष व्हावा म्हणून जे श्रमांत कधी खंड पडूं देत नाहीत, त्यांनीं मनांत जरी मोठमोठे मनसुबे केलेले नसले, तरीहि त्यांची भरभराट होईल.

१०२५ असत्याचरण न करतां जो आपल्या घराण्याला ऊर्जित दशा आणतो, त्याचें सारें जग मित्र होतें.

१०२६ ज्या घराण्यांत आपण जन्मलों, त्या घराण्याचा मान वाढविणें, त्याची कीर्ति वाढविणें, यांत खरा पुरुषार्थ आहे.

१०२७ रणांगणांत जो शूरवीर असतो, त्याच्यावर सारा भार येऊन पडतो; त्याप्रमाणें कुटुंबाचा भारसुद्धां, जो सहन करील, त्याच्यावरच येऊन पडतो.

१०२८ आपल्या कुटुंबाच्या उत्कर्षाची ज्याला इच्छा आहे, त्यानें वेळ वायां दवडूं नये. तो जर मौजा मारीत बसेल, आपण मोठे आहोंत अशा ऐटींत राहील, तर घराण्याला अवकळा येईल.

१०२९ येणाऱ्या प्रत्येक आघातापासून जो घराचें रक्षण करतो, त्याचें शरीर श्रमासाठी, कष्टासाठींच केवळ असावें ना ?

१०३० ज्या घराण्याला आधार द्यायला समर्थ पुरुष नाहीं, त्या घराण्याचीं पाळें-मुळें संकटें खणून टाकतील.

## सर्ग १०४ : कृषि; शेती

१०३१ कोठेंहि गेलांत तरी शेवटीं अन्नासाठीं नांगराच्या पाठीमागें उभें रहावें लागणारच. किती कष्ट पडले तरी शेवटीं कृषि हाच सर्वोत्तम धंदा होय, प्रमुख धंदा होय.

१०३२ समाजाचे आधारस्तंभ शेतकरी होत; शेत नांगरण्याची शक्ति नसल्यामुळें जे इतर धंदे करतात, त्यांचाहि शेतकरीच आधार असतो.

१०३३ जमीन कसून जे राहतात, तेच खरोखर जगतात. बाकी सारी दुनिया त्याच्या पाठोपाठ येते नि मिंधेपणाची भाकर खाते.

१०३४ ज्या राजाच्या राज्यांत भरदार कणसांच्या छायेंत शेतें विसांवा घेत असतात, त्या राजाच्या छत्रासमोर जगांतील इतर राजांचीं छत्रें लवलेलीं दिसतील.

१०३५ शेती करून जे भाकर खातात, ते स्वतःच्या पोटासाठीं कधीं याचना नाहींच करणार; उलट भिक्षा मागणाऱ्याला कधींहि नाहीं न म्हणतां भिक्षा घालतील.

१०३६ शेतकरी हात जोडून बसेल तर सर्व इच्छांचा त्याग करणाऱ्या निरिच्छ लोकांसहि जगणें जड जाईल.

१०३७ जमीन नांगरून आंत सूर्याची उष्णता जाऊन एक शेर मातीचें वजन जर तूं पावशेर करशील तर मूठभर खत न घालतांहि अपरंपार पीक येईल.

१०३८ नांगरण्यापेक्षां खतानें जास्त फायदा होतो; आणि नीट तण काढाल तर पाटबंधाऱ्यापेक्षांहि अधिक फायदा होईल.

१०३९ शेतांकडे न जातां मनुष्य जर घरीच बसेल तर त्याचीं शेतें पत्नी रागवते त्याप्रमाणें रुसतील, रागवतील.

१०४० " मला कांहीं खायला नाहीं " असें जेव्हां आळशी म्हणतो, तेव्हां ही सस्यश्यामल वसुंधरा, ही धरणी माता स्वतःजवळ हंसते.

## सर्ग १०५ : दारिद्र्य

१०४१ दारिद्र्याहून अधिक दुःखप्रद काय, असें विचारशील तर दारिद्र्याहून अधिक दुःखप्रद दारिद्र्यच, हें नीट ध्यानांत धर.

१०४२ या लोकीं वा परलोकीं दारिद्र्यामुळें सुख नाहीं, आनंद नाहीं.

१०४३ दारिद्र्यामुळें स्वाभिमान मरतो, वाणींतील सुसंस्कृतता जाते.

१०४४ दारिद्र्यामुळें थोरांमोठ्यांनाहि आपला मोठेपणा विसरण्याची पाळी येते आणि दास्याची नीच भाषा तेहि बोलूं लागतात.

१०४५ दारिद्र्याच्या एका शापांत असंख्य मानहानिप्रद प्रसंग असतात.

१०४६ दरिद्री लोकांनीं मोठमोठीं तत्त्वज्ञानें अपार बुद्धिवैभवानें विशद करून सांगितलीं, तरी त्यांच्या शब्दाला मान मिळणार नाही.

१०४७ गुणहीन दारिद्र्य अति शापरूप आहे. मायलेंकरांचीहि तें ताटातूट करतें.

१०४८ आजहि दारिद्र्य माझा सोबती आहेच का ? काल त्यानें मरणान्तिक दुःख दिलेंच होतें !

१०४९ रसरशीत निखाऱ्यांचीहि मी सुखशय्या करीन; परंतु दारिद्र्यांत क्षणभरहि डोळा लागणें कठिण.

१०५० दरिद्री लोकांना एकच मार्ग मोकळा आहे; तो म्हणजे मरणाचा. ते असें न करतील तर मिठाला नि पेजेला मरण आहे. (भीक मागून जगतील, तें अन्न व्यर्थच गेल्याप्रमाणें.)

## सर्ग १०६ : भिक्षा मागणें

१०५१ ज्यांच्याजवळ द्यायला आहे आणि जे देतील असें तुला वाटतें, त्यांच्या-जवळच याचना कर. तरीहि आमच्याजवळ कांहीं नाहीं असें ते म्हणाले तर तो त्यांचा दोष.

१०५२ कोणत्याहि प्रकारचा पाणउतारा न होतां जें मागितलेंस तें जर तुला मिळालें तर तें मागणेंहि आनंद देईल.

१०५३ जे कर्तव्य जाणतात, देण्याची आपली ऐपत नाहीं असें जे खोटेपणानें दाखवित नाहींत, अशांजवळ मागण्यांतहि एक प्रकारची शोभा असते.

१०५४ स्वप्नांतहि जो नकार देत नाहीं, अशाजवळ मागणें म्हणजे देण्याप्रमाणेंच सन्मानाचें आहे.

१०५५ लोक निःशंकपणें याचकाचा पेशा स्वीकारतात; कारण आपखुशीनें भिक्षा घालणारे असतात.

१०५६ दया न दाखविण्याचा दुर्गुण ज्याच्याजवळ नाहीं, अशाच्या दर्शनानेंच दरिद्री माणसाचें दुःख दूर होतें.

१०५७ न रागावतां, न बोलतां, जो भिकाऱ्याला देतो, त्याला पाहून भिकाऱ्याचें हृदयहि आनंदतें.

१०५८ जगांत भिक्षा मागणारे नसते तर जगाला अर्थच उरला नसता. सारा स्वार्थी खाबूनंदांचा पसारा दिसला असता.

१०५९ याचकच नसते, तर दातृत्वाचा मोठेपणा कसा दिसता ?

१०६० खरोखरच माझ्याजवळ द्यायला कांहीं नाहीं, असें जेव्हां काकुळतीनें कोणी म्हणतो, तेव्हां मागणाऱ्यानें रुष्ट होऊं नये. आपल्याच सारखा दुसरा असणें शक्य आहे हें वास्तविक कळायला हवें.

## सर्ग १०७ : भीक मागणं नको

१०६१ प्रेमानें जरी मागणाऱ्याला मिळालें, तरी अशा भीक मागणाऱ्यापेक्षां भीक न मागणारा शतपट थोर होय.

१०६२ अन्नासाठी दारोदार भीक मागण्याची पाळी आली असतांहि माणसानें

जगावें अशी जर विधात्याची इच्छा असेल, तर त्यानें जगभर भीक मागत भटकावें नि मरून जावें.

१०६३ भीक मागून मी माझें दारिद्य दूर करीन असें म्हणण्यांत जें धाडस आहे, त्याहून अन्य मोठें धाडस नाही.

१०६४ अत्यन्त दारिद्य आलें असतांहि जो मानी पुरुष याचना करीत नाही, त्याचा मोठेपणा या त्रिभुवनांत मावणार नाही.

१०६५ स्वत:च्या हातांनीं कष्ट करून मिळवलेलें अन्न–मग ती पाण्यासारखी कांजी का असेना–त्यांची चव कांही औरच असते.

१०६६ तोंडानें भिकेची प्रार्थना करणें याहून मानहानिकारक व मिंधे या जगांत कांही नाही.

१०६७ भीक मागणाऱ्यांजवळ मी एक भीक मागतों:–"भीक मागायचीच असेल तर जे द्यायला तयार असतील, त्यांच्याजवळच मागा ! "

१०६८ भिकेचें गलबत सुरक्षित नाही. दुसऱ्यानें नाही म्हणतांच ते फुटतें.

१०६९ भिकाऱ्याची गोष्ट मनांत येतांच हृदय द्रवतें; परंतु त्याला मारणाऱ्या गचांड्या, त्याचे होणारे अपमान, त्याला मिळणाऱ्या शिव्या, यांचा विचार मनांत येतांच हृदय मरूनच जातें.

१०७० याचकाला पाहतांच जो तोंड फिरवितो, त्याचे प्राण असतात तरी कोठें ? कारण त्याच्या हिडीसफिडीस करण्यानें त्या याचकाचे प्राण जात असतात.

## सर्ग १०८ : अध:पतित जीवन

१०७१ अध:पतित लोक दिसायला अगदी इतर माणसांप्रमाणेंच असतात; परतु जीवनांत केवढा फरक !

१०७२ सदसद्विवेकबुद्धीला मानणाऱ्यांपेक्षां हे पापी लोक किती सुखी! यांना हृदयाची टोंचणी नाही, मनाची बोंचणी नाही.

१०७३ पृथ्वीवरचे दुष्ट, नीच लोक म्हणजे जणूं देव; कारण स्वतःचा कायदा ते स्वतःच करतात.

१०७४ त्या पाप्याहून मी किती अधिक पापी, असें मनांत येऊन पापशिरोमणि स्वतःला धन्य मानील.

१०७५ अधःपतित लोक भीतीमुळें आणि लालसेमुळें सारें करीत असतात. परंतु भीतीचाच हेतु प्रभावी असतो.

१०७६ नीच लोक वाद्याच्या नादाप्रमाणें असतात. त्यांच्याजवळ गुप्त म्हणून कांही सांगाल, तर लगेच जगभर त्यांचा ते डांगोरा पिटतील.

१०७७ नीच लोक त्यांचें थोबाड फोडणाऱ्यांसमोरच वांकतील, बाकी कोणाला ते हाताला लागलेलीं शितेंहि देणार नाहीत.

१०७८ शहाण्याला शब्दाच्या एका इशाऱ्यानें सांगतां येतें; परंतु नीचाला उंसाप्रमाणें चिरडावें लागतें.

१०७९ शेजाऱ्याला नीट खायला प्यायला आहे असें पाहतांच नीच लोक त्याची कुटाळकी करायला, त्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवायला तयार होतात.

१०८० आपत्ति आली असतां नीच मनुष्य एकच गोष्ट करतो: तो लगेच स्वतःला दुसऱ्याचा गुलाम म्हणून विकतो.

# भाग चौथा : तो नि ती

## विभाग पहिला

### सर्ग १०९ : सुंदरीनें हृदयास केलेली जखम

*तो*

१०८१ ती लावण्यमयी, हिरण्मयी मूर्ति! ती का वनदेवता होती? मत्त मयूरी होती? कीं ती सरल सुंदर बाला होती? खरोखर मी चकित होऊन गेलों आहें.

१०८२ आपल्या सर्व संभारासह रंभा जर मोह पाडायला आली, तर जशी दशा होईल तशीच हुबेहुब तिनें माझ्या दृष्टीला दृष्टि भिडवतांच माझी झाली.

१०८३ मृत्युदेवाची मला पूर्वी कल्पना नव्हती; परंतु आतां कळून आलें कीं मृत्यु स्त्रीरूपानें येतो व त्याचे डोळे विशाल नि जिंकून घेणारे असतात.

१०८४ ती साधी, सुंदर आहे; परंतु तिचे डोळे मात्र मोठे लढाऊ आहेत; कारण जे तिच्याकडे पाहतात त्यांचे प्राण ते डोळे प्राशून टाकतात.

१०८५ मी अंतकाला बघत आहें की फक्त डोळ्यांनाच बघत आहें? की हे

हरिणपाडसाचे डोळे आहेत? कारण या साध्या तरुणीच्या डोळ्यांत तिन्ही मला दिसत आहेत.

१०८६ ज्या वेळेस तिच्या भुंवया खालीं वांकून पहायचें बंद करतील व तिच्या मुद्रेवर पडदा घालतील, तेव्हांच तिचे डोळे मला विव्हल करणार नाहीत, माझ्यांत कंप उत्पन्न करणार नाहींत.

१०८७ मत्त हत्तीच्या डोळ्यांवर ज्याप्रमाणें झांपण असतें, त्याप्रमाणें त्या चारुगात्रीच्या स्तनांवर अंशुक आहे.

१०८८ रणांगणावर माझा पराक्रम न अनुभवतांहि मला पाहून मोठेमोठे कांपूं लागतात. अशा मलाहि तिनें आपल्या भालप्रदेशानें जिंकून घेतलें आहे.

१०८९ हरणीप्रमाणें तिची दृष्टि निष्कपट नि खेळकर आहे; विनय हा तिचा विशेष अलंकार आहे. मग तिचें नैसर्गिक सौंदर्य कमी करणारीं इतर भूषणें तिच्या अंगावर कशाला?

१०९० मद्यानें आनंद होतो; परतु तो ते घेणारालाच, प्रेमानें पाहतांच जसा आनंद होतो, तसा त्यानें होत नाहीं.

## सर्ग ११० : बाह्य लक्षणांनीं हृदय ओळखणें

### तो

१०९१ सुरमा घातलेल्या तिच्या डोळ्यांच्या पहाण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एका तऱ्हेनें हृदय विद्ध होतें तर दुसऱ्या तऱ्हेनें व्यथा बरी होते.

१०९२ प्रियकरानें आपले डोळे बाजूला वळवतांच त्याच्याकडे चपलेप्रमाणें पटकन् चोरटें पहाणें यांत अर्धप्रेम नसून संपूर्ण प्रेम आहे असें समजावें.

१०९३ तिनें पाहिलें नि खालीं मान घातली; आम्हां दोघांच्या मनांत वाढणाऱ्या प्रेमरोपाला त्यामुळें पाणी मिळालें.

१०९४ मी तिच्याकडे बघतांच ती जमिनीकडे पाहूं लागते; परंतु मी दुसरीकडे पाहू लागतांच ती माझ्याकडे पाहून मंदस्मित करते.

१०९५ तिची दृष्टि मजकडे नाही असें वाटतें खरें; परंतु माझ्याकडे तिरप्या दृष्टीनें पहायचें तिच्या नुसतें मनांत येतांच ती अपरंपार आनंदते, हें तिच्या स्मितावरून माझ्या लक्षांत येतें.

१०९६ प्रिया नि प्रियकर, दोघांनी संतापलेल्या परक्या माणसाप्रमाणें बोलण्याचा आव आणला, तरी तें प्रेमाचें बोलणें आहे हें एका क्षणांत ओळखतां येतें.

१०९७ जे झिडकारण्याचें सोंग करतात; परंतु मनांतून जे खरोखर प्रेम करीत असतात, ते अर्धवट कानउघाडणीचें व रागावल्यासारखें बोलतात.

१०९८ माझी दीन मुद्रा पाहून त्या तन्वंगीचें हृदय द्रवलें, तिनें स्मित केलें, प्रेमळपणें पाहिलें, त्यामुळें तिचें सौन्दर्य अधिकच वाढलें.

१०९९ जे आपल्यावर प्रेम करतात, त्यांच्या दृष्टीत आपल्याविषयी अत्यन्त उदासीनता असते; जणूं मुळीच परिचय नाही असें ते डोळे दाखवूं इच्छितात.

११०० दृष्टि दृष्टीला जेव्हां संमति देते, तेव्हां वाणीचा कांही उपयोग नसतो.

## सर्ग १११ : एकता

### तो

११०१ या तरुणीच्या ठिकाणी सारे सुखानंद एकत्रित झाले आहेत. तिच्या हातांतील कंकणें कशी चमकत आहेत पहा.

११०२ ज्या कारणानें रोग होतो, त्याच्याहून भिन्न अशा गोष्टींत त्या रोगावरचा उपाय असतो; परंतु ही तरुणीच विव्हळ करते; नि सुखहि तीच देऊं शकेल.

११०३ प्रियेच्या कोमल बाहुपाशांत जी माधुरी आहे, तिच्याहून अधिक त्या सत्यलोकांत तरी आहे का ?

११०४ ती दूर असली म्हणजे जाळते, जवळ असली तर शान्त करते ! असला विचित्र अग्नि तिनें कोठें बरें मिळविला ?

११०५ माझ्या प्रियेची मोहकता कोण वर्णील ? तिनें केसांत फुलें घातलीं आहेत. ज्या ज्या आकाराची इच्छा करावी तो तो तिच्या ठायीं मला दिसतो.

११०६ त्या अल्लड प्रियेचे बाहू जणूं अमृताचे आहेत; कारण त्यांचा प्रत्येक स्पर्श मला नवजीवन देतो, माझ्या मृतवत् शरीरांत चैतन्य ओततो.

११०७ या सुंदरीचें आलिंगन अत्यन्त आनंददायक आहे. अतिथीला देऊन उरलेलें सेवन करणाऱ्या गृहस्थाश्रमी मनुष्यास जसा आनंद होतो, तसा तिच्या दृढालिंगनांत मला होतो.

११०८ वाऱ्यालाहि ज्या आलिंगनांत वाव नसतो, अशा दृढ आलिंगनांत परस्पर-ऐक्याचा आनंद भरलेला असतो.

११०९ प्रेमकलहांतील कपाळावरच्या आंठ्या, नंतर हृदय द्रवणें, आणि मग मिळणारें पुनरालिंगन, या अमृतमय गोष्टी प्रेमी युगुलच जाणे.

१११० मनुष्य अधिकाधिक विद्वान् होत असतां, स्वतःचें अधिकाधिक अज्ञान त्याला दिसूं लागतें; त्याप्रमाणें तिच्या संगतींत मी जितका जास्त रमतों, तितकें अधिकच तिचें प्रेम माझ्यावर जडतें.

## सर्ग ११२ : तिच्या सौंदर्याची स्तुति

### तो

११११ जाईच्या फुला, तूं सुकुमार नि कोमल आहेस; परंतु जिच्यावर माझें मन आहे, ती तुझ्याहूनहि कोमल आहे.

१११२ हे माझ्या हृदया, फुलें पाहून तूं दुःखी होतोस; कारण फुलें म्हणजे तिचे

१११३ तिचे बाहू कळकीप्रमाणें आहेत; तिचें शरीर नवपल्लवाप्रमाणें आहे; तिचें हास्य म्हणजे मोती; तिचा श्वास अति मधुर सुगंधानें भरलेला; आणि काजळ घातलेला तिचा डोळा म्हणजे जणूं भाला.

१११४ आकाशवर्णी कृष्णकमळाला तिच्या डोळ्यांची सर दाखवतां येत नाही म्हणून वाईट वाटतें नि तें सारखें खालीं मान घालतें.

१११५ तिनें फुलांनीं स्वतःला नटवलें आहे. परंतु देंठहि न काढलेल्या त्या फुलांचा भार सहन न होऊन तिची कमर वांकेल नि मोडेल.

१११६ चंद्र कोणता नि तिचें तोंड कोणतें तें न कळल्यामुळें आकाशांतील सारे तारे सारखे भटकत फिरत आहेत.

१११७ काल हा चंद्र पुरा नव्हता. आज त्यानें स्वतःला पूर्ण करून घेतलें असले तरी तोंडावरचा डाग कोठें जाणार? तिच्या तोंडावर आहे का असा डाग?

१११८ हे चंद्रा, या सुंदरीच्या मुखाप्रमाणें तूंहि शोभूं लागलास तर धन्य होशील; कारण मग मी तुझ्यावरहि प्रेम करीन.

१११९ चंद्रा, फुलाप्रमाणें डोळे असणाऱ्या तिच्या मुखाचें अनुकरण तुला करायचेंच असेल तर तू सर्वांसाठीं न प्रकाशतां फक्त माझ्यासाठीं प्रकाश.

११२० कोमळ फुलें नि हंसीचीं पिसें, हीसुद्धां तिच्या पायाला कांट्याप्रमाणे बोचतात.

## सर्ग ११३ : प्रेमाची महति

### तो

११२१ ती फार बोलत नाही. तिच्या ओठांचा रंग दूध नि मध यांच्या मिश्रणा-प्रमाणें आहे.

११२२ कुडी नि प्राण यांच्यांत जसें प्रेम असतें तसें तिच्यांत नि माझ्यांत आहे.

११२३ माझ्या डोळ्यांतील बाहुल्ये, तूं दूर हो नि मी जिच्यावर प्रेम करतों, तिच्या मूर्तीला तेथें जागा दे. कारण तिला राहायला योग्य असें दुसरें स्थान नाही.

११२४ ती जवळ असली म्हणजे मला जीवन मिळतें; ती दूर जातांच मरण वाटतें.

११२५ तिचे डोळे कसे मारक आहेत पहा. ती सुंदर आहे; तिचे गुण मी विसरलों तरी पुन्हां स्मरतो; ते कसे विसरूं तेंच कळत नाही.

## ती

११२६ तो माझ्या डोळ्यांतून जाणार नाहीं. मी डोळे मिटले तरी त्याला दुखापत होणार नाहीं. माझ्या प्रियकराचा आकारच असा अति सूक्ष्म आहे.

११२७ माझा प्रियकर सदैव माझ्या डोळ्यांत असतो. तो क्षणभर दूर होईल या भीतीनें मी डोळ्यांत काजळहि घालीत नाही.

११२८ माझा प्रियकर सदैव माझ्या हृदयांत असतो. तो भाजेल म्हणून कढत कढत अन्न मी खात नाही.

११२९ मी झोंपत नाही. कारण तो क्षणभरहि दूर जावा असें मला वाटत नाही. आणि म्हणून लोक त्याला निष्ठुर म्हणतात. ( त्यानें तिला सोडलें म्हणून ती झोंपत नाहीं असें लोकांना वाटतें. )

११३० प्रेमानें तो माझ्या हृदयांत राहतो. तेथून तो कधींहि दूर जात नाही. तरीहि गांवांतील लोक म्हणतात की, त्यानें मला टाकलें आहे, तो दुष्ट आहे.

### सर्ग ११४ : विनयातिक्रमण

## तो

११३१ प्रियजनांचा विरह ज्यांना सोसावा लागत आहे, विरहवन्हीनें जे जळत आहेत, त्यांनीं टोंकदार शिंदीच्या फांदीवर बसावें. दुसरें काय ?

११३२ शरीर नि मन दोघांना विरहवेदना सहन करवत नाहीत. शिंदीच्या अणकुचीदार टोंकावर बसायलाहि ती तयार होतील. सारी लाज त्यांनीं आतां सोडली आहे.

११३३ पूर्वीं मनाचा खंबीरपणा नि विनय दोन्ही गोष्टी माझ्याजवळ होत्या. परंतु प्रेमविव्हळ प्रियकर शिंदीच्या ज्या अणकुचीदार फांद्यांवर बसतो, त्याच फक्त आतां माझ्याजवळ आहेत.

११३४ दृढमति नि विनय यांचा तराफा तयार करून त्यावर विश्वसून मी होतों. परंतु वासनाविकारांचा एवढा प्रबळ लोंढा आला कीं सारें वाहून गेलें.

११३५ लहान कांकणें हातांत घालणारी, फुलाप्रमाणें कोमल अशा त्या सुंदरीनें या टोंकदार फांद्यावर बसायला मला भाग पाडलें. ती मला सायंकाळी मनस्ताप देते, चिंता देते.

११३६ त्या अल्लड सुंदरीचा विचार सारखा मनांत येतो नि मी बेचैन होतों. आतां रात्र झाली असली तरी या शिंदीच्या फांद्यांवर मी स्वार होईन.

११३७ मनांत कामसागर उसळत असतांहि जी तरुणी शिंदीच्या अणकुचीदार फांद्यांवर बसत नाहीं, तिच्या मनःसंयमाहून श्रेष्ठ असें या जगांत दुसरें काय आहे ?

## ती

११३८ माझ्या विनयाची शक्ति माझें प्रेम लक्षांतच घेत नाहीं. मी त्या प्रेमाला किती हळुवारपणानें वागवित असतें हें त्या प्रेमालाहि कळत नाहीं. मनांतील प्रेमविकार प्रकट होतो नि जगाला कळून येतोच.

११३९ आपली उपेक्षा होत आहे असें वाटून मनांतील प्रेम बाहेर पडतें नि तें रस्त्यांत स्वतःचें प्रदर्शन करतें.

११४० लोक मला हंसतात. ज्या वेदना मला सोसाव्या लागत आहेत, त्यांची त्यांना काय कल्पना ?

## सर्ग ११५ : किंवदन्ती

### तो

११४१ गांवांतील लोकांचीं बोलणीं ऐकून निघून गेलेले पंचप्राण पुन्हां माझ्या शरीरांत येत आहेत असें वाटतें. हें गुपित पुष्कळांना माहीत नाहीं हें माझें सुदैव होय.

११४२ फुलांप्रमाणें डोळे असणाऱ्या माझ्या प्रियेचे दुर्मिळ गुण गांवकऱ्यांना माहीत नाहींत ; म्हणून आमच्यासंबंधी हाकाटी करून त्यांनीं ती जणूं मला स्वस्तांत दिली.

११४३ गांवकऱ्यांची बोलणी मला अमोल वाटतात. कारण ती अजून मिळाली नसली तरी मिळाल्यासारखीच आहे असें आतां वाटतें.

११४४ लोकांच्या या कुजबुजीनें तिच्याविषयींचा माझा प्रेम-विकार अधिकच बळावला आहे. असें कांहीं नसतें झालें तर सारें प्रकरण शिळें नि नीरस झालें असतें.

११४५ मद्यपी पेल्यामागून पेले झोंकतो; त्याची तृष्णा कमी न होतां वाढते. त्याप्रमाणें प्रेम करणाऱ्याच्या मनांतील प्रेम जसजसें जगाला कळतें, तसतसें तें अधिकच वाढत जातें.

### ती

११४६ आम्ही एकच दिवस एकमेकांस भेटलों. परंतु ग्रहण लागतांच ज्याप्रमाणें गलबला माजतो, तसें आमच्या बाबतींत झालें आहे.

११४७ लोकांच्या बोलण्याचें खत मिळून, आईच्या कानउघाडणीचें पाणी मिळून आमच्या मनांतील प्रेमांकुर अधिकच फोंफावत आहे.

११४८ आरडाओरडीनें आमचें प्रेम मारूं पाहणें म्हणजे तुपानें वह्नि विझवूं पाहण्याप्रमाणें आहे.

११४९ 'भिऊं नको' असें आश्वासन देऊन त्यानेंच मला सोडलें. लोकांच्या निंदेचा त्यानें मला विषय केलें. आतां लोकांच्या कोल्हेकुईला भिऊन मी का लाजेनें मरून जाऊं?

११५० आमच्याविषयींची जी आवई उठावी म्हणून मला मनापासून वाटत होतें, ती गांवकऱ्यांनीं उठवलीच आहे. मी माझ्या प्रियकराजवळ आतां जें मागेन तें त्याला नाकारतां येणार नाहीं.

## *विभाग दुसरा*

### सर्ग ११६ : प्रेमपावित्र्य

### *ती : विरहवेदना*

११५१ आपला वियोग न व्हावा याविषयीं बोलत असाल तर बोला; परंतु लौकर परत येईन, वगैरे बोलायचें असेल तर त्या वेळेपर्यंत जें कोणी जिवंत राहणार असेल त्याच्याजवळ तें बोला.

११५२ त्यानें एकदां पाहिलें तरी मला पूर्वीं परमानंद होत असे; परंतु आतां त्याच्या आलिंगनानेंहि दुःख होतें; कारण तो लौकरच जाईल अशी आतां भीति वाटते.

११५३ ज्याला माझें मन माहीत आहे, त्याच्याहि मनांत मला सोडून जाण्याचा विचार लपून असावा हें पाहून कोणावरहि विश्वास ठेवणें अशक्य झालें आहे.

११५४ "आनंदी रहा" असें ज्यानें आपण होऊन मला सांगावें, त्यानेंच माझ्या जवळून दूर जाण्याचा विचार करावा; किती दुःखाची गोष्ट! त्याच्या गंभीरपणें दिलेल्या वचनावर मी विश्वास ठेवीत नाहीं म्हणून त्यानें कां म्हणून मला दोष द्यावा?

११५५ हे सखि, माझे प्राण रहावेत असें तुला वाटत असेल तर माझा प्राणसखा दूर जाऊं देऊं नकोस; कारण जर तो दूर गेला तर तो परत येईल त्या वेळेस त्याचें स्वागत करायला मी जिवंत असेन की नाहीं, शंका आहे.

११५६ मी निघून जाईन असें माझ्या तोंडावर सांगण्याइतकी निष्ठुरता ज्याच्याजवळ आहे, तो माझे प्राण रहावे म्हणून परत येईल अशी मला आशा नाहीं.

११५७ या घट्ट असणाऱ्या बांगड्या सैल झाल्या हें पाहून तरी निघून जाण्याचें जें भूत त्याच्या मनांत आलें आहे तें निघून नाहीं का जाणार ?

११५८ जिवाचे जिवलग जेथें नाहींत तेथें जगणें म्हणजे दुःखद होय; परंतु प्रियकरापासून वियुक्त होणें हें त्याहूनहि दुःखद आहे.

११५९ अग्नीचा स्पर्श होईल तेव्हांच तो भाजतो. परंतु प्रीति दूर असली म्हणजेच फार दाह करते.

११६० निरोप देण्याचें व वियोगाचें दुःख सोसूनहि प्रियकराच्या पुनरागमनापर्यंत जीव धरून राहिल्याचीं उदाहरणें नसतील का ?

## सर्ग ११७ : विरह-शोक; झुरून जाणें

### ती

११६१ झऱ्याचें पाणी किती भरलें तरी तें पुनः पुन्हां उफाळून येतें; त्याप्रमाणें मी माझें दुःख कितीहि आंत दाबून ठेवलें तरी तें पुनः पुन्हां तरारून बाहेर पडतें.

११६२ दुःख लपवणें आतां माझ्या शक्तीबाहेरचें आहे; परंतु तें दुःख इतरांसमोर राहोच; परंतु ज्यानें तें दिलें त्याच्यासमोरहि आपण होऊन प्रकट करण्याची मला लाज वाटते.

११६३ माझ्या जीवनाच्या एका टोंकाला प्रेम आहे आणि दुसऱ्या टोंकाला

विनय आहे. या दोहोंच्या ओझ्याखालीं माझें हें दुबळें शरीर मात्र चिरडलें जात आहे.

११६४ प्रियकराविषयींच्या प्रेमाचा सागर उसळून राहिला आहे. परंतु तो तरून जायला विश्वसनीय नौका माझ्याजवळ नाहीं.

११६५ मित्रसुद्धां जर एखाद्याला झुरत असतां पाहूं शकतात, तर शत्रू काय करणार नाहींत?

११६६ प्रेमजन्य आनंद सागराप्रमाणें असतो; परंतु प्रेम दग्ध करूं लागलें म्हणजे होणाऱ्या वेदना त्या आनंदाहूनहि खोल नि अनन्त असतात.

११६७ प्रेमाच्या प्रक्षुब्ध सागरांत मी पोहत आहें; परंतु मला किनारा कोठेंच दिसत नाहीं; मध्यरात्रीं मी अगदीं एकटी असतें; माझें सांत्वन करायला चिटपांखरूहि जवळ नसतें.

११६८ कृपाळू रात्र येते नि प्राणिमात्राला झोंपविते. परंतु त्या रात्रीला मात्र माझ्याशिवाय कोणाचीच सोबत नसते.

११६९ त्या निर्दय प्रियकरापेक्षांहि हळुहळु जाणारी ही रात्र अधिकच निर्दय वाटत आहे.

११७० तो जेथें आहे, तेथें माझें हृदय धांवतें; डोळ्यांनाहि अशी धांव घेतां येती तर त्यांना अश्रुसागरांत पोहावें लागलें नसतें.

## सर्ग ११८ : उत्कंठेनें वाट पाहून डोळे निस्तेज होणें

### ती

११७१ हे डोळे आज कां बरे कुरकुर करित आहेत? यांनींच तो प्रियकर मला प्रथम दाखविला आणि न शांत होणारें दुःख त्यांनीं माझ्या नशिबीं आणलें.

११७२ कांहीं एक विचार न करतां या डोळ्यांनीं प्रियकराला प्रथम उतावीळपणानें पाहिलें. त्या मूर्खपणाचे परिणाम आतां मुकाट्यानें सोसायचे सोडून ते रडतात कशाला ?

११७३ त्या दिवशीं या डोळ्यांनीं आपण होऊन त्यांच्याकडे पोट भरून पाहिलें. आणि आज तेच रडत आहेत ! असें करून ते स्वतःला हास्यास्पद मात्र करून घेत आहेत.

११७४ माझे डोळे आंत कोरडे आहेत. अश्रूंचा सांठा संपला; परंतु अपरिहार्य शोकाची पुंजी शिल्लक आहे.

११७५ समुद्राहूनहि अपार असें दुःख नि मनस्ताप मला देऊन हे डोळे आतां स्वतःच दुःखानें झुरत आहेत; ते झोंपूं शकत नाहीत.

११७६ ज्या डोळ्यांनीं मला रडवलें, तेच आतां स्वतः रडत आहेत. सूड उगवला गेला असें मनांत वाटलें.

११७७ त्या दिवशीं प्रेमार्त होऊन बुभुक्षिताप्रमाणें या डोळ्यांनीं त्याच्याकडे टक लावून पाहिलें; त्याच्या रमणीय मूर्तीवर ते लुब्ध झाले होते. आतां म्हणावें रडा, झुरून मरा.

११७८ आपणांला प्रेम मिळालें नाहीं तरीहि प्रेम करणारे या जगांत असतात. तो दिसत नसल्यामुळें ज्यांना विश्रांति माहित नाहीं, ते माझे डोळे बघा.

११७९ तो दूर असला म्हणजे डोळ्यांना झोंप माहीत नसते; तो जवळ असला म्हणजेहि ते मिटत नाहींत. अखंड दुःखच त्यांच्या नशिबीं आहे.

११८० माणसाचे डोळेच जेव्हां सारें जाहार करूं लागतात, तेव्हां गुप्त गोष्ट लोकांना कळल्याशिवाय कशी राहील ? माझे डोळे हेंच करित आहेत.

## सर्ग ११९ : विरही प्रेमामुळें आलेली पांडुरता

### ती

११८१ प्रियकराला जायला मीच होऊन शेवटीं संमति दिली; आतां या माझ्या पांडुरतेबद्दल मी कोणाशीं तक्रार करूं ?

११८२ ही पांडुरता त्याचे अपत्य आहे आणि म्हणून त्याचा मला अभिमान वाटतो. ही पांडुरता माझ्या सर्व शरीरावर पसरली आहे.

११८३ माझें सौंदर्य नि माझी लज्जा तो घेऊन गेला; आणि त्याचा मोबदला म्हणून दुसरें कांहीं नाहीं तर निदान मनोव्यथा नि हा फिक्कटपणा देऊन गेला.

११८४ माझ्या मनांत दुसरें तिसरें कांहीं एक नसून त्याचेच विचार सारखे असतात; माझी वाचाहि इतर कांही न बोलतां त्याचीच स्तुति करीत असते; तरीहि ही पांडुरता माझ्या शरीरावर कां बरें ? काय आहे ही जादुगिरी ?

११८५ त्या दिवशींहि तो असाच तिकडे गेला आणि ही पांडुरता माझ्याकडे आली.

११८६ दिव्याच्या विझण्याची अधार वाट पहात असतो; त्याप्रमाणें आमची ताटातूट केव्हां होते, याची ही पांडुरता वाट पहात असते.

११८७ मी त्याच्या आलिंगनांत होतें; मी त्याला दूर केले मात्र तों दुसऱ्याच क्षणीं या पांडुरतेनें मला ग्रासिलें.

११८८ लोक मेले मला म्हणतात, " कीं पहा कशी भुतासारखी पांढरी फटफटीत झाली आहे ! " परंतु तो सोडून गेला म्हणून त्याला मात्र कोणी बोलत नाहीं

११८९ हे सखि, तूं त्याचीच बाजू घेणार नि त्याला निरपराधी ठरविणार? मी पांढरी फटफटीत झाल्यें आहे याचें तुला काय सुखदुःख?

११९० माझ्या प्रियकराला दुष्ट म्हणून ते नांवें ठेवणार नसतील, तर माझें हें शरीर कितीहि कृश नि फिक्कट झालें तरी मी आनंदच मानीन. (एकदम वृत्तींत बदल होऊन ती शेवटीं म्हणते.)

## सर्ग १२० : पतीला एकरूपता वाटत नाहीं म्हणून हृदयवेदना

### ती

११९१ आपण ज्यांच्यावर प्रेम करतों ते आपणांवरहि करतात, असा अनुभव ज्यांना येतो, तेच अति मधुर असा प्रेमानन्द चाखतात.

११९२ जगाला ज्याप्रमाणें पाऊस, त्याप्रमाणें प्रेम करणाऱ्या स्त्रीला प्रियकराची कोमलता.

११९३ आपण ज्याच्यावर प्रेम करतों, तो आपणांवरहि करीत आहे असें ज्यांना निःशंक वाटत असेल, त्यांनींच सुखाची प्रौढी मिरवावी.

११९४ इतरांनीं प्रेम केलें तर त्याला काय अर्थ आहे? स्त्रिया ज्याच्यावर प्रेम करतात, त्याचें जर प्रेम त्यांना मिळालें नाहीं तर त्यांना या जगांत सुख नाहीं.

११९५ मी माझ्या प्रियकरावर प्रेम करतें, त्याप्रमाणें जर तो माझ्यावर करीत नसेल तर त्याच्याजवळून कोणती वस्तु मागण्याची मला आशा असणार?

११९६ पाण्याची कावड असते त्याप्रमाणें प्रेम जर दुतर्फी असेल तरच त्यांत आनंद आहे; एकतर्फी प्रेम म्हणजे दुःख नि निराशा.

११९७ हा कामदेव फक्त मलाच पीडा देतो; माझीं दुःखें बघायला त्याला डोळे नाहींत म्हणून का तो असें करतो?

११९८ प्रियकराकडून प्रेमाचा संदेश न मिळाला तरीहि ज्या स्त्रिया आशेनें जीवन कढूं शकतात, त्यांच्याप्रमाणें आशावान् नि धैर्यवान् त्याच; जगांत त्यांची सर दुसऱ्यांना येणार नाहीं.

११९९ प्रियकर अनुदार असला तरीहि त्याच्याकडून दोन शब्द आले तरी ते कानांना किती गोड वाटतात !

१२०० हे हृदया, जो तुझ्यावर प्रेम करित नाहीं, त्याला स्वतःचें दुःख सांगायला कां इच्छितोस ? समुद्राला रिकामें करण्याप्रमाणें हें अशक्य आहे. वेडें आहे हें माझें हृदय.

## सर्ग १२१ : दूर असलेल्या प्रियेसाठीं सुसकारे

### तो

१२०१ केवळ स्मरणानेंहि प्रेम अनन्त आनंद देतें, अति मधुर वाटतें. प्रेम हे मदिरेपेक्षांहि मधुर आहे.

१२०२ प्रियेची मूर्ति अंतश्चक्षूंसमोर आणतांच माझें दुःख शमतें; खरोखरच प्रेम हें सर्वतोपरी आनंददायी असतें.

### ती

१२०३ शिंक येणार होती, परंतु गेली; तो बहुधा माझी आठवण काढणार होता, परंतु काढली नसावी.

१२०४ माझ्या हृदयांत तो कायमचा आहे; परंतु त्याच्या हृदयांत मला स्थान आहे का ?

१२०५ तो असूयेनें, ईर्षेनें स्वतःच्या हृदयांतून मला दूर करतो; मग माझ्या हृदयांत आपलें रूप सदैव दाखवायला त्याला लाज कशी वाटत नाहीं ?

१२०६ आमच्या मीलनाची स्मृति मला जिवंत ठेवित आहे; माझ्या जीवनाला अन्य आधार नाहीं. ( सखी म्हणते, त्याचें स्मरणच करूं नको: त्याला हें उत्तर आहे. )

१२०७ माझ्या स्मृतींत तो भरून राहिला आहे तरीहि तो मला दग्ध करीत आहे; मग मी जर त्याला विसरेन तर तो माझी काय दशा करील ?

१२०८ माझ्या प्रियकराला मी मनांत सारखें आठवित बसलें तरी त्याला राग येत नाहीं. त्याची किती ही कृपा माझ्यावर !

१२०९ "आपण दोन नसून एक आहोंत" असें म्हणणाऱ्या त्या प्रियकराच्या निष्ठुरपणाचा जेव्हां मी विचार करूं लागतें, तेव्हां माझें जीवनच खरोखर समाप्त होतें.

१२१० माझ्या हृदयांत सतत असूनाहि तो दूर गेला आहे; तो पुनः मांझ्या दृष्टीस पडेपर्यंत, हे चंद्रा, तूं उगवूं नकोस.

## सर्ग १२२ : स्वप्नास्थितीची स्तुति

### ती

१२११ प्रियकराचा संदेश घेऊन येणाऱ्या या स्वप्नाला मी कोणतें बक्षिस देऊं ?

१२१२ डोळ्यांना जर झोंपण्याविषयीं वळवतां आलें तर स्वप्नांत मी एकदम प्रियकराकडे उडून जाईन नि अजून मी जिवंत कशी राहिलें याची सारी कहाणी सांगेन.

१२१३ जागेपणीं तो दिसत नसला तरी स्वप्नांत मी त्याला पाहूं शकतें; आणि म्हणून तर हे प्राण अजून राहिले आहेत.

१२१४ स्वप्नांत मी सारें प्रेमसुख अनुभवितें; जागृतींत दया दाखवायला तयार नसलेल्या त्या प्रियकराला माझें स्वप्न खेंचून घेऊन येतें.

१२१५ स्वप्नसृष्टीत प्रियकर दृष्टीसमोर असेपर्यंत सारें आनंदमय असतें; मग जागृतींत जर तो जवळ असेल तर त्या आनंदाचें वर्णन कसें करता येईल ?

१२१६ ही जागृतावस्था नसतीच तर ? कारण मग माझें स्वप्न भंगलें नसतें नि माझा प्रियकर माझ्याजवळून गेला नसता.

१२१७ मी जागी असतां जो माझ्यावर दया करीत नाहीं, तो निष्ठुर स्वप्नांत तरी कां बरें सारखा सारखा येतो ?

१२१८ मी झोंपेंत असतांना तो मला मिठी मारतो; परंतु जागी होतांच तो चटकन माझ्या हृदयांत शिरतो.

१२१९ माझा प्रियकर मला भेटतो हें त्यांना माहीत नाहीं; म्हणून त्याला निष्ठुर निष्ठुर असें ते म्हणतात. परंतु माझ्या स्वप्नांत तो मला येऊन भेटतो, हें त्यांना कसें दिसणार ?

१२२० तो मला सोडून गेला, असें हे सारे म्हणतात. तो स्वप्नांत मला भेटतो हें त्यांना माहीत नाहीं, म्हणून ते असें म्हणत असतील; नाहीं ?

## सर्ग १२३ : तिन्हींसांजा झाल्यावर सुसकारे

### ती

१२२१ हे सायंसंध्ये, हे देवि, तुला नमस्कार असो ! परंतु तुला सायंदेवी कोण म्हणेल ? विवाहितांचें जीवन खाणारी तूं राक्षशीग आहेस.

१२२२ हे सायंसंध्ये, तूंहि खिन्न नि पांडुर दिसत आहेस; गडे, तुझा वल्लभहि माझ्या वल्लभाप्रमाणेंच निर्दय आहे का ?

१२२३ दंवबिंदूंनीं न्हालेली ही सायंसंध्या पूर्वीं भीत भीत, कांपत कांपत माझ्यासमोर येत असे; परंतु आतां घट्टपणें पुढें येते नि माझ्या हृदयांत दुःखनिराशांचें साम्राज्य पसरते.

१२२४ फांशीच्या जागेकडे मांग जातो, त्याप्रमाणें प्रियकर दूर असला म्हणजे ही सायंसंध्या माझ्याकडे येते.

१२२५ मी प्रात:संध्येवर काय एवढे उपकार केले आहेत नि या सायंसंध्येचें काय एवढें घोडें मारलें आहे ?

१२२६ प्रियकर जोंपर्यंत जवळ होता, तोंपर्यंत सायंसंध्येची, खरेंच सांगतें, नांगी मी कधींच अनुभवली नाहीं.

१२२७ हें विरहदु:ख प्रात:काळीं कळीप्रमाणें असतें; हळुहळु तें एकेक पाकळी उघडून सायंकाळ झाल्यावर संपूर्णपणें फुलतें.

१२२८ गुराख्याची बांसरी गोड असते असें म्हणतात. परंतु मला मारणारें तें तीक्ष्ण हत्यार आहे; कारण सायंकाळ झाली, असें ती बांसरी घोषवीत असते.

१२२९ या सायंकाळनें मला वेडें केलें आहे; सायंकाळ अशीच लांबेल तर हा सारा गांव दु:खांत बुडेल ( कारण मी मरेन ).

१२३० माझा प्रियकर धनासाठीं दूर गेला आहे; ही सायंसंध्या त्याची मला आठवण करून देते नि अशानें जें कांहीं थोडेंसें जीवन शिलक राहिलें आहे तेंहि कदाचित् लौकर समाप्त होईल.

## सर्ग १२४ : सुंदर शरीराची कृशता

### ती

१२३१ तुझें सुख वाढवण्यासाठीच मी जात आहें, असें म्हणून तो गेला. हे डोळे सारखा त्याचा विचार करीत असतात. फुलांसमोर जायला त्यांना आतां लाज वाटते.

१२३२ माझ्या ह्या निस्तेज डोळ्यांतून सारखे अश्रु गळत आहेत. प्रियकराचा निष्ठुरपणा ते उघड करतील कीं काय ?

१२३३ विवाहाच्या प्रसंगीं जे बाहु आनंदानें फुगले होते, तेच आज त्याचें सोडून जाणें जगाला जाहीर करतील अशी भीति वाटते.

१२३४ प्रियकराच्या विरहानें ज्यांचें सौंदर्य आधीच नाहीसें झालें होतें, ते माझे बाहु आतां इतके कृश झाले आहेत कीं हीं कांकणें गळून पडतात.

१२३५ या हातांनी आपली रमणीयताहि गमावली नि कांकणेंहि गमावलीं. त्या निष्ठुराची निष्ठुरता हे जगाला जाहीर करीत आहेत.

१२३६ मी माझ्या बाहूंना कृश होण्याबद्दल, कांकणें गळूं देण्याबद्दल रागें भरते; कारण लोक त्याला निर्दय म्हणून नांवें ठेवतात.

१२३७ हे हृदया, तुला शाबासकी हवी आहे का? तर मग त्या कठोराकडे जा; आणि माझ्या बाहूंच्या कृशत्वामुळें गांवांत कोण बोभाटा माजला आहे, तें त्याच्या कानांवर घाल.

*तो*

१२३८ एक दिवस आम्ही एकमेकांस आलिंगन देत होतों. मी माझे बाहु जरा ढिले करतांच त्या मुग्धेचा भालप्रदेश पांढरा फटफटीत झाला.

१२३९ आमच्या दृढालिंगनांत श्वासोच्छ्वासाचा जरासा वारा शिरतांच वर्षाकालीन मेघाप्रमाणें काळेभोर असणाऱ्या तिच्या डोळ्यांतील तेज नि अनुराग निघून जात.

१२४० डोळे तोंडावरील पांडुरता पाहून निस्तेजच नसत होत; तर रडूं लागत

## सर्ग १२५ : हृदयाला उद्देशून

*ती*

१२४१ हृदया, माझा न बरा होणारा हा जो रोग, त्याच्यावर तूं उपाय नाहीं का शोधून काढणार? नाहीं का मला तो सांगणार?

१२४२ हे हृदया, शान्त रहा. त्याला जर तुझ्याविषयीं प्रेम नाहीं, तर तूं त्याच्यासाठीं वेड्याप्रमाणें कां रडतोस ?

१२४३ हे हृदया, येथें बसून त्याला आठवून झुरण्यांत काय अर्थ ? ज्यानें आपणांस दुःख दिलें, त्याला आपली आठवणहि नाहीं.

१२४४ हे मना, तूं त्याच्याकडे जाणार असलास, तर हे डोळेहि जा ना बरोबर घेऊन; त्याला पाहण्याची त्यांना फार उत्कंठा लागली आहे. मला ते भंडावून सोडतात.

१२४५ आपण जरी त्याला चिकटून राहिलों, तरी तो आपणांस लाथाडतो; हे हृदया, त्याला शत्रु समजून आपण टाकूं शकूं का ?

१२४६ हे हृदया, तो प्रियकर लाडीगोडी करण्यांत मोठा चतुर आहे; त्याला पाहतांच, सारी रात्र विसरून, सारी धुसफुस बाजूला ठेवून तूं त्याच्या बाहुपाशांत घुसशील. आतांचा तुझा हा सारा राग वरपांगी आहे, अशी मला शंका येते.

१२४७ मना, प्रेम तरी सोड किंवा लाज तरी सोड. एकाच वेळीं दोन्ही मला सहन नाहीं होत, बाबा.

१२४८ मनांत करुणा येऊन तो तुझ्याकडे कांहीं येत नाहीं. मना, तरी तूं सुसकारे सोडीत बसतोस. तो मुद्दाम तुला सोडून गेला तरीहि त्याचा शोध करायला तूं उत्सुक आहेस. खरेंच, स्वाभिमान ही वस्तुच तुला माहीत नाहीं.

१२४९ हे हृदया, तो प्रियकर तुझ्यामध्येंच वस्ती करून राहिला आहे, हें तुला माहीत आहे. आतां तू कोणाला भेटूं इच्छितोस ?

१२५० जो सोडून गेला त्याला हृदयांत खेळवणें म्हणजे आणखी कृश होणें होय.

## सर्ग १२६ : मनाचा तोल नि संयम ढांसळण्याची भीति

*ती*

१२५१ विनयाच्या अडसरानें दरवाजा जरी बंद केलेला असला तरी प्रबळ प्रेमाच्या कुऱ्हाडीसमोर त्याचें कांहीं एक चालणार नाहीं.

१२५२ प्रेम ही एक निर्दय वस्तु आहे; मध्यरात्रींहि तें माझ्या हृदयाला जाळीत असतें.

१२५३ मी माझ्या प्रेमाला हृदय-पंजरांत कोंडूं इच्छितें; परंतु एकदम येणाऱ्या शिंकेप्रमाणें तें आगाऊ सूचना न देतां प्रकट होतें.

१२५४ माझें वर्तन मर्यादाशील, विनयशील होतें, असा मला अभिमान होता; परंतु काय करूं? सारे पडदे दूर फेंकून हें प्रेम जगासमोर उघड होत आहे.

१२५५ कठोरपणानें जो सोडून गेला, त्याच्या शोधास न जाण्याचा स्वाभिमान प्रेमवेड्या सुंदरीजवळ कोठून असणार?

१२५६ हे दुःखा, तुझें माझ्यावर फार प्रेम आहे एकूण; ज्यानें निर्दयपणानें माझा त्याग केला, त्याच्याच पाठोपाठ जायला तूं मला लावित आहेस.

१२५७ प्रियकरानें पुन्हां प्रेमकृपा करतांच, आपण साऱ्या अढ्या एकदम विसरून जातों.

१२५८ नाना प्रकारच्या धूर्त गोष्टी करण्यांत तो हुशार आहे; नारीजनोचित विनयाला सोडायला जर मला कोणी भाग पाडीत असेल, तर ती त्याची संयमी वाणी.

१२५९ मला रागावून रुसून दूर व्हायचें होतें. परंतु मी जाऊन त्याला मिठी मारली; कारण माझें हृदय आधींच त्याला जाऊन भेटलेलें मला दिसलें.

१२६० विस्तवांत चरबी वितळते, त्याप्रमाणें ज्यांचीं हृदयें वितळतात, ते एकमेकांपासून भांडून दूर राहण्याचें स्वप्नांत तरी मनांत आणतील का ?

## सर्ग १२७ : प्रेमी जीवांची भेटण्यासाठीं ओढ

### ती

१२६१ माझ्या डोळ्यांतील तेज लोपून ते मंद झाले. भिंतीवर खुणा केलेले दिवस रोज मोजून मोजून ही माझीं बोटें झिजून गेलीं.

१२६२ सखि, त्याला आतां मी विसरलें म्हणून काय झालें ? माझें सौन्दर्य मला आधीच सोडून गेलें आहे आणि ही कांकणेंहि गळून पडलीं आहेत.

१२६३ तो परत यावा या इच्छेनें मी जर जिवंत राहिलें, तरच विजयेच्छेनें मला सोडून जाणाऱ्या त्याचा विजय.

१२६४ माझ्या भावना मातीमोल समजून मला सोडून तो गेला; परंतु तो लौकरच परत येईल, या विचारानेंसुद्धां माझें हृदय थै थै नाचूं लागतें.

१२६५ हे डोळे एकदां त्याला पुन्हां पोटभर पाहूं देत; लगेच या माझ्या कृश बाहूंवरील पांडुरता पळून जाईल.

१२६६ प्रियकराला घरीं येऊं दे; लगेच त्याचें दर्शनामृत सेवून हा शरीरमारक विरहरोग मी नष्ट करीन.

१२६७ माझ्या या डोळ्यांप्रमाणें मला प्रिय असणारा तो प्रियकर घरीं येतांच, तो फार दिवस दूर राहिला म्हणून मी रुसेन, रागावेन कीं त्याला मिठी मारीन ? कीं हे सारे प्रकार करीन ?

### तो

१२६८ लढाई आतां एकदम सुरू होऊं दे नि राजाला जय मिळूं दे. मला लौकर सायंकाळीं घरीं जाऊं दे नि प्रियेसह आनंदभोजन करूं दे.

१२६९ ज्या दिवस मोजीत असतात, प्रियकर कधीं परत येईल म्हणून झुरत असतात, त्यांना एकेक दिवस युगासारखा वाटतो.

१२७० मी जाऊन भेटण्यापूर्वीच प्रियेचें हृदय जर दुभंगून गेलें असेल, तर मी जाऊन काय उपयोग ?

## सर्ग १२८ : अप्रकट विचार समजणें

### तो

१२७१ प्रिये, तूं कितीहि स्वतःचे विचार छपवण्याचा प्रयत्न केलास तरी या डोळ्यांवर तुझी सत्ता दिसत नाहीं; तुझ्या हृदयांत कांहीं तरी चमत्कारिक विचार आहेत ही गोष्ट तुझे डोळे मला सांगत आहेत.

१२७२ (ती बोलत नाहीं, तो तिला उद्देशून म्हणतो) जिचें सौंदर्य माझ्या डोळ्यांत भरून राहिलें आहे, जिचे बाहू कळकीप्रमाणें सरळ नि बारीक आहेत, अशा ह्या मुग्धेच्या ठिकाणीं स्त्रियांना न शोभण्याइतका मनाचा कुढेपणा कां ?

१२७३ स्फटिकाच्या मण्यामधून धागा दिसतो, त्याप्रमाणें तिच्या हृदयांतील विचार मला स्पष्टपणें दिसत आहेत. (पति पुन्हां जाईल कीं काय असा विचार.)

१२७४ कळींत अप्रकट सुगंध सांठवलेला असतो, त्याप्रमाणें या मुग्धेच्या अर्ध-स्मितांत अर्थ भरून राहिला आहे.

१२७५ ज्या चतुराईनें मनांतील विचार तिनें लपविले, त्याच चतुराईनें प्रकट केले. तें सारें पाहून माझ्या मनाची चिंता दूर झाली.

### ती

१२७६ तो फार कोंवळ्या मनाचा नि गोड स्वभावाचा आहे. त्याच्या मनांत

कांहीं तरी आहे; परंतु तें त्याला लपवतां येत नव्हतें. तो पुन्हां सोडून जाईल कीं काय ?

१२७७ त्याचा निष्ठुरपणा मला कळला त्यापेक्षां किती तरी आधीं हातांतील या कंकणांना कळला.

१२७८ प्रियकर काल गेला; परंतु शरीराची टवटवी आठवड्यापूर्वींच सोडून गेली आहे.

१२७९ (प्रियेची सखी प्रियकराला एकट्यालाच म्हणते) तिनें स्वतःच्या कंकणांकडे पाहिलें नि आपल्या कृश व कोमल बाहूंकडे पाहिलें; नंतर आपल्या पायांकडे पाहिलें.

१२८० (तो सखीला म्हणतो) तिनें मला विरहदुःखें निवेदिली. तुम्ही पुन्हां जाणार असाल तर मलाहि बरोबर न्या असें तिनें प्रार्थिलें. परंतु हें सारें शब्दांनीं न सांगतां तिनें आपल्या डोळ्यांनीं सांगून विनयाचे बाबतींत साऱ्या स्त्रियांना लाजविलें.

## सर्ग १२९: मीलनोत्कंठा

### ती

१२८१ मनांत नुसता विचार येतांच अपार आनंद होणें, दर्शन होतांच सुखसागर उसळणें, या गोष्टी मदिरेंत नाहींत; या फक्त प्रेमांतच असूं शकतात.

१२८२ विरहानें शिंदीच्या अणकुचीदार टोकांवर बसण्याहूनहि अधिक विव्हळ होत असलें तरीहि त्याच्यावर थोडेंसुद्धां रागावण्याची मनांत इच्छा नाहीं.

१२८३ त्याला जरी माझी पर्वा नसली व तो वाटेल तसें वर्तन करीत असला, तरी त्याला पाहिल्याशिवाय माझ्या डोळ्यांचें समाधान होणार नाहीं.

१२८४ सखि, खरोखरच मला त्याच्यावर रागवावयाचें होतें. परंतु हृदयाला या

१२८५ शलाकेनें डोळ्यांत अंजन घालीत असतांना, शलाकेचें अंजन ज्याप्रमाणें डोळ्यांना दिसत नाहीं, त्याप्रमाणें प्रियकर जवळ असला म्हणजे त्याचे दोष मला दिसत नाहींत.

१२८६ तो समोर असला म्हणजे तो निर्दोष वाटतो; दूर गेला म्हणजे तो केवळ दोषमूर्ति दिसतो.

१२८७ प्रवाहांत वाहून नेणारा एक अंतःप्रवाह आहे, हें माहीत असतांना त्यांत कोण उडी घेईल ? तो जवळ असल्यावर माझा राग उरत नाहीं हें जर मला माहीत आहे, तर त्याच्यावर उगाच कशाला राग करूं ?

१२८८ लाजेनें खालीं मान घालायला लावीत असली तरी मदिरा पाहून मद्यप्याला दुःख कां होतें ? त्याप्रमाणें, हे लबाडा, तुझें हृदय मला आहे.

### ती

१२८९ फुलाहूनहि प्रेम सुकुमार आहे. फारच थोड्यांना हें समजतें नि तद्नुरूप ते वागतात. ( ती कोमलता तुला समजत नाहीं, म्हणून तूं रागावून मला व्यथित करतेस हा भाव )

१२९० जेव्हां तिनें मला पाहिलें, तेव्हां तिच्या डोळ्यांत राग होता. परंतु मी जवळ जातांच मी तिच्या बाहुपाशांत जाण्याऐवजीं तीच त्वरेनें माझ्या बाहूंत घुसली.

## सर्ग १३० : हृदयाची कानउघाडणी

### ती

१२९१ त्याचें हृदय त्याच्या इच्छेप्रमाणें कसें वागतें, हें तूं बघतोस; मग माझ्या हृदया, तूंहि माझें कां रे ऐकत नाहींस ?

१२९२ हे हृदया, तो माझी कशी उपेक्षा करतो, तें तूं पाहतोस. तरीहि त्याला मित्र समजूनच तूं त्याच्याकडे जातोस.

१२९३ हे हृदया, तूं आपल्या गोड इच्छेनें नि आनंदानें त्याच्या पाठोपाठ जातोस. जे दुर्दैवी असतात त्यांना मित्र नसतात, हेंच तूं मला शिकवीत आहेस; होय ना ? ( कारण तूंहि माझ्या सोबतीला रहात नाहींस. )

१२९४ त्याच्या संगतींत आनंद होतो हें न दाखवतां प्रेमकलहांत सामील होण्याची, हे मना, तुझी इच्छा नाहीं; ठीक. असल्या गोष्टींत मी पुनश्च तुला विश्वासांत घेणार नाहीं.

१२९५ त्याची भेट होणार नाहीं म्हणून आधी झुरतें; भेटल्यावर पुन्हां वियोग होईल या विचारानें मी झुरतें; माझ्या हृदयवेदनांना अन्त नाहीं.

१२९६ माझ्या हृदयाचा मला उपयोग तरी काय ? मी एकटी विचार करीत बसतें तेव्हां माझें हृदय मलाच खाऊं लागतें.

१२९७ त्याची आठवण विसरून आपला स्वाभिमान सांभाळणें, ही गोष्ट या हृदयाला माहीतच नाहीं. अशा या हृदयाच्या संगतींत राहून मीहि माझी धीरता गमावून बसलें आहें.

१२९८ ज्याच्यावर आपण प्रेम केलें, त्याची बाजू कमी ठरूं नये असें या हृदयाला वाटतें; म्हणून तें नेहमीं त्याची बाजू घेतें.

## तो

१२९९ दुःखी मनुष्याला त्याच्या दुःखांत कोण बरें आधार देईल ? प्रियेचें हृदय जर धांवून येणार नसेल तर दुसरें कोण आहे ?

१३०० माझें हृदयच जर माझी बाजू घेत नसेल, तर दुसऱ्यांना माझी पर्वा वाटत नाहीं यांत काय आश्चर्य ? ( दुसरे म्हणजे प्रिया )

## सर्ग १३१ : प्रेमकलह

१३०१ ( सखी प्रियेला ) गडे, त्याला आलिंगन नको देऊंस. रागावल्याप्रमाणें कर. मग त्याची कशी दर्दशा होते ती बघ. जरा गंमत तरी कर.

१३०२ प्रेमकलह म्हणजे प्रीतीचें सर्वस्व आहे; प्रीतीतील तें मीठ आहे. परंतु हा कलह फार लांबविणें म्हणजे अन्नांत अधिक मीठ घातल्याप्रमाणें होईल.

१३०३ (पत्नी मत्सरानें पतीला) जिला तूं रुसवून आला आहेस, तिला आलिंगन दिल्याशिवाय येशील, तर आधींच जखमी झालेल्याला अधिक जखमी करण्याप्रमाणें आहे.

१३०४ जी रागानें आंठ्या घालून बसली आहे, तिची समजूत न घालतां येणें म्हणजे वाळत जाणाऱ्या रोपट्याचीं मुळेंहि कापून टाकण्याप्रमाणें आहे.

१३०५ (पति मनांतच) जे लोक अत्यन्त निर्दोष असतात, अशांनाहि प्रियेबरोबर प्रेमकलह करण्यांत एक प्रकारची मोहक मधुर आकर्षकता वाटते.

१३०६ प्रिया कधींच रुसणार नसेल, कपाळाला आंठ्या घालणार नसेल, तर प्रेमाचीं मधुर फळें मिळणार नाहींत; त्यांची अर्धी गोडी निघून जाईल.

१३०७ प्रेमकलहांत एक प्रकारचें दुःख असतें. प्रत्येक क्षणीं आपण मनांत म्हणत असतों, आमची लौकर गोडी होईल कीं अजून बराच वेळ लागेल ?

१३०८ (पति स्वतःशींच परंतु पत्नीला ऐकूं जाईल अशा रीतीनें) मी किती दुःखी आहें, हें पहायला जर प्रिया जवळ नसेल तर या दुःखाचा काय उपयोग ?

१३०९ थंडगार बागेंत पाणी सुंदर दिसतें; त्याप्रमाणें अत्यन्त प्रेम करणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणींच राग शोभून दिसतो.

१३१० जी माझें सांत्वन करीत नाहीं, तिच्यासाठी माझें हृदय जर अजून झुरत असेल, तर केवळ मूर्खपणाच्या इच्छेचें हें फळ आहे.

## सर्ग १३२ : प्रेमकलहांतील सूक्ष्मता

### ती

१३११ हे लबाडा, हे नारीप्रिया, जेवढ्या म्हणून स्त्रिया आहेत, त्या साऱ्या

आपल्या डोळ्यांनीं तुला जणूं खाऊनापिऊन टाकतात; मला नको आ तुझें आलिंगनफिलीगन.

१३१२ मी रागावलेली होतें नि नेमकी त्याच वेळेस शिंक आली. "माझ्या प्रियाला शतायुषी कर" असें मी म्हणेन असें त्याला वाटलें.

## तो

१३१३ मी तिच्या गळ्यांत हार घातला, तरी "तुला दुसऱ्या तरुणीच्या डोळ्यांकडे बघायचें आहे" असें म्हणून ती फणकाऱ्यानें निघून जाते.

१३१४ मी जर तिला म्हटलें की "सर्वांपेक्षां तुझ्यावरच मी अधिक प्रेम करतों"; तर ती लगेच उसळून विचारते, "सर्वांपेक्षां म्हणजे कोणाकोणापेक्षां?"

१३१५ मी तिला जरी म्हटलें, "आपण पुनः या जन्मीं तरी विमुक्त होणार नाहीं"– तरी तिचे डोळे भरून आले. (पुढच्या जन्मींच्या वियोगाच्या शंकेनें.)

१३१६ मी तिला म्हटलें, "दूर होतों तेव्हां तुला मनांत आठवित असें"; मला बाहुपाशांत घेणारी ती एकदम रागानें दूर होऊन म्हणाली, "मला विसरलां होतांत एकूण? म्हणून आठवण करावी लागली!"

१३१७ मला शिंक आली व तिनें शुभ चिंतिलें. परतु आपला आशीर्वाद् मागें घेऊन डोळ्यांत पाणी आणून तिनें विचारलें, "तुम्हांला शिंक आली. कोणी बरें तुमची आठवण काढली?"

१३१८ मी माझी शिंक दाबली; तरीहि ती साश्रु नयनांनीं म्हणाली, "कोणती तरी तुझी दुसरी मैत्रीण तुझी आठवण करीत आहे अशी शंका मला येऊं नये म्हणून ना शिंक दाबलीस?"

१३१९ तिचें सांत्वन करण्यासाठीं मी नाना उपाय करावे; परंतु तिचा राग अधिकच वाढावा. कपाळाला आंठ्या घालून तिनें म्हणावें, "तुम्ही दुसऱ्या कोणाजवळ प्रेमकलह करतांना बऱ्याच युक्त्या शिकलांत एकूण?"

१३२० तिच्या सौन्दर्यानें वेडावून उन्मत्त होऊन तिच्याकडे मी पाहूं लागतांच ती मला म्हणते, " माझ्या सौन्दर्याशीं कुणाच्या सौन्दर्याची मनांत तुलना करीत आहांत ? "

### सर्ग १३३ : प्रेमकलहांतील गोडी

*ती*

१३२१ त्याचा कांहीं दोष नसला तरी प्रेमकलहांत तो जेव्हां माझी समजूत घालूं लागतो, तेव्हां तो फारच सुंदर दिसतो. असें सौन्दर्य एरव्हीं समजून आलें नसतें.

१३२२ प्रियकराच्या कोमल भावनांना जरी थांचावें लागलें तरी या प्रेमकलहांत एकमेकांना जे बारीक चिमटे आम्ही घेतले, त्यांतली गोडी निराळीच होती.

१३२३ प्रियकर व आपण मनानें जर खरोखर एकरूप असूं तर ज्या जमिनी-वरून पाणी वाहतें, त्या जमिनीची नि पाण्याची जशी समरसता असते, तशीच आपलीहि असेल. आणि असं असल्यावर प्रेमकलहासारखा स्वर्ग नाहीं.

१३२४ प्रियकराजवळ माझें जें भांडण होतें, त्यानेंच माझ्या हृदयांतील बळकट किल्लेकोट ढांसळतात.

*तो*

१३२५ जरी आपण निर्दोष असलों, तरी प्रियेनें रागावून मिठी सोडून बाहु दूर घेणें यांत एक प्रकारचा आनंद असतो.

१३२६ भोजनापेक्षां पचन अधिक गोड आहे; त्याप्रमाणेंच आलिंगनापेक्षां प्रेमकलहच अधिक मधुर आहे.

१३२७ प्रेमाच्या कलहांत जो प्रथम शरण जातो, तोच जिंकतो. गोडीगुलाबी जेव्हां होते तेव्हां याचा प्रत्यय येतो.

१३२८ थोडा वेळ क्रोधाचा आविर्भाव आणून आमच्या आलिंगनाच्या आनंदाला ती चव आणते.

१३२९ तिच्या आंठ्या, तिचें रागावून बोलणें, मला आणखी थोडें अनुभवूं दे; फक्त एकच प्रार्थना कीं या रात्रीनें जरा दीर्घ व्हावें.

१३३० प्रेमकलह म्हणजे प्रेमांतील गोडी, प्रेमांतील शोभा. आणि त्या आनंदांतील परमानंद म्हणजे, त्या गोडींतील परम गोडी म्हणजे, मागून मिळणारें आलिंगन होय.

**वि. स. खांडेकर**

विसावें शतक

मी माणूस आहें

सुवर्णमध्य

**संपादित**

पांच लघुकथाकार

**चिं. वि. जोशी**

संशयाचें जाळें

आमचापण गांव

**द. र. कवठेकर**

साडे तीनशें रुपये

विनंति विशेष

हा आमचा संसार

गुन्हा

श्री

**ना. धों. ताम्हनकर**

कोळशाची भट्टी

जानबा तुकाराम

तो

**अरविंद गोखले**

प्रतिभाचिन्ह

समाधान

शाल

**गोपिनाथ तळवलकर**

आनंदभुवन

शांतिनिकेतन

उद्यांचे आधार

**वि. वि. बोकील**

अरविंद शेख महमद

★ विजयी वसंत

**प्र. के. अत्रे**

कावड

**कुसुमाग्रज**

कल्पनेच्या तीरावर

**दत्तू बांदेकर**

आंवळ्याची मोट

**य. गो. जोशी**

हात ग काऊ !

**ना. ह. आपटे**

कोणी एक प्राध्यापक !

**ग. त्र्यं. माडखोलकर**

भंगलेलें देऊळ ( ति. आ. )

**बा. भ. बोरकर**

भावीण

**खलील जिब्रान**

तुटलेले पंख

**सानेगुरुजी**

बेंजामिन फ्रँकलिन

शिशिरकुमार घोष

**ह. भा. वाघोलीकर**

गुप्त खजिना

**ग. वि. अकोलकर**

मादाम क्युरि

★ ***A. L. Bhagwat***

Read Your Own Palm

**कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणें २.**